भारत-इतिहास-संशोधक-मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ६६

# पुणें नगर संशोधन वृत्त

## खंड ३ रा

संपादक व प्रकाशक—

**चिंतामण गणेश कर्वे,**

चिटणीस, पुणें-नगर संशोधन समिति,

भा. इ. सं. मंडळ, पुणें.

शक १८६८] किंमत २ रुपये [इ. १९४६

MR
954.792
K 148.III P

मुद्रक
विठ्ठल हरि बर्वे,
आर्यभूषण मुद्रणालय, ९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४

MR
954.792
K148.III P
CATALOGUED

# संपादकीय प्रस्ताव

**पुणें नगर संशोधन वृत्त, खंड ३ रा** मागच्या खंडानंतर तीन वर्षांनीं निघत आहे. छपाईच्या अडचणींमुळें मंडळाचीं प्रकाशनें मागसलीं त्याला आमचा नाइलाज आहे. तथापि पुणें नगर संशोधन समिति स्थापन झाल्यापासून गेल्या सात वर्षांत पुण्यासंबंधीं पुष्कळ नवीन माहिती या खंडांच्या द्वारें पुढें आलेली आहे; व पुण्याचा सविस्तर साधार इतिहास लिहिण्यास हीं साधनें तयार होत आहेत.

आतांपावेतों या वृत्तांतून १८९ टांचणें प्रसिद्ध झालीं, पैकीं प्रस्तुत खंडांत ६६ टांचणें विविध विषयांवर आहेत. डॉ. मो. गं. दीक्षित आणि श्री. ग. ह. खरे यांचीं टिपणें ताम्रपट-शिलालेखावर आधारलेलीं आहेत व श्री. पोंक्षे यांनींहि आपल्या पूर्वजांनीं बांधलेल्या विहिरीवरचा लेख पुण्यांतील पोंक्ष्यांच्या वास्तु वर्णन करतांना नवीनच दिला आहे. धारदप्तरांतलि पुण्यांतील वार, पेठा, पुरे, गंज, आळ्या, वळी, खाणे, बाजार अशा वर्गीकरणानें दिलेली यादी आजच्या त्या त्या नगर-विभागांशीं ताडून पाहातां येईल. पुण्यांतील शिवकालीन व उत्तर पेशवाईंतील ठळक नागरिकांच्या नोंदी देखील घराण्यांच्या इतिहासाला उपयोगी पडतील. मंडळाचे एक जुने संशोधक सभासद श्री. यशवंतराव गुप्ते यांचीं टिपणें नेहमींप्रमाणेंच स्वतः हिंडून तयार केलेलीं व साधार असतात. त्यांना जुनी माहिती फार आहे व आणखीहि मिळविण्याची त्यांची चौकस बुद्धि आणि कसोसी हीं त्यांचें वय आणि प्रकृति पाहतां निरुपम आणि अनुकरणीय म्हणतां येईल. तसेंच आमचे दुसरे अतिवृद्ध संशोधकमित्र श्री. लक्ष्मण नारायण जोशी यांच्याजवळ पुण्यांतील जुन्या आख्यायिकांचा आणि स्थलांच्या माहितीचा केवढा तरी नोंदी साठा आहे. त्यांचें एक दोन लेखी खंड काढण्याचें त्यांनीं [illegible] लिहावेत असें आम्ही मनापासून इच्छितों.

Library IIAS, Shimla
MR 954 792 K 148.11 P-K 148 IV
00008977

[illegible] डी भर पडणार आहे. पु. न. सं. वृत्ताच्या [illegible] ळींच आहेत. असो.

[illegible] अधिक करतां येईल, पण नवीन होत- [illegible] णसें पुढें येत नाहींत व जुन्याच मंडळींवर इतर भारांबरोबर हाहि पडतो. त्यामुळें पिपीलिका-मगति दिसते. तसेंच, नगरपालिकेचें मोठें साहाय्य मिळाल्यास काय करतां येईल हें आज कशाला सांगावें ?

मार्गशीर्ष शु॥ १ शक १८६८

**चिंतामण गणेश कर्वे**

चिटणीस

# पुणें-नगर संशोधन वृत्त खंड ३ रा

## अनुक्रमणिका


| प्र. क्रमांक | प्रकरण नांव | लेखक | पृ. |
|---|---|---|---|
| १२४ | पुण्याचा आणखी एक प्राचीन उल्लेख | मो. गं. दीक्षित | १८७ |
| १२५ | सरदार बापू गोखले यांचें राममंदीर | य. रा. गुप्ते | १८८ |
| १२६ | जंगली महाराज बसण्याच्या जागा | ,, | १८९ |
| १२७ | झांबरे चावडी व वाडे | ,, | १९० |
| १२८ | आंबिल ओढा | ,, | १९१ |
| १२९ | तोफखानेवाले गोखले यांचा वाडा व बाग | ,, | १९२ |
| १३० | हरेश्वराचा बोळ, मोतीवाले-व-जोशीवाडे ( थेऊरकर शाळिग्राम घरविक्री ) | ,, | १९४ |
| १३१ | नागेश्वर | ,, | १९७ |
| १३२ | नागेश्वर व त्याचा परिसर, पुनः एकदां | ,, | १९८ |
| १३३ | घाग्पुरे यांचीं घरें | शं. ल. वैद्य | १९९ |
| १३४ | करकरे | ,, | २०० |
| १३५ | नानाहोदाजवळचा थत्ते वाडा | ,, | २०१ |
| १३६ | पुण्यातील पेठा वगैरे | चिं. ब. लेले | २०२ |
| १३७ | कुणाबिणीस कोतवाली चौत्रा चिठी | रू. वा. पुरंदरे | २०५ |
| १३८ | गुरुवार पेठेचे कुलकर्णी | शं. ना. जोशी | २०७ |
| १३९ | काकिर्डे धराणें | ,, | २०८ |
| १४० | गारपिरापासून वानवडी | ,, | २०८ |
| १४१ | देवळालीकरांचें घर | चिं. ग. कर्वे | २१२ |
| १४२ | नदींतील धारसिवेचा तंटा | ,, | २१३ |
| १४३ | सरकारकडून जागा-मोजणी | ,, | २१४ |
| १४४ | तुळशीबागकरांना पेनशन | ,, | २१५ |
| १४५ | भिकारीदासाचा बंगला | ,, | २१६ |
| १४६ | हशमपुरा | ,, | २१८ |
| १४७ | हरिकर्णीचें दुकान | ,, | ,, |
| १४८ | मॅलेटच्या वेळचें पुणें | ,, | ,, |
| १४९ | पुणें पोलीस | ,, | २१९ |
| १५० | जुनें ड्रेनेज | ,, | २२१ |
| १५१ | गुरुवार पेठेची कमाविसी | ,, | २२१ |
| १५२ | पर्वतीवरील गणपती | चिं. ग. कर्वे | २२२ |
| १५३ | पर्वतीजवळील चौकया | ,, | २२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| १५४ | बाळशास्त्री टोकेकर यांचा वेताळ पेठेंतील नळ | ,, | २२३ |
| १५५ | वाळींत टाकण्याची सभा | ,, | २२४ |
| १५६ | पुरंदरे वाड्याची जागा | ,, | ,, |
| १५७ | मोस्टीनच्या वेळचें पुणें | ,, | २२५ |
| १५८ | सेकसल्याची क्रिया | ,, | २२६ |
| १५९ | तुळशीबागकरांचा रविवारांतील वाडा | ,, | ,, |
| १६० | भिडे बाग | ,, | २२७ |
| १६१ | भिकारीदास सराफ | ,, | ,, |
| १६२ | तुळसीबागेची कसब्यांतील बाग | ,, | २२८ |
| १६३ | कसब्यांतील ढमढेरे वाडा | ,, | ,, |
| १६४ | शिवकालीन ब्राह्मणांची यादी | ,, | २३० |
| १६५ | मुजेरी जमिनीबद्दलचा तंटा | ,, | २३२ |
| १६६ | माळीचें दस्तक | ,, | ,, |
| १६७ | नव्या लकडीपुलासाठीं पट्टी | ,, | २३३ |
| १६८ | ढेरे यांचें घर | ,, | २३४ |
| १६९ | केदारवेसीजवळचीं घरें | ,, | २३५ |
| १७० | जनार्दन अप्पाजीची तुळसीबागेंत जागा | ,, | ,, |
| १७१ | माळी मेहत्रे जमीनवाद | ,, | २३६ |
| १७२ | भांबुर्ड्याचे सिरोळे यास सनद | ,, | २३७ |
| १७३ | तीन सोंडी गणपती–देऊळ, लेख, शिल्पें | ग. ह. खरे व मो. गं. दीक्षित | २३८ |
| १७४ | मल्हार श्रोत्री यांच्या वंशजास पेनशन | चिं. ग. कर्वे | २४१ |
| १७५ | नहराचा खर्च | ,, | २४२ |
| १७६ | पुणें येथील पोंक्षेवाडा व बागमळा | भा. सि. पोंक्षे | २४३ |
| १७७ | चिटणीस व सखारामपंत चोकील यांचे पुण्यांतील वाडे | य. रा. गुप्ते | २४४ |
| १७८ | पुण्यांतील चिटणिसांचा वाडा | ,, | २४५ |
| १७९ | न्हावी–म्हेतरपणाचा वाद | चिं. ग. कर्वे | २४७ |
| १८० | कमाविसी जमा | ,, | २४८ |
| १८१ | तुळसीबागवाले–फाटक कज्या | ,, | २५० |
| १८२ | उदासी मठ | ,, | २५१ |
| १८३ | बुधवारांतील लिमये वाडा | | २५१ |
| १८४ | विश्वासरावाच्या लग्नाचीं पुणेकरांस वस्त्रें | चिं. ग. कर्वे | |
| १८५ | शिरपावमानाची यादी | ,, | २५३ |
| १८६ | नगारखाना तुळसीबाग | ,, | २५४ |
| १८७ | तुळशीबागेंतील नवा नगारखाना | शं. ना. जोशी | २५६ |
| १८८ | स. माधवरावकालीन कांहीं पुण्यपत्तनस्थ | ,, | २५८ |
| १८९ | पत्रावळींच्या नोंदीवरून व्यक्ति व प्रसंग | चिं. ग. कर्वे | २६६ |

# पुणें नगर संशोधनवृत्त

## खंड ३ रा

## १२४

# पुण्याचा आणखी एक प्राचीन उल्लेख

[ डॉ. **मो. गं. दीक्षित**, पुणें ]

[1]पुण्याचे प्राचीन उल्लेख नजरेस आणण्याचें प्रथम श्रेय भा. इ. सं. मंडळाला आहे. मंडळ त्रैमासिकाच्या वर्ष ८ अंक ३ च्या १६६–१६७ वर राष्ट्रकूट कृष्ण ( तिसरा ) ह्याचा शक ६८० मधील ताम्रपट प्रसिद्ध झाला आहे; त्यांत पुण्याजवळच्या भागाचें नांव **पुण्य-विषय** असें येतें. राष्ट्रकूट कृष्णाच्या तळेगांव ताम्रपटांत[2] ( शक ६९० ) ह्याच विषयाचें नांव **पूनक विषय** असें येतें. पुण्याच्या आसपासच्या प्रदेशाची जुनी माहिती डॉ. दे. रा. भाण्डारकर ह्यांनीं आपल्या एका लेखांत[3] ग्रथित केली आहे. बडोद्याच्या पुरातनवस्तुसंशोधन–खात्यानें नुकतेंच ' बडोदें संस्थानांतील महत्त्वाचे लेख ' ह्या नांवाचें पुस्तक[4] प्रसिद्ध केलें आहे; त्यांत आलेला पुण्याचा आणखी एक प्राचीन उल्लेख येथें नमूद करतों.

ह्या पुस्तकांत शिलाहार अपराजित ह्यानें शक ९१५ मध्यें कऱ्हाडहून आलेल्या काश्यप गोत्री कोलम नांवाच्या ब्राह्मणाला दान दिलेले दोन ताम्रपट[5] छापले आहेत. त्यांपैकीं एकांत[6] हा ब्राह्मण **पुणक विषयांतील खेटक** ग्रामांत रहात होता असें वर्णन

---

१ न. सं. पा. स. ९।६५. ता. २२।९।४३

२ मंडळ **वार्षिक इतिवृत्त** शक १८३४, पृष्ठ ३७७–३८०. ह्याच ताम्रपट **इपि. इंडिका** भाग १३ पृष्ठ २७५ वर पुन्हां प्रसिद्ध झाला आहे.

३ भाण्डारकर, " अन्टिक्विटी ऑफ पूना डिस्ट्रिक्ट " **जर्नल, बॉम्बे ब्रँच रॉयल एशियाटिक सोसायटी** ( न्यू सिरिज ) भाग ६ पृष्ठ, २३१–२३९.

४ गद्रे, "**इम्पॉर्टण्ट इन्स्क्रिप्शन्स फ्रॉम बरोडा स्टेट**" भाग १ (१९४३).

५ **कित्ता**, पृष्ठ. ३५–६४.

६ ताम्रपट ब. ( Grant B )

केलें आहे. अर्थात् हा गांव जुन्नर जवळील खेड ह्या स्थळास उद्देशून आहे असें स्पष्ट होतें.

पूनक ह्याचें पुणक असें झालेलें रूपान्तर पुण्याच्या सध्यांच्या नांवास जास्त जवळचें आहे.

---

# १२५

# सरदार बापू गोखले यांचें राममंदिर

[ श्री. य. रा. गुप्ते ]

रविवार तारीख १७ सप्टेंबर १९४४ इसवी रोजीं पुणेंनगरसंशोधनार्थ शुक्रवारांत काळ्या वावरांत गेलों. प्रथम अक्का मारुतींचें दर्शन घेतलें. हे मारुती १८१८ नंतर केव्हां तरी बसविण्यांत आल्याचें श्रीमंत परिंचेकर परांजपे यांनीं सांगितलें.

अक्का मारुतीच्या आवारास लागूनच सरदार बापू गोखले यांचें भव्य राममंदिर आहे. प्रथम सभोंवतीं बाग होता. आतां अलीकडील लहान लहान इमारती आहेत. गाभाऱ्यांत श्रीराम, लक्ष्मण व सीता यांच्या संगमरवरी बऱ्याशा मूर्ति आहेत. पण देवळाप्रमाणें त्या सरदार बापू गोखल्यांच्या हातच्या नाहींत. मूळ मूर्ती कोणीं नेल्या. नंतर हल्लींच्या बसविण्यांत आल्या. समोरचा काळ्या दगडाचा मारुती मात्र सरदार बापूंच्या वेळचा आहे.[१]

सभामंडपहि भव्य असून हल्लीं सुस्थितींत आहे. तो पेशवाईंतील इतर मंदिरांतून असल्याप्रमाणेंच आहे. सभोंवार भिंती आहेत. परंतु त्या अलीकडील आहेत. पूर्वीं तुळशीबागेंतील मंडपासारखा हा मंडप मोकळा होता. देवळाच्या व आसपासच्या इमारतींचे व जागेचे वहिवाटदार श्रीमंत परिंचेकर परांजपे आहेत. इमारती त्यांच्या आहेतसें कळलें. मूळचें देऊळ पडक्या स्थितींत होतें. तें परिंचकरांनीं दुरुस्त केलें. म्हणजे जीर्णोद्धाराचें श्रेय त्यांस आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

या राममंदिराचा हल्लींचा सि. स. नं. घर क्र. शुक्रवार २४५ आहे.*

---

१ वीर मारुति हें बापू गोखल्यांचें दैवत होतें. त्यांच्या निशाणावरहि हा मारुती काढलेला असे.-शं. ना. जोशी. *न. सं. पा. स. १०।६६

## १२६

# जंगली महाराज बसण्याच्या जागा

[ श्री. य. रा. गुप्ते ]

सुप्रसिद्ध साधु जंगलीमहाराज यांची समाधि सि. स. नं ११७३ शिवाजी नगर जंगली महाराज रोडवर असून तीस हिंदु व मुसलमान पूज्य मानितात. त्यांस पाहिलेले अनेक लोक हयात आहेत. त्यांच्या हयातींत त्यांचा फार मोठा परिवार नसे. तथापि समाधि घेण्याच्या अथवा नाहींसें होण्याच्या अगोदर तो बराच वाढला होता.

त्यांच्या समाधीची जागा कित्येकांस मान्य नाहीं. कारण ते कधीं समाधिस्थ झाले तें कोणास कळलें नाहीं असें म्हणतात. कोठें झाले हा सुद्धां वाद अद्यापि लोक घालतात. त्यांस पाहिलेले कांहीं लोक सांगतात कीं, त्यांनीं सुंता केलेली होती. पण ते **हिंदूंच्या देवळांत** अथवा आसपास बसत असत. त्यांच्या शिष्यांचा परिवार बहुधा हिंदूंचाच असे. कबर आहे त्यावरून त्यांस येथें दफन करण्यांत आलें असें मानण्यास जागा आहे वा झाली.

माझ्या लहानपणीं हल्लीं धर्मशाळा आहे तेथें मुसलमानहि जमत असत. हें प्रकरण कोर्टापर्यंतहि गेलें होतें. तथापि तें तूर्त अप्रस्तुत आहे; कारण जंगलीमहाराज कोठें बसत एवढीच माहिती आज द्यावयाची आहे. या बाजूनें आम्हीं मुलें असतां क्रिकेट खेळण्यास जात असूं. गुरांचा बाजार जवळच असे. तो प्रसिद्ध होता. आमच्या रस्त्यावर पुढें पेरूचे बाग असत. घरीं जावयाचें तर थोडें ऊन्ह असतांच निघून जावें लागे. ही जागा भयाण वाटे. या बाजूस मवाली लोकांचे अड्डे असत. कित्येक गुन्ह्यांच्या जागा दाखविण्यास वकील लोकांस न्यायाधीशांस येथें घेऊन यावें लागे. पोलीस सुपरिंटेंडेंटच्या बंगल्याखालील तळ्यांत अथवा मोठ्या खाणीत–विहिरींत म्हणा रेव्हिन्यु कॉलनीस लागून पाणी असे. या बंगल्याच्या बाजूनें दुपारीं बारा वाजतांहि जाण्यास लोक भीत असत. त्या बाजूनें जाऊन घरीं ताप आल्यास पिशाच्च बाधा झाली म्हणून कांहीं उतरून टाकीत असत. पण आतां हेच जाणारे लोक अथवा त्यांचीं मुलें सुखानें या जागेवर मोठमोठाले बंगले बांधून राहिले आहेत ! कालाचा महिमा अगाध आहे ! !

समाधिस्थ होण्यापूर्वी अथवा दफन करण्यापूर्वी किंवा नाहींसे होण्यापूर्वी लोकांस त्यांची माहितीहि फारशी नसे; तेव्हां जंगली महाराज सि. स. नं. ५५८ शिवाजी नगर **रोकडोबाच्या देवळांत**–अमेयेस म्हणणें अधिक बरोबर होय–देवाच्या मागील

---

न. सं. पा. स. ७१६६

पडवींत पश्चिमेस बसत असत. त्यांस तेथें बाजरीची भाकरी खातांना अनेक गृहस्थांनीं पाहिलें आहे. बाजरीची भाकरी व दूध त्यांस फार आवडे.

तिसरी त्यांची बसण्याची जागा रोकडोबाच्या देवळाच्या वायव्येस जेथें मोठीं दोन झाडें आहेत ती होय. चिकटून असलेला हल्लींचा बंगला म्हणजे 'लक्ष्मीभुवन' होय. हा श्री. द. ब. प्रधान, सबरजिस्ट्रार व मॅजिस्ट्रेट, इस्लामपूर यांचे मालकीचा आहे.

---

# १२७

# झांबरे चावडी व वाडे

[ श्री. य. रा. गुप्ते ]

*पुणेंनगरसंशोधन वृत्त सं. १ पृ. ६६ यावर "कसब्यांत पुण्याचे पाटील झांबरे यांची चावडी व घरें आहेत" ( पेशवे डायरींत उल्लेख आहे. ) असा मजकूर आहे. तेव्हां हा भाग पाहण्याचें पुष्कळ वेळां मनांत येई. तथापि याचा नीट सुगावा लागेना. नागझरी येथून फार दूर नाहीं एवढें मात्र ठाऊक होतें. तेव्हां झांबऱ्यांच्या वस्तीचा छडा लावावयाचाच असा निश्चय करून ता. २३-१०-१९४३ रोजीं सकाळीं ९-१० चे सुमारास व्यवहार-आळींत गेलों. कारण पूर्वीच्या पुणेंवाडींत व्यवहारे जोशांचीं घरें आहेत. त्यांनीं मार्गदर्शन साधारण केल्यावर या झांबऱ्यांच्या वस्तीचा सुगावा लागला. सहज रीतीनें ही सांपडण्यासारखी नाहीं. पण एकेकाळीं ही महत्त्वाची होती. हीस येण्यास तीन मार्ग—एक व्यवहार आळींतून, दुसरा रविवारांतून दारुवाल्याच्या पुलावरील मशिदीचे जरा वरून व तिसरा नागझरीकडून वरच्या बाजूनें रविवारकडे रस्ता जातो त्या बाजूनें. पैकीं दुसरा रस्ता सोईचा आहे.

प्रथम मी झांबऱ्यांचा जुना वाडा (सि. स. नं. ४३४) येथें गेलों; चौकशी केली. बायामाणसांस व एक दोघे पुरुष होते त्यांस वाटलें कीं हे बोवा काहीं कोर्टाचे कामा-निमित्त आले आहेत. त्यामुळें सर्व बाहेर गेलेत असें ते म्हणूं लागले. मीं सांगितलें कीं मी येथें पूर्वी सब्-रजिस्ट्रार होतों. आतां सेवानिवृत्त झाल्यावर जुन्या पुण्याची माहिती मिळवीत आहे. तेव्हां एक गृहस्थ येऊन त्यांनीं काय माहिती पाहिजे ती विचारपूस करतांच झांबरे तालमींतील दोन तीन इसम येऊन त्यांनीं झांबऱ्यांचीं घरें

* न. सं. पा. म. ४।६६

व चावडी दाखविली. वर उल्लेखिलेल्या वाड्याशेजारीं [सि. स. नं. ४३५ येथें तालीम आहे. जवळच] पण तुटक झांबरे चावडी आहे. चावडीस दोन मजले असून माळा आहे. हिचा सि. स. नं. ३६२ आहे.

---

## १२८

# आंबिल ओढा

[ श्री. य. रा. गुप्ते ]


*पुणेंनगरसंशोधनवृत्त खं. १ पृ. ३५ वर क्रमांक ४८ खालीं आंबिलओढ्याची थोडी माहिती दिली आहे. तींत तो " तुळशीबागेंतील त्र्यंबकेश्वर देवळावरून, जोगेश्वरीच्या देवळावरून शनवार वाड्याच्या पश्चिमेनें अमृतेश्वराजवळून नदीला मिळे. कसब्याच्या गणपतीपुढेंहि एक ओढा होता असें सांगतात " असें आहे. हा गणपतीपुढील वा जवळील ओढा आंबिलओढ्याचाच भाग असावा; , कारण केदारेश्वर देवालय आंबिल ओढ्याचे कांठीं होतें अशी आख्यायिका सर्वश्रुत आहे. वे. शा. सं. विनायकशास्त्री घोडे, केदारेश्वराचे पुजारी (हल्लीं वय ८७।८८) यांचे पूर्वजहि असेंच सांगत आले. माझे ऐकण्यांत आंबिलओढ्याच्या ओघाचा जोर कमी करण्यासाठीं पेशवाईंत त्याचे दोन ओघ बनविले, असें आहे.

तुळशीबागेंत महादेवाचें एकच देऊळ आहे. तेव्हां तोच त्र्यंबकेश्वर असावा. पण खं. १ पृ. २८ वर तुळशीबागेंत काशीविश्वेश्वर दिला आहे. तुळशीबागेच्या पिछाडीनें म्हणजे मंडईजवळील आर्यन सिनेमावरून विश्रामबागेसमोर मिळणाऱ्या सडकेस येतां श्री. भावे यांचे दुकानावरून जी सडक जाते तेथपर्यंत, त्याचा विस्तार होता. यास प्रत्यंतर पुरावा आहे. तो नकाशा काढून प्रो. आर. के. भिडे यांनीं मजपुढें मांडिला. त्यांत जरूर तो किंचित् फरक करून मीं तो खालीं दिला आहे. ( प्रो. भिडे यांचें वय ७१ वर्षांचें आहे व माझें ६२ आहे. ) ता. ३०-९-४३ व १-१०-४३ रोजीं प्रो. भिड्यांचा नकाशा घेऊन मीं जवळ रहाणाऱ्या वृद्ध गृहस्थांपाशीं चौकशी केली. माझ्या ऐकिवांत माहितीशींहि मेळ घातला. निश्चित झालेल्या गोष्टी अशाः--हल्लीं ज्यास जिलब्या मारुती म्हणतात त्याच्या आसपास आंबिल ओढ्याचें कांठीं स्मशान होतें व तेथें प्रेतें दहन करीत. सतीहि जांत. सतीच्या तीन वृंदावनांचा आज प्रत्यक्ष पुरावा आहे. एक दात्यांच्या वाड्यांत विहिरीजवळ असून दोन भिंतींत आहेत. हीं जिलब्या मारुतीच्या मागेंच येतात. श्री. दात्यांच्या वाड्यांचे सि. स. नं. सदाशिव पेठ ८७४-८७५ आहे.

---

* न. सं. पा. स. ११।६५

अर्थात् सती गेलेल्या स्त्रियांनीं ही जागा पुनीत केली आहे. कदाचित् पुणें न. सं. वृ. खं. १ पृ. ५६ यांत उल्लेखिलेलें हें सतीचें देवालयहि असूं शकेल. पण सि.स. ८७४–७५ यास दात्यांचा वाडा म्हणतात. वरील खंडाच्या ३५ पृष्ठावरच पुढें असें आहे– "तेव्हां पर्वती तळ्यांत याचें ( आंबिलओढ्याचें ) पाणी घेऊन पुढें पश्चिमेकडे वरींच धरणें बांधून हा मुळेंत सोडून दिला. तेव्हांपासून हा ओढा प्रत्यक्ष गांवांतून वाहाण्याचें बंद झालें." पूर्वी हा "अमृतेश्वराजवळून जाऊन नदीला मिळे" असें वर आलें आहे. अमृतेश्वराजवळ तर मुठा येते. मुळा संगमावर मिळते. वि. नि. सिद्धेश्वर शास्त्री चित्राव सांगतात कीं अमृतेश्वराजवळ येणाऱ्या ओघास ' गद्दे ओहळ ' म्हणत असत. पूर्वी आंबिलओढयाचा एक भाग गद्दे ओहोळास तर मिळवून दिलेला नव्हता ? कोणी सांगतात थोरल्या शिवछत्रपतींच्या वेळीं आंबिल सकाळीं वांटीत म्हणून आंबिलओढा संबोधूं लागले. तसेंच तो अथवा त्याचा भाग आंब्याच्या झाडाजवळून येई म्हणून आंबे–ओहोळ म्हणणें सयुक्तिक होईल. तो हल्लीं जेथें ग्लोब सिनेमा आहे त्या बाजूनें व ढमढेऱ्यांचे बोळाचें बाजूनें वहात असे, असें माझ्या व श्रीमंत थत्ते यांच्या लहानपणीं लोक सांगत असत.




---

## १२९

# तोफखानेवाले गोखले यांचा वाडा–बाग

[ श्री. य. रा. गुप्ते ]

पुणेंनगरसंशोधनवृत्त खं. १ पृ. ३३ क्रमांक ४३ नरसोबाचें देऊळ सदाशिव पेठ (कारकोळ पुरा) खालीं असें आहे. " नरसोबाचे देवळासमोर रास्त्यांची बाग होती;

( स्काऊट ग्राऊंड ) कोंपऱ्यावर विठोबा होता. तो सरकारानें जागा घेतल्यावर समोर बसविण्यांत आला. रास्त्यांच्या बागेच्या उत्तरेस परचुऱ्यांची बाग होती, " ही माहिती वाचून ता. २६-९-४३ रोजीं मीं श्री. श्रीधर वामन जोशी, सेवानिवृत्त पोलीस प्रॉसिक्युटर व त्यांचे चिरंजीव श्री. रामचंद्र श्रीधर वकील, यांचे भेटीस गेलों. तेव्हां मला पुढील माहिती मिळाली. बॉयस्काऊट ग्राऊंड जवळील जागा त्यांनीं इ. स. १९२५ त श्री. खंडेराव विश्वनाथ रास्ते यांजकडून रु. ५००० स विकत घेतली. रास्त्यांनीं ती सरकारास ९०० रुपयांस कँपेन्सेशन घेऊन १९१८ त विकली होती. पुढें ती १९२४ त पुन्हां रास्त्यांस देण्यांत आली. रास्त्यांस ती पूर्वी १८२६-२९ चे सुमारास तोफखानेवाले गोखले यांनीं विकली होती. या गोखल्यांस तोफखानेवाले संबोधण्याचें कारण असें कीं, ते बापूगोखल्यांचे तोफखान्यावर तोफेस सरबत्ती देऊन गोळे उडवीत असत. त्यांस 'सरबत्ते' असेंहि म्हणत. ही जागा नरसोबास जाण्याच्या रस्त्यापासून पूर्वेस १९०′ गोखल्यांची व ९०′ ते ९५′ लकडे जोशांची होती. तिला चार दरवाजे होते. सडकेच्या बाजूनें व पलीकडे चार शौचकूप होते. हल्लीं ते बुजविले आहेत. तरी ते सहज ओळखतां येतात. चवथा मोकळा केलेलाच आहे. एकांतून महात बसून हत्ती जाई. या जागा रुंदी १२०′ व १२१′ असून तिचा हल्लींचा सि. स. नं. ५०१ आहे. पूर्वीचा परडी नं. ५३ होता. श्री. जोशी यांस हल्लीं ॲग्रिकल्चरल असेसमेंट ( रु. १७५ दर वर्षी ) भरावा लागतो. जुनी भिंत २ फुटी रुंद आहे.

वरील माहिती मिळविल्यावर मी पुन्हा श्री. जोशी यांचे भेटीस ता. ३-१०-४३ रोजीं गेलों. त्यावेळीं रा. सा. बाबासाहेब देशपांडे तेथें होते. तेव्हां मीं आपले रोजनिशींतील मागचें टिपण पुन्हा वाचून दाखविलें व आणखी पुरावा असल्यास बरें होईल असें सांगितलें. तेव्हां वकीलसाहेब यांनीं सर्व जागा दाखवून पुर्वीच्या ८५० रुपयांच्या गहाणखताचा उल्लेख केला. हें गहाणखत विश्वासराव खंडेराव रास्ते यांस भिकाजी नीलकंठ गोखले ऊर्फ सरबत्ते व पांडुरंग भास्कर चाफेकर व गोपाळ अनंत आपटे निा सरबत्ते यांनीं शक १७४६ तारण नाम संवत्सर भाद्रपद वाा प्रतिपदेस म्हणजे इंग्रजी तारीख ९ सप्टेंबर १८२४ हीस लिहून दिलें होतें. त्यांत चतुःसीमा अशा दिल्या आहेत: पूर्वेस मोरो सदाशिव लकडे व आम्ही दक्षिणेस दाजी नारायण जोग, उत्तरेस त्रिंबक नारायण परचुरे, पश्चिमेस रस्ता नरसोबाचा. इ. स. १८७२ च्या म्युनिसीपल नकाशांत व १८९० तील नकाशांत दोन इमारती दाखविल्या आहेत; पण त्या निरनिराळ्या आहेत. हल्लींच्या स्काऊट ग्राऊंडच्या आवारांत दक्षिणेस २१ घरें होतीं. पण तीं सरकारनें विकत घेतलीं. असा हा थोडक्यांत तोफखानेवाल्या गोखल्यांच्या वाड्याच्या भागाचा व बागेचा वृत्तांत आहे. या जागेवर पूर्वी बापू गोखल्यांचा तोफखाना होता.[1]

* मोडकांच्या जंत्री प्रमाणें. १ न. सं. पा. स. १२।६५

## १३०

## इच्छाराम शंकर मोतीवाले व कुळगांवकर जोशी यांचे वाडे

# श्री हरेश्वराचा बोळ

## शनिवार मारुती रस्त्यावरील थेऊरकर शाळिग्राम यांच्या घराची पुणें म्युनिसिपॅलिटी स्थापन होण्यापूर्वीची (इ. स. १८३८ तील) विक्री

[ श्री. य. रा. गुप्ते ]

STAMP
ONE RUPEE

| | |
|---|---|
| एक रुपया | टांकसाळ |
| एक रुपीओ | टंकसाल |
| OFFICE | 1835 |

*फुटका बुरूज ते शनवार मारुतीचा रस्ता पहिल्यापासून मोठा असून इच्छाराम शंकर यांचें घर खरेदी दिलेल्या घराचे पूर्वेस आहे. हे मोतीवाले सुप्रसिद्ध होते. माझे वडील सांगत कीं, यांच्या संपत्तीची कल्पना येण्यास एकच गोष्ट पुरे आहे. त्यांचे येथें मोतीं तराजूनीं मोजीत. या मोतीवाल्यांच्या मुलांनीं मिळकत घालविली. हल्लीं हें इच्छारामाचें घर जोगळेकरांकडे आलें आहे. फुटक्या बुरुजापासून पूर्वीच्या काशिकरांच्या व हल्लींच्या कानड्यांच्या वाड्यापर्यंत ७/८ मोतीवाल्यांचे वाडे या पेठेच्या या रस्त्याची भरभराट दाखवितात. प्रस्तुत खरेदीखतांतील वाड्यांत व अक्कलकोटकरांच्या वाड्याच्या पूर्वेस असलेल्या घरांत लहानपणीं आम्ही रहात होतों. नकाशांत या रस्त्यांतील घराच्या दक्षिणेस श्रीहरेश्वराचा बोळ दाखविला आहे. तो अद्याप त्याच स्थितींत आहे. त्यापलीकडे भन्याचा जोशी यांचें घर दाखविलें आहे. हें कुलगांवकर जोश्यांचें. पश्चिमेस नागो त्रिंबक रोजे (झे) करांचें घर होतें. हल्लीं तें कोंडाजी सोनारांनीं खरेदी घेतलें आहे. उत्तरेस रस्ता व पलीकडे दयाराम शामळदास यांचें घर होतें. खतावरील ९ साक्षीदारांत ४ मोतीवाले साक्षीदारांच्या सह्या आहेत. एकूण या शनिवार मारुती रस्त्यावर पेशवाई अखेर ब्रिटिश अमदानीचे सुरवातीसहि धनाढ्यं लोकांची वस्ती टिकून होती.

प्रस्तुत दस्तऐवज इ. स. १८३८ तील असून त्यावर रजिस्ट्रार अथवा सब-रजिस्ट्रारचे शेरे नाहींत. पुणें म्युनिसीपॅलिटी तर १८५६ त स्थापन झाल्यामुळें तिचा क्रमांक (पेठेचा) नाहींच. शक, फसली व इसवी वर्षें, महिने व तिथी तारखा

*न. सं. पा. स. ९।६५

दाखल आहेत. खरेदीखत कोंडाजी बिन गंगाराम शेट सोनार भावोरे यांचें नांवचें आहे. दुसऱ्या इ. स. १८३८ च्या एका दस्तऐवजात (शक १७६० च्या) त्यांचें आडनांव **दिंडोरकर** असें आलें आहे. म्हणजे हे मूळचे नासिक जिल्ह्यांतील दिंडोरीचे रहाणारे होते. ते आहिर सोनार होते. नासिक व पूर्व खानदेश जिल्ह्यांत दिंडोरी, सटाणें, साक्री वगैरे ठिकाणीं त्यांची वस्ति होती व आहे. ही जाती सर्व अहिर वंशाप्रमाणें देखणे-पणाविषयीं सुप्रसिद्ध आहे. यांचीं घरें पुण्यांत वरींच आहेत. नासिकच्या लेण्यांत ईश्वर-सेन अभिराचें नांव आलें आहे. ब्राह्मण, सोनार, मराठे वगैरे जातींत आहिर आहेत. जसें आहिर ब्राह्मण, आहिर सोनार इ. या खरेदीखतांत उल्लेखिलेलें घर मूळ आचाजी शिवाजी रोजे (झे) करांचें होतें. तें लिलावांत गणेश पांडुरंग शालिग्राम, थेऊरकर वस्ती पेठ कसबा यांनीं खरेदी घेतलें व कोंडाजी गंगाराम शेट यांस विकलें. खरेदीखत असें:—

अस्सल मोडी ले. १ ] श्री [ २६ जान्युआरी १८३८ इसवी

रुा १ ३८६१ ता। १६ जानवारी सन १८३८ वा। बुधवार नंबर २९१६५ खरेदीखत शके १७५९ हेमलंबी नाम सवछरे माहे पौष वा। १२ मंगळवार ते दिवशीं खरीदी कर्दे रो कोंडाजी बिन गंगाराम शेट **सोनार भावोरे** वा। पेठ शनवार शहर पुणें यासी फरोक्त कर्द (र्दे) गणेश पांडुरंग **शालिग्राम** वा। पेठ **कसबा** शहर मजकूर सुा। समान सलासैन म [ – ] यातैन व अलफ सन १२४७ फसली कारणे खरीदीखत लेहून दिले ऐसीजे [ :– ] पेठ म [ – ] जकुरी आम्हीं आचार्जी सिवार्जी **रोजेकर** याचे घर लिलावात सरकारातून खरेदी घेतले तें खण २ दोन दुमजला च्यार घई दरोबस्त इमला आगवाडा पिछवाडा सुा। घेतले त्या जाग्या [ – ] ची गज मोजणी चोवीस तसूचे गजाने गज सुमारी सुमार

लांबी दक्षणउत्तर गज २५॥। सुमार रुंदी पूर्वपश्चम गज ४॥ १ सुमार सदहू घराचे पावणे सवीस गज लांबी साडेच्यार गज दोन तसू वैवाटीची कलमें

असे . १ घराचा आगवाडा उत-राभिमुख व दक्षणाभिमुख दा(दों)न्ही दरवाजे चालू असे

यासीचतुर्सीमा शेजार थिा।

१ पूर्वेस इछाशंकर याचे घर

१ दक्षणेस **श्रीहरेश्वराचा बोल** पलीकडे **अन्याबा जोशी** याचे समोर घर

२

१ पश्चमेस नागो त्रिंबक **रोजेकर** याचे घर तुम्हीं गाहाण ठेविले ते निमे पलीक[ – ] डे बापू शेट सोनार दिनकर या[–] चे घर

१ पिछाडीचे चौकात आड आहे

१ पाटीमागील सोप्याचे कोपऱ्यांत शेतखाना आहे त्याची निकास खिडकी

न. सं. २

| | |
|---|---|
| १ उत्तरेस रस्ता पूर्वपश्चिम जात आहे पलीकडे **दयालदास शामलदास** याचे घर<br>२<br>४ | दक्षणाभिमुख असे<br>१ घराचे लवेचे पाणी व मोरीचे पाणी मोरी बांधून दोन्ही रस्त्याचे मोरीस मेळऊन दिले आहे त्या प्रो तुम्ही वैवाट करावी<br>१ घराच्या चाधया दोन्ही कडील<br>१ पूर्वकडील इछाशंकर याची व त्यापली [ कडे ] समाईक असे बिा **सडो** आप्पाजी **राजऋषि कुलकर्णी** पेठ शनवार<br>१ पश्चमेकडील नवीन बांधली आहे ती आपली असे<br>२<br>५ |

येणेप्रा। घर जागा इमला आगवाडा पिछवाडा सुा तुम्हास दरोबस्त फरोक्त करून दिल्हा त्याची किातुमचे आमचे विच्यारे ठरली ते रुा ३५० आक्षरी साडे तिनशें रुा हाली सिका ठरले ते रोख तुम्हापासून घेऊन हे खरीदीपत्र तुम्हास करून दिल्हे असे तरी तुम्ही व तुम्ही आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने मर्जीस येईल तसा इमला नवा जुना करून सुखरूप राहावे [ · ] या घर जागीयाविसी आमचा भाऊबंद वगैरे हरकोणी उभा राहिल्यास त्याचा जाब आपण करू [ – ] तुम्हांस तोसीस लागू देणार नाही [ · ] सदरहू घरजागिया समधे पेशजी आम्ही घर लिलावात खरीदी घेतले [ · ] त्याची पावतीपत्र सरकारचे घेतलें आहे [ , ] ते तुम्हापासी भोगवटीयास दिल्हे असे [ · ] हे खरीदीपत्र आम्ही आपले स्वसंतोषे आकलहुशारीने लेहून दिल्हे
सही———————सही गणेश पाडुरग शालग्राम थेऊरकर हली वाा शहर
पुणे दस्तुर खुद

साक्ष

१ [ सही गुजराथी ] पत्रा परमाणे शाक्षा इछा शाकर हरीभाई भणा......
१ [ · ,, ] शाक्षा शा हिराचंद मोतीचंद

[ उलटून ]

१ [ ,, ] पत्र परमाने शाक्षा शांतापचंद मानकचंद धणी पोते हजुर
१ [ ,, ] शाक्षा शा शामदाश जेटा शा

१ [ सही मोडी ] कृष्णाजी राम **गोखले** नि॥ अनदराव गोविंद जोसी मुरुडकर
उभयता मालक समक्ष दस्तुर खुद

१ [ „ ] साक्ष लक्षुमन सेट **कासेकर** दोनी धनी उरुबुरु हासतेकर [ - ]
सेट हारबा सेट कासेकर हासत क सेर

[ आडवी ओळ ] चि॥ खडो आपाजी **राजऋषि कुलकर्णी** पेठ शनवार

प्रस्तुत अस्सल दस्तऐवज श्री. बाबुराव सोनार यांचे मालकीचा असून तो त्यांनी भा. इ. सं. मं. त दासविण्यास दिला यास्तव त्यांचे आभार मानले पाहिजेत. धनको कोंडाजी गंगाराम शेट भांबोरे दिंडोरकर त्यांचे आणे दस्तऐवजाचा स्टँप इंग्रजी तारीख १६ जान्युआरी १८३८ रोजीं खरेदी केलेला असून दस्त तारीख २३ जान्युआरी १८३८ इसवी रोजीं लिहून पुरा केलेला आहे.

---

## १३१

# नागेश्वर

[ श्री. य. रा. गुप्ते ]

*नागेश्वराचा उल्लेख नगरसंशोधनवृत्त पृष्ठें ८ व ३६ वर आलाच आहे; पृ. ७० वर कांहीं अवशेषांचा आहे.

नागेश्वराचें देवस्थान पुण्यांत फार प्राचीन आहे. आळंदीची पंचक्रोशी येथें येऊन मिळे. **नागेश्वराचे** बाजूचा सरासरी मैलाचा परिसर बारीक रीतीनें तपासून पाहिला तर ज्ञानेश्वर कालीं व त्यापुढें कांहींकाल आजूबाजूस वस्ती असली पाहिजे हें अगदीं स्वाभाविक दिसतें. या परिसरांत विशेषेंकरून जरा खालीं मणच्यामण अस्थि सांपडल्याचें मीं ऐकिलें आहे. कै. आण्णासाहेब पटवर्धनांच्या मतें शनिवाराखालील व भांबवड्याखालील—भामुडर्याखालील—( वृद्धेश्वराजवळील ) भाग हा महास्मशानांत मोडत असावा. तसेंच नागसरीच्या–नागेसरीच्या-नागझरीच्या भागांतहि महास्मशान असावें असें मला वाटतें. मात्र प्रेतें पुरण्याची वहिवाट येथें अधिक असावी.

नागेश्वराचेजवळ मारुतीचें देवालय आहे. त्याचे व या शिवालयाचे द्वाराचे मध्यें एक कुंड होतें. अलीकडे एक नवा हौद बांधिला आहे, त्याचे आसपास तें होतें. पण त्याहून तें बरेंच विस्तृत होतें. त्यांत स्नान करणारांचे कुष्ट व इतर चर्मरोग आणि महारोगहि बरे होत असें ऐकिवांत आहे. कुष्ट बरें झालेलें तरी पुष्कळांनीं पाहिल्याचें सांगतात. नागेसरीचे–नागझरीचे––नागेश्वरापलीकडील स्वाभाविक भागांत

---

न. सं. पा स. ८।६४

स्नान केल्यासहि कुष्ट बरें होई असें म्हणतात. तरी सरूज बरी होण्यासाठीं लोक तेथें स्नान करीत. पण आतां मात्र स्नान केल्यास ती वाढेल !

**नागेश्वराच्या** बाजूचा बराच भाग अकराव्या ते तेराव्या शतकाच्या सुमारास पवित्र स्थानांत मोडत असला पाहिजे. नागेश्वराचें प्राचीन देवालयहि हेमाडपंती असावें. अशा देवळाचेजवळ कुंड हें असावयाचेंच. **चाकणचेंच** उदाहरण घ्या. तेथेंहि सोमेश्वराचें देवळाजवळ कुंड आहेच. त्या कुंडांत स्नान केल्यास कुष्ट तर बरें होतेंच. तथापि महारोग गेल्याचें ऐकिवांत आहे.

तारीख४–९–४२ रोजीं देवास गेलों. तेथें नागेश्वराचे पुजारी श्री. विष्णु त्र्यंबक **सप्तर्षि** भेटले. त्यांचे कुटुंबांतील माणसेंहि पूजा करीत होतीं. त्यांचें सांगण्याप्रमाणें जुने कागद इ. स. १८५८ त जळाले. तथापि या देवालयास शिवछत्रपतींची नेमणूक वगैरे कांहीं नाहीं. सप्तर्षि कित्येक पिढ्या पुजारी आहेत. फक्त पर्वती देवस्थानाकडून या देवास थोडे रुपये मिळतात.

नागेश्वर मूळचें स्वयंभू स्थान आहे. परंतु हल्लींचें लिंग पूर्वींच्या लिंगावर बसविलेलें आहे. खालील पंचमुखी आहे म्हणतात; म्हणजे आतां फक्त शाळुंकाच काय ती स्वयंभू स्थितींत आहे.

नागेश्वराचे देवळांत किंवा अगदीं त्यास लागून फार प्राचीन अवशेष उत्कट रीतीनें दृष्टोत्पत्तीस येत नाहींत. प्रेक्षकाच्या उजव्या हाताची शनीची मूर्ति अलीकडचीच आहे. मी पुन्याच वेळां अवशेषांची पहाणी केली. जुने दगड वगैरे इतरत्र उपयोगांत आणलेले असावेत. तथापि कांहीं अवशेष दडून बसले नसतीलच असें सांगवत नाहीं. नागेश्वराचे आसमंतांतील भागांवर जातां येतां माझें लक्ष असतेंच. प्राचीन निःसंदिग्ध अवशेष नजरेस आल्यास त्यांची माहिती प्रसिद्ध करितां येईल.

---

## १३२

# नागेश्वर व त्याचा परिसर पुन्हां एकदां

[ श्री. य. रा. गुप्ते ]

*मागील एका पाक्षिक सभेंत नागेश्वर व त्याचा परिसर यासंबंधीं माहिती दिली. तींत नागेसरी–नागसरी ज्ञानेश्वरकालीं पवित्र मानीत असून नागेश्वर आळंदीच्या पंचक्रोशींत येई हें दाखविलेंच आहे. गेल्या टिपणांत नागेश्वराजवळील कुंड हेमाडपंती देवळाजवळ असतें तसेंच असल्याचें सांगितलें. त्यास सबळ पुरावा मिळाला

* न. सं. पा. स. १८।६४

आहे तो असा कीं, त्या कुंडास ४५ पायऱ्या होत्या. अशा व इतक्या पायऱ्या असलेलें कुंड हेमाडपंती धर्तीचें असतें हा सर्वसाधारण सिद्धांतच आहे. त्याची पूर्वीच्या टिपणांत दिलेली दिशा किंचित् सरकविली पाहिजे. म्हणजे जेथें मारुतीचें देवालय व नागेश्वराचे पश्चिमेकडील द्वार यांचे दरम्यान अंदाजानें तें दर्शविलें तें जरा पुढें द्वाराच्या दुसऱ्या बाजूस प्रेक्षकांच्या उजव्या हातास आवाराच्या भिंतीसमोर येई. त्यास **नागतीर्थ** म्हणत व त्यांत स्नान केल्यास चर्मरोग वगैरे बरे होत. तें पुणें-म्युनिसिपालिटीनें पुढें डांस वगैरे होऊं लागल्यामुळें बुजविलें. त्याच्या थेट समोर हल्लींच्या नागझरींत पर्वणीच्या दिवशीं स्नानें करीत. पण ही—पूर्वीची नागसरित्—३०।४० वर्षांपूर्वीसुद्धां फार खोल वहात जात असे. नागेश्वराच्या वायव्येस जो दगडी बांधीव भाग दिसतो तो घाटाचा आहे. त्यास लागून मोटा चालत. त्यांच्या समग्र निशाण्या आहेत. या स्मशानावर हल्लीं घरें आहेत. पण पूर्वीची स्मशानभूमि सहज ओळखतां येते.

संत तुकाराम बोवा आपला मुक्काम श्वशुरगृहीं असतां श्रीनागेश्वराचे देवळांत कीर्तन करीत. त्या वेळीं त्याच्या ईशान्येस **अंगडशा** नांवाच्या फकीराचें ठाणें असे. हा नेहमीं बोवांची कुचेष्टा करी. पण ते तिकडे लक्ष देत नसत.

नागेश्वराचे पुजारीपण ८-१० पिढ्या **समकर्षी** घराण्याकडेच आहे. हल्लींचे रा. दत्तोबा समकर्षी यांचेजवळ जुनीं कागदपत्रें कांहीं नाहींत. इ. स. १८५८ त तीं जळाल्याचें सांगतात. तरी त्यांच्या नकला मिळविण्याची खटपट चालू आहे. तीस यश येईल तेव्हां खरें !

नागेश्वराचे देवालयांत अथवा त्यास लागून ज्ञानेश्वरकालीन अवशेष—नागतीर्था-खेरीज—माझे नजरेस पडले नाहींत. तथापि ते मिळण्याची माझी आशा नष्ट झाली नाहीं. नागतीर्थ-नागकुंड नीट उकरून तपासल्याखेरीज तें मूळच्या स्थितींत आहे किंवा कसें हेंहि नक्की सांगतां येणार नाहीं. पूर्वींच्याच दुरुस्त्या झालेल्या असतात किंवा नसतात, क्वचित् पूर्वींच्या धर्तीवरच नवें तीर्थहि बांधतात. तथापि कांहीं प्राचीन अवशेष त्यांत दडूनहि बसतात.

---

## १३२

# घारपुरे यांचीं घरें

[ श्री. शं. ल. वैद्य ]

घारपुरे घराणें हें मूळचें आकोळनेर, जिल्हा नगर, येथील असून तें नागपुरास गेलें. अशाबद्दल आमच्या दफतरांतील कागदांत उल्लेख आहे. या घराण्यापैकीं सध्यां

पुण्यांत असलेले पेन्शनर आय्. सी. एस्. रा. हरीभाऊ व त्यांचे बंधु आय्. एम्. एस्. पेन्शनर असून त्यांचे नातलग अजून नागपुरास आहेत. रा. हरीभाऊ यांजकडे तपास करतां यांचे पूर्वज बंगाल्यांतहि गेले होते व पेशवाईत यांचा रघुजी भोसल्याशीं संबंध आलेला कागदपत्रांत उल्लिखित आहे. यामुळें या घराण्याचें राहणें पुण्यास होतें त्यावेळीं त्यांचें राहणें **मुंजाबाच्या बोळासमोरील टोकेकराचे बोळांत** जो टोकेकरांचा वाडा आहे तेथें होतें. तो वाडा पूर्वी या घारपुरे घराण्याचा होता. तो त्यांनीं त्यास १८९१ सालीं कायमचा कागदपत्र करून दिला असें त्यांजकडून समजतें. यांचीं घरें नागपुरांत आहेत. या घराण्याचा व आमच्या घराण्याचा पेशवाईत फार निकट संबंध होता. पेशवाई बुडाल्यानंतर आमचा नागपूरचा सरंजाम मिळण्यासाठीं आमच्या तर्फे घारपुरे यांनीं पुष्कळ खटपट केली. पण यश आलें नाहीं. तेथील आमचे वाडे, बागा वगैरेंची त्यांनींच व्यवस्था केली आणि विशेषतः पेशव्यांचे तर्फे नागपूर दरबारीं वकिली करीत असतांना आमचें जें दफ्तर तेथें होतें तें त्यांनीं वाईस पाठवून दिलें. त्यास याने घराण्याचीहि मदत झाली. अशाचा मीं आमच्या दफतरांतील कागदांच्या पहिल्या खंडांत दप्तराबद्दल लिहिलेल्या लेखांत दिलें आहे; त्याच खंडांत **मल्हारराम घारपुरे** यांचीं ५१७ पत्रें छापिलीं आहेत. रा. हरीभाऊ घारपुरे यांचे हे पूर्वज असावे असें वाटतें. पेशवे दफतर भा. ४३ ( पत्र क्र. १६ ) मध्यें एक पत्र छापलें आहे. त्यांत **मल्हाररामाच्या** मुलाच्या वागणुकीची तक्रार दिली आहे. व ते पुण्यांत शुक्रवारांत राहांत असत असें म्हटलें आहे. याचा जास्त माहिती म्यु. पा. घरपट्टी रजिष्टरांत पाहिली पाहिजे.*

---

## १३४

### करकरे

हें घराणें कऱ्हाडे असून यांचा वैद्य घराण्याशीं २।३ पिढ्यांचा संबंध दिसतो. ते विश्वनाथ भट वैद्याचे दिवाण म्हणून संबोधिलें आहे. रा. हरिभाऊ घारपुरे हल्लीं नारायण पेठ घर नं. ३४४ मध्यें राहतात ते घर गाडगीळ यांनीं खरेदी घेतलें आहे. त्या पूर्वी तेथें वस्ती नव्हती. घराचे चौथरे होते. तें घर **करकरे** यांचें असावें असें त्यांचें म्हणणें आहे. याबद्दलहि जास्त माहिती पाहिजे.*

---

न. सं. पा. सं. ८।६६

१३५

# नानाहौदाजवळचा थत्तेवाडा

( श्री. शं. ल. वैद्य, पुणें )

नं. १५८६ श्री नकल { श. १७६० चैत्र वा ३०
ले. २ { इ. १८३८ एप्रील २४

शहर पुणें पेठ कसबा येथें लिलांव

*जाहीरनामा सरकार दौलतमदार कुंपणी इंग्रज बाहादुर वि॥ ज्यार्ज उलियंम का॥ **फोर्ड साहेब** बाहादुर आगटिंग अशिष्टन ज्याडज आदालत जिल्हा पुणे वियमान विष्णू पद्माकर मुनसफ कोडतांत

| वादी | प्रतिवादी |
| --- | --- |
| शुकशास्त्री बिन गोपाल शास्त्री **व्यास वाईकर** | बापूजी हरी **थथे** मयत यांचे वारसपुत्र अमृत राव बापूजी थते वा॥ पेठ कसबा |

तारीख ६ माहे आगटंबर सन १८३७ ईसवी रोजीं कोडतानीं निवाडा ठरविला त्यांत वादींस प्रतिवादीनें रुपये ३४१ यावे ते खेरीज खर्च प्राा॥कडे येणें त्याजवरून मिलखत जफ्त जाहली ती येणेप्रमाणें बितपशील

१ पेठ कसबा येथें **नाना फडणीस** याचे वाड्यासमोर हौदानजीक प्राा॥चा वाडा समाईक भावाचा आहे त्यापैा॥ उतरेचें बाजूचे बाहेरचे चौसोपीचे खण जप्त केले ते दुमजला व क ( कौ ) लारी

१ पूर्वेचा सोपा खण ६

१ पश्चमेच्या सोप्याचे खण ५ त्यांत चाफे खण १ आहे च्यार खण मध्यम आहेत यां खण ५

१ उतरेचा सोपा खण ३

१ बाहेरचे दरवाज्याचे खण ४

दुमजला सोपा आहे खण मोठे आहेत

४

० लग

सदर्हू मिलखत जप्त जाहली यास्तव या नोटिसीनें कलविनो की जर कोणी घेणारास किंवा नाखरास खरे करून देईन की या मिलखतीवर माझा दावा आहे किंवा

*न. सं. पा. स. १०१६५

र्मा या दाव्याची फिर्याद कोडतात केली आहे असे सरटीफिकट व दाखले अथवा लिलाव लावयाचे दिवसापासून तीस दिवसांचे आत मी दाव्याचे फिर्याद न केल्यास अमुक रुपये दंड देईन असा करार न करील तरी ही जमी केलेली मिलखत व तारीख ९ माहे मे सन १८३८ इसवी रोजी पेठ कसबा येथे विकली जाईल हे तहकीक समजावे जाणिजे ब तारीख २४ माहे एप्रेल सन १८३८ इसवी

नीलकंठराव माळी
नाजर

---

# १३६

# पुण्यांतील पेठा इत्यादी

( श्री. **चिंतामण बळवंत लेले**, बी. ए. हिस्ट्री ऑफिसर सं. धार. )

*सदर याद ज्या सोबत पाठविली गेली तें पत्रहि धार ऐतिहासिक दप्तरखान्यांतील होय. भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें, या संस्थेनें पुणेंनगरसंशोधनसमिति स्थापन करून तिचें कार्य मंडळाच्या कार्यक्षेत्रांतर्गत म्हणून चालूं करण्यांत आलें. त्या समितीच्या आतांपर्यंतच्या कार्याचा अहवाल " पुणें नगर संशोधन वृत्त " या सदराखालीं मंडळाकडून आपल्या त्रैमासिकांत ( वर्ष २२ अंक ३–४ ) प्रसिद्ध करण्यांत आला. पुणें हें ऐतिहासिक आणि राजकीय दृष्ट्या राजधानीचें शहर असल्यामुळें त्या नगराचें संशोधन होणें आवश्यक ठरतें. या गोष्टीचें महत्त्व लक्षांत घेतां सदर कागद या नगरसमितीला उपयुक्त होईल; या हेतूनें सभेंत वाचनासाठीं पाठवीत आहें. धार संस्थानचे राजे **रामचंद्रराव पवार** निवर्तल्यावर गादी पुढें कशी चालवावयाची हा प्रमुख प्रश्न तत्कालीन कारभारी मंडळापुढें व राणी **मैनाबाई पवार** यांचेपुढें येऊन ठेपला. दक्षिणेंत पुण्याचे जवळील **मलठण** गांवीं उदाजीराव पवार १ ले यांचे वंशज राहात असत. त्यांचे पणतु श्रीमंत **यशवंतराव ऊर्फ भाऊसाहेब मलठणकर पवार** यांना तीन पुत्र असल्यामुळें साहजिकच **थोरले मल्हारराव ऊर्फ रावसाहेब** यांस **रामचंद्रराव पवार** यांचें कुटुंब **अन्नपूर्णाबाई** पवार यांचे मांडीवर यशवंतराव या नामाभिधानानें यथाविधी दत्तक घेण्यांत आलें. तेव्हांपासून धारकर व मलठणकर या दोन घराण्यांचे संबंध निगडित करण्यांत आले. **यशवंतराव भाऊसाहेब** हे मोठे राजकारणी आणि कर्ते पुरुष होऊन गेले. त्यांनी कांहीं दिवस धारची दिवाणगिरीहि केली होती. पण पुढें ते मलठणास राहूं लागले. त्यांनीं आपल्या मुलाशीं केलेला बराच पत्रव्यवहार आज उपलब्ध होत आहे. त्याचा बहुतेक पत्रव्यवहार माहितीपूर्ण व

* न. सं. पा. स. १०।६५

लांबलचक असल्यामुळें संशोधकांना मोठा मनोरंजक, बहुविध विषयांबद्दल तत्कालीन माहितीनें भरलेला असाच अतएव उपयुक्त ठरेल. ज्या पत्रासोबत ही पुण्यांतील वार, पेठा, पुरे, गंज इत्यादींची यादी जोडली आहे, तें पत्र **श्रीमंत यशवंतराव भाऊसाहेब** मलठणकर यांनी आपल्या चिरंजिवास ( श्रीमंत महाराज यशवंतराव २ रे ) धारेस पाठविलें आहे. या पत्रांत आणखी हि मनोवेधक मजकूर आहे. या पत्राची तारीख २० डिसेंबर १८४७ येते. याच पत्रांत खालील महत्त्वाचा उल्लेख आहे. "ईमाम जयंती जाली. डोले एकंदर पावणे दोनशें सुमारीस लागले. स्वराज्यांत बाराशे बारा होत होते." या पत्रावर पैवस्तीहि लागली आहे. पोहोचल्याची ता. २८ डिसेंबर १८४७ येते. सोबत जोडलेल्या यादीवरून त्यावेळीं पुणें शहराची एकूण ७ वार, १० पेठा, १४ आळ्या, ५ पळी, ५ पुरे, ६ खाने, ३ बाजार इत्यादि भागांत विभागणी प्रचलित होती असें दिसतें.

या पत्रालगत आणखीहि कांहीं लहान लहान कागदांचे तुकडे, टिपणें केलेलीं मिळालीं. त्यांत पुणें नगर संशोधन समितीच्या कार्याच्या दृष्टीनें कांहीं माहिती महत्त्वाची वाटल्यावरून खालीं देत आहें.

नगरसंशोधनवृत्तांत जी पुण्यांतील देवस्थानांची यादी दिलेली आहे ( पृ. २८ ) त्यांत गणपतीच्या स्थानांत **कसब्यांतील गणपतीस** अग्रस्थान दिलेलें आहे. त्यांत भाद्रपद शुद्ध १५ शके १७७७ च्या यादींत ( ता. २५ सप्टेंबर १८५५ ) श्रीमंत **भाऊसाहेब मलठणकरांनी** देवळास चौकट गोटीदार व मेहेरप चांदीचे मुलाम्याची पितळी सिंहासन व कपाळपटी गळव्याची केल्याचा उल्लेख आहे. त्याप्रीत्यर्थ त्या वेळच्या भावाढावाप्रमाणें रु. २३८-०-३ खर्च झाला. या त्या वेळच्या कारागिरांचीं नांवेंहि उल्लेखिलेलीं आहेत. यादींत कांहीं काम रात्रीं केलें गेलें यास्तव समयांस लागलेल्या तेलाचाहि खर्च खर्चीं पडला आहे. काम चालू असतांना गवंड्यांना तांबटांना सुटी करू न दिल्यामुळें त्यांस खावयास फराळाचे सामान दिलें गेलें आहे. सिंहासन व चौकट बसविली जात असतांना कारागिरी माणसांची स्पर्शास्पर्श झाली असेल. यामुळें देवास अभिषेक व ब्राह्मणास भोजनहि देण्यांत आलें त्याप्रीत्यर्थहि खर्च याच यादींत आहे. शेकडा २० रु. या हिशोबानें ६० ब्राह्मण असामींचें नांवें रु. १२ खर्च पडले आहेत. यादी अत्यंत खुलासेवार लिहिलेली आहे यांत संशय नाहीं. यावरून अगदीं इंग्रजी अमदानीच्या सुरवातींत जमाखर्ची पद्धत परंपरेनें किती सुव्यवस्थित होती हें दिसून येतें. याप्रमाणें श्रीमंत भाऊसाहेब मलठणकर पवार यांनी पुणें शहरांतील आणखी कित्येक मंदिरांची कांहीं ना कांहीं दुरुस्ती केलेली असेलहि. सध्यां ऐतिहासिक पत्र-संग्रहाचें काम चालू असल्यामुळें या विषयावर आणखीहि कागद अधिक प्रमाणांत उजेडांत येण्याचा संभव आहे. यथासमय मंडळापुढें ते मांडण्याचा अवसर येईलच. या॰

शिवाय पुण्यांतील **तुळशीबाग रामाचे** मंदिराचे दाराचे चौकटीवर पितळी पत्रे बसवून चांदीचा मुलामा चढविण्यांत आला त्याच्या आकाराची एक यादी मार्गशीर्ष फ. १२६५ शक १७७७ ची उपलब्ध झाली आहे. सदर कामाला एकूण २९०-०-९ खर्च झाला आहे. याशिवाय कपाळपट्टीहि बनविलेली आहे. या कागदालगतच गळ्यांत कांहीं दुसऱ्या याद्याहि आहेत. या याद्यांत श्री क्षेत्र **आळंदी येथें** नंदादीपाकरितां पितळेच्या समया करून दिल्याचे उल्लेख सापडले ( कार्तिक शक १७७७ संवत १९१२ ).

या कामाव्यतिरिक्त खालील तुरळक कामांच्या उल्लेखाच्या याद्या उपलब्ध झाल्या आहेत. त्यांचा त्रोटक तपशील पुढीलप्रमाणें, माहिती या दृष्टीनें मंडळापुढें सादर करीत आहें.

१ यादी **श्री. रखमाबाई श्री क्षेत्र पंढरपूर** यास प्रभावळ चांदीची केली ( आश्विनमास शक १७७७ संवत १९१२ गुा **नारो सखाराम देखणे** ) या कामार्थीत्यर्थ एकूण रु. ११८४-१२-० खर्ची पडले आहेत.

२ यादी श्री **आळंदी** येथील देवालयांत श्री ज्ञानेश्वराचे समाधीमागें श्री. विठ्ठल रखमाबाईच्या मूर्ती आहेत त्या कमानींतील चौकट मुलाम्याची केली त्याजकडे तांबें व वर्ख व लागवड खर्च लागल्याचा आकार रु. ९०-७-३ ( श्रावण शक १७७७. )

३ यादी **श्री जेजूरी** येथें दरवाज्यास चांदीची चौकट बसविली त्याजवर नवीन कपाळपटी त्याचा आकार रु. ६४-७-६ ( आश्विन शक १७७७ संवत १९१२ ).

प्रस्तुत कागद पुणेंनगरसंशोधनास उपयुक्त; अतएव वर दिलेल्या याद्यांचा पाढा पुढें न वाढवितां तूर्त येथेंच पूर्णविराम केलेला बरा. सोबत जोडलेल्या यादीचा मंडळास उपयोग होईल, असा भरवंसा आहे.*

ले. ३ श्री

यादी कसबें पुणें येथील वार, पेठा, पुरे, गंज, आळीवळी वगैरेचा तपशील

| **७ वार** | **१० पेठा** | |
|---|---|---|
| | | १ भवानी पेठ |
| १ आदितवार | १ सदाशिव पेठ | १ न्याहाल पेठ |
| १ सोमवार | १ नारायण पेठ | १० |
| १ मंगळवार | १ नानाची पेठ | **५ पुरे** |
| १ बुधवार | १ रास्ताची पेठ | १ गोसावीपुरा |
| १ गुरुवार | १ गणेश पेठ | १ मेहुणपुरा |
| १ शुक्रवार | १ वेताळ पेठ | १ मुजावरपुरा |
| १ शनेवार | १ नवी पेठ | १ कारकूळपुरा |
| ७ | १ घोरपड्याची पेठ | १ कामाठपुरा |

१ कसबा
१ काळवावर
१ गारपीर

**२ गंज**

१ कापडगंज
१ मीठ गंज
२

१ बावन खणी
१ खजिन्याची विहीर
१ चेट
७ नाकइन्या सुमारी सात

**१४ आळया**

१ चख( ढ ? )ई आळी
१ गायेआळी
१ ढोलकरआळी
१ लोणारआळी
१ बुरुडआळी
१ शिंदेआळी
१ माळआळी
१ कासारआळी
१ तपकीरआळी
१ दाणेआळी
१ तांबटआळी
१ गोळी ( गवळी ) आळी
१ कातरआळी
१ साकलकरआळी
१४

**५ वळी**

१ तांदूळवळी
१ कापडवळी
१ खणवळी
१ बोंचीलवळी
१ मछवळी
५

**३ बाजार**

१ मेणबाजार
१ मंडई बाज़ार
१ सदर बाजार लस्करात
३

२ कुभारवेस–धरण

**६ खाणे**

१ तोफखाना
१ तालिमखाना
१ सबुदरखाना
१ आमरखाना
१ गाडीखाना
१ जमातखाना
६

---

## १३७

# कुणबिणीस कोतवाली चौत्रा चिठ्ठी

[ श्री. कृ. वा. पुरंदरे, सासवड ]

*जुन्या अमदानींत कुणबिणीचा वर्ग असून त्या वर्गाची उत्पत्ति–स्थिति यासंबंधी मीं व इतरांनीं या पूर्वीच बराचसा ऊहापोह केला आहे. हीं सोबतचीं पत्रें या वर्गासंबंधीं जरा जास्त माहिती देत आहेत. ‘ सांडसत ’ मिळविलेल्या स्त्रीनें मुहूर्त लावावा अगर पावित्र्य संभाळून जन्म घालवावा. पण तिला बदअमल करितां येत नाहीं. तिचें वाकडें पाऊल पडून बदअमल तिच्या अंगीं लागल्यास तिला व तिच्या सोबत्यास गुन्हेगार समजून गुन्हेगारी द्यावी लागे. गुन्हेगारी भरल्यावर ती कुणबिणीच्या सदरांत पडे व तिला शहराच्या कोतवाली चौत्र्यांतून चिठ्ठी मिळे. चिठ्ठी मिळाल्या-वरच कुणबिणीची भूमिका अमलांत येई. या विषयाचा सामाजिक अभ्यास करणारास हीं दोन्हीं पत्रें बरींच उपयुक्त होतील.

*न. सं. पा. स. १४।६५

ले. ४ } श्रीगजानन { श. १७०१ श्रावण शु॥ १५<br>इ. १७७९ आगष्ट २६

चिठी कोतवाली चौत्र शहर पुर्णे विा राजश्री **आनंदराव कासी** ता॥ **भवानी कोम त्रिंबकजी सेलार** वस्ती नारायेण पेठ शहर मार सुा समानीन मया व आलफ जावजी आढाव वस्ती पेठ मार हा तुझे घरीं येऊन बदकर्म करीत आसे हे बातमी कलल्यावरून तुझे घरातून तुजला व **जावजी** यास येक बिछान्यावरून मध्यरात्री चावडी वेतालपेठ येथे धरून आणिली जावजी मार याणे आपले खंडाचा गुता उगविला तुजला खंडाचा तगादा केला तेव्हां तू विनाति केलीस कीं मजपासी काही द्यावयास पैसा मिलत नाहीं व माझे दादल्यानें सांडसत दिल्हें आहे त्यास वर्षे आकरा बारा होत आली व मजपासून बदराहा वर्तणूक बहूत जाहाली जात जातीत घेइनात पालिता पोसिंता कोणी नाहीं मी शंभर रुपये जावजी कडून देवीतयें मजला चिठी करून देविली पाहिजे त्याजवरून मनास आणितां तू तलेगावी दादल्याजवल होतीस तेथून निघोन येऊन पुण्यास आलीस त्यास वर्षे पंधरा जाहाली च्यार वर्षे मोल मजुरी करून होतीस पुढें कासी कुंभार पेठ मंगलवार याजबरोबर बदराहा वर्तणूक करून **लक्षुमण विश्वनाथ बर्वे** याजकडे धरली गेलीस त्याणी खंड घेतला व तुझे दादल्यास तलेगावीहून बोलाऊन त्याचे स्वाधीन तुजला करीत होते त्यास तो कबूल करीना की हिणे आपणास नपुशकपणाचा दोश ठेविला तेव्हा तुजकडून रुपये १५० दीडशे त्याजला देवऊन तुजला सांडसत करून देविलें त्यास वर्षे बारा होत आली ते पत्र तू आणून दाखविलेस पुढें पाट लावावा तो न लाविता **वाघोजी सिंदा** पेठ मार याचे घरी आठनऊ वर्षे राहोन त्यासी बदराहा वर्तणूक करूं लागलीस हे कलल्यावरून तुजला धरून आणून कोतवालीकडे खंड घेतला कीं फिरोन येसे न करणें पुढे सोये धरावी ते न करिता जावजी मार याजबरोबर बदराहा वर्तू लागलीस तू आपल्या खंडाचे रुा १०० शंभर जावजी मार याजपासोन देविलेस आणि चिठी मागितली त्यावरून हे चिठी तुजला सादर केली असे तरी तूं **जावजी आढाव** याजपासी सुखरूप राहाणे गैरवाजवी उपद्रव होणार नाहीं जाणिजे छ १३ साबान *मोर्तबसुद

मोर्तब

सुद

बार

---

*अक्षर वेगळें

१३८

# गुरुवार पेठेचे कुलकर्णी

[ श्री. शं. ना. जोशी ]

ले. ५ } श्री

राजश्रिया विराजित राजमान्ये राजेश्री

**मोरोपंत दादा** स्वामींचे सेवेशी

पो **बापुजी मल्हार कुलकर्णी राजरुषी** का पुणे रुतानेक सा नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत आसीले पाहिजे विशेष गुरुवार पेठ राजश्री **जनार्दनपंत दादा** याजकडे आहे त्यास ते पेठेची वसाहात आमचे जमिनींत तेथील कुलकर्ण आमचे काही दिवस भोगवटा आम्ही केला होता आलीकडे करावयासी कोण्ह नाही म्हणून भोगवटीयासी आंतर झाले यामुळें **मल्हार नाईक कानेरा** याण पांचसें रुो नजर करार करून मखलासी करून घेतली हे वर्तमान आम्हास कललियावरी आम्ही रा **तात्या** व **बगाजीपंत देशपांडे** व **त्रिंबकपंत वर्तक** याजला पुढें ते मखलासी फिरऊन आम्हास कुलकर्ण द्यावे येविसि करार केला नजरेचे रुो द्यावे हे करार जाले **तात्यांनी** विनंती केली की आम्ही गंगेहून आलियावरी रुो देऊन कागद घेऊ येणे प्रो बोलोन यात्रेस गेले मागे पेठेची कमावीस ज्याजकडे आहे त्याणी रा **बालाजी नाईक भिडे** यांची भीड घालून आपल्यास कुलकर्ण द्यावे येसे ठगवून यादी करून घेतली हे आपल्यास कललियावरी **त्रिंबकपंत** वर्तक यांजला सांगितलें त्याणी रा **जनोबादादा** यांसी खटखट केली कीं आम्हासी करार केला आणि हे काय **केले** तेव्हां त्याणी सांगितले कीं आम्ही **बालाजी नाईक** याचे भिडेनें मखलासी केली तेव्हां **त्रिंबकपंत** म्हणाले की आम्हास उपाय सांगण मग **जनोबादादा** यांणीं सांगितले की **श्रीमंत रा बापूची चिटी** आणवणें म्हणजे तुमचे कार्य होईल त्यावरून चिरंजीव **नारोबा** आपल्याकडे येत होता परतु **जाधवाचा** खटला येथे पडिला आहे त्यामुळे ते येऊ देईनात म्हणून चिरंजीव **सदोबास** सेवेसी पाठविले आहे तरी वडिली रुपा करून **बापूस** विनंती करून सदरहू आन्वयाचे पत्र देवावे जैसें **यकब्रोटे** याच्या सेतखान्या विसीं आभिमान सेवटास लाविला तैसेच हेहि कार्य केलिया मी वतनदार गरीब आपल्या पदरचा आहे माझे सर्व प्रकारे चालवणे आवश्यक आहे तरी रा **जनोबा दादा** पत्र देवावे कीं दुसरे कोण्ही जे नजर देत आसतील ते न घेणे कुलकर्णी वतनदार आहेत यांचे वतन यांसच देवून ते नजर यांजवळून घेणे बहुत काय लिहिणें रुपालोभ आसो दीजे हे विज्ञापि*

---

* न. सं. पा. स. ६१६५.

१३९

# काकिर्डे घराणें

[ श्री. शं. ना. जोशी ]

ले. ६ }

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

**रघुनाथपंत** स्वामींचे सेवेसी

पां॥ **बाळाजी जनार्दन** साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता॥ छ १९ जिल्हेजपर्यंत जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें विशेष राजश्री **बाजीपंत काकिर्डे** यांजकडे तालुके **झांसी** येथील बक्षिगिरीची आसामी पेशजीपासून आहे ते आसामी यांचे पुत्राचे नांवें करार करून बेहेड्यास नेमणूक लिहिली आहे व हाली सरकारची सनदही दिल्ही आहे व पुण्याहून जाते समई याविसी तुम्हास सांगितले आहे त्या प्रमाणें बक्षिगिरीचे कामकाज यांचे भाऊ राजश्री **गोपाळ महादेव** तुम्हाजवल आहेत त्याचे हाते घेत जावे *बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.[1]

---

१४०

# गारपिरापासून वानवडी

[ श्री. शं. ना. जोशी ]

ले. ७ {

याद्री विजयादशमीचे मुहूर्तें सीं++++खासा स्वारी **गारपिरावरून** (वानव)डी पर्यंत गेली तेथुन मा ++++ रीं आली त्यास जातां व येतां फौजेच्या दलवटानें व तोफा स्वारीबरोबर होत्या त्याणे कसबे पुणें येथील शेतांची पायमली जाहाली त्याची पाहाणी गु॥ **बाळाजी कृष्ण रानडे** ++++++ छ ९ ( यापुढील कागदाचा खालील अर्धा तुंडा गहाळ आहे. )

सकोजी लडकज माली **गारपिराचे रस्त्याने** स्वारी जातां शेत सजगुरापैकीं अगदीं खराबी जाली तितकीच मोजणी केली लांबी रुंदी काठ्या सुमार

---

* अक्षर नाना फडणिसाच्या हातचें. १ न. सं. पा. स. १८।६५

| लांबी काठ्या | रुंदी काठ्या |
| --- | --- |
| २४ | ४ X |

आकार + + + याचे पिकाचा अजमास याचे बाकीचे शेत आहे तें पाहून त्याप्रों दाणें केली माप

८॥१

सात पायली

२ कसबे पुणे पायमली विज्या दशमी स्वारी जातायेता तुा इसने **बहिरजी ढोल्या** माळी गारीपराचे रस्त्याने स्वारी जाता शेत जोरीचे फोजे + + + + + थोडीबहुत खराची + + + ( तित ) कीच मोजणी केली

| किता | रुंदी | किता | |
| --- | --- | --- | --- |
| लांबी काठ्या | १७ | लांबी | रुंदी काठी |
| ३७ | १६ | ८० | दक्षण उतर |
| | ३३ | पूर्व पश्चिम | ६ |
| | पैकीं निमे | आकार जमीन बिघे | |
| | १६॥ | ८१८ X | |

बिघे ८१॥।॥

पौ। निमे शेते अविछिन आहे निमेची खराबी जाली तेव्हा दीड बिघा पैकीं बिघे ८॥। याचे पिकाचा अजमास *तशे उतमात सा। दाणे केली
मापे ८२

पैकीं एक हिसा अविछिन आहे दोन वाटे खराबी अगदी X तेव्हा सदरहू पौ। येक हिसा वजा होऊन बाकी दोन हिसे जमीन ८॥।१
याचे पिकाचा अजमास दाणे केला
मापे ८२
X X X मपटी पौ अ (विछिन) X X X
खराबी जाली ते X X X X अजमास पाड

८८२

[1]याचे पिकाचा अजमास दाणे केली ——
मापे ८।

---

१ न. सं. पा. स. १९।६४ * ' शेत ' ह्या शब्दाचीं हीं अक्षरें मागेंपुढें लिहिलीं गेलीं.

**खंडोजी बारका** माळी गारपिराचे रस्त्याने स्वारी जाता याचे सेतां पैकी खराबी जाहाली

जोरीचें शेत पैकीं तुडवलें ती ××× मोजणी केली

| लांबी काठ्या | रुंदी |
|---|---|
| ४८ | १२ |
| | १० |
| | २२ |
| | पैकी ११ |

–—बिघे ०१।११॰ या पैकीं निमे आबादान आहे

निमे गेलें त्याचें दाणें अजमासे केली माणे ०१।

तील येक पाड पैकीं ×××× अर्धपाड्याचे ××× अजमास केली ००॥

शेत सजगुरापैकीं खराबी जाली तितकी च मोजणी केली शेत किमानपक्ष

| लांबी काठ्या | रुंदी काठ्या |
|---|---|
| ३६ | २॥ |

–—कमी न (?) बिघे

पत्र क्र. २

श्री { श. १७१६ मार्ग शु. १५<br>इ. १७९४ दिसेंबर ६

मजर पाहाणी शिवार मौजे **वानवडी** ता। हवेली प्रां। पुणें येथें **माहादजी शिंदे** यांचा मुक्काम इ॥ सलास तिसैन ता॥ खमस तिसन कार्तिक अखेर पावेतों जाला त्याजमुळे फौजेचे तलाखाली जमीन सापडली लस्करच्या रहदारीच्या वाटा सेतातून पाडल्या त्याने तुडवण जाली व बैलानी व उटानी व म्हैसीनी मोवणें खालीं त्याचा आजमास सु॥ खमस तिसैन मया व आलफ मार्गशीर्ष शु॥ १५ सिवजी पा॥ जखताप वगैरे गांवकरी जमीन निरस माल——————————————————रुके

॰॥४॥ लस्करचा तल गांवापासून ओढ्याचे पश्चमेस माल जमिनीत पडला, तेथें भिती घालून छपरें घातलीं व कांहीं कौलारे केली त्याचे खाली जमीन आजमासे रुके

०२ तुकोजी जखताप

०२ सटवाजी जखताप

०२ सिवजी जखताप

०२ बहिरजी जखताप

०८॥ बिठोजी व त्रिंबकजी जखताप

०६ कि॥ **कोढव्याचे** सिवेकडे रुके ४ पै॥

०२॥ कि॥ आलीकडे रुके ॰।॰ पै॥

०८॥॰

८१॥ सोनजी माली जाम्बुलकर
८२ तुकोजी जखताप
८३ विठोजी जखताप
८३ बहीरजी जखताप
८॥ वडजोजी केदारा
॥४॥

८॥ गावचे पूर्वेस माळ जमिनी नीरस होत्या त्यात मोघणे तुरीची व हुलग्याची होती व गांव सेंजारी जमिनींत पावस्यांची मोघणें होती ती चारली व वाटा रहदारीच्या पडल्या सा॥ अजमासे ——— रुके

८५ गावाजवळ दक्षणेचे बाजूस पट्या पूर्व पश्चम आहेत त्याचे पूर्वेचे आगे पावस्यांची वगैरे मोघणे होती ती चारली व वाटा पाडल्या सा॥

८१ तुकोजी जखताप
८१ सटवाजी जखताप
८१ सिवजी जखताप
८२ बहिरजी जखताप
८५

८१०॥ माल नीरस जमिनींत मोघणे होती ती चारली व वाटा पडल्या त्यानें तुडवण सा॥ ——— रुके

| | |
|---|---|
| [1]८२ सिवजी पा॥ जखताप | ८१ वडजोजी केदारा |
| ८१ सिदोजी जांबुलकर | ८१ कुसाजी जांबुलकर |
| ८॥ हरी जांबूलकर | ८॥ येसू जांबूलकर |
| ८॥ बालकृष्ण वर्तक | ८। जोगू जांबुलकर |
| ८१ सोनजी जांबूलकर | ८॥ देवजी सेलार |
| ८॥ विठोजी त्रिंबकजी | ८॥ वोल्होजी कडू |
| ८१ महादजी चौगला | ८। सटवाजी जखताप |

८१०॥

॥३॥

१ ही १४ नांवें कागदांत एकाखालीं दुसरें अशीं आहेत. येथें अशीं दुकालमी घेतलीं आहेत.

८४॥ **सिलंगणा करितां सिद्याची स्वारी** गेली व पुण्याकडून स्वारी आली त्याचे दलवटामुले बाजरीचा ततनस जाला व॰ भोधणे लस्करच्यानी चारली सा॥ गांवाचे पश्चमेस लस्कराचे उत्तरे कडील सेते ———— रुके

८॥॰ बहिरजी चौगुला
८१ धर्माजी चौगुला
८१ रघोजी जाबुलकर
८१ राजोजी जाबुलकर
८॥॰ मोराजी जाबुलकर
८॥॰ राणु कदम

८४॥॰

१८॥॥॰

| येकंदर वसूल बाकी | जमीन अज रुके | रुके वजा पायेमाली | बाकी मोटस्थल व जिराईत |
|---|---|---|---|
| [1]तुकोजी जगताप | ८६ | ८३ | ८३ |

# १४१

# देवळालीकरांचें घर

**[ श्री. चिं. ग. कर्वे ]**

*या देवळालीकरांचें घर व देऊळ अद्यापि शुक्रवार पेठेंत काडिया धर्मार्थ दवाखान्यासमोर आहे.

ले. ८ } *श्रीरामप्रा॥ {श. १७५९ भाद्र. वद्य ८ / इ. १८३७ सप्टें. २२

अर्जी बुक नंबर ३४४५

यादी **नारायेणराव रामचंद्र तुलसीबागकर** कसबे पुणे सु॥ समान सलासीन मया तैन व अलफ कारणे याद लेहून दिल्ही ऐसी जे **कचो रघुनाथ देवळालीकर** वा॥ **पेठ शुक्रवार** शेहर पुणे याजकडे आमचा यैवज येणे त्या पो॥ रकम रुपये १५०० पंधरासे यास मा॥निल्हेनी आपले घर पेठ मारी होते ते आम्हास पंधराशाचे यैवजी लाऊन देऊन घराचे खरेदीपत्र व याद व सरकारचें कवलेपत्र देवलालीकर यानी करून घेतले होते ते व आपले खु॥ पत्र येकूण च्यार कागद आम्हास भोगवटियास देऊन घर

१ ह्या पुढील यादी घेतली नाहीं.

आम्हास दिल्हे त्याप्रमाणे आमचे वडील घराची वहिवाट करीत गेले व शके १७१० चे साली त्या घराची चाभई वगैरे दागदोजी बा। खर्च करून इमारत नीट केली ती इमारत पुढे मोडकळीस येऊन पडली हल्ली जागा खुली आहे त्यास सरकारातून पेठ मारीं जागा सुमारी पंनास लिलावें करावयाचे आहेत म्हणोन जज्यडसाहेब याणी जाहीरनामा ता। २० माहे सप्तंबर सन १८३७ इसवीचा लागला त्यात तारीख २५ सोमवार माहे मारी सदरहू जाग्याचे लिलावे होणार म्हणोन लिहिले त्यात ही जागा कचो रघुनाथ याची लिहिली ती जागा आमची आहे त्यास नेमले तारखेस सदरहू जाग्याचे लिलावे होणार त्या पो। कचो रघुनाथ याचे जाग्याची तहकुबी होऊन ती जागा आमची आहे येविसी कागदोपत्री चौकसी होऊन आमची जागा आम्हास देविली पाहिजे ता। २२ माहे सप्तंबर सन १८३७ इसवी

*सही नारायणराव रामचंद्र दस्तुर खुद्द

[1]यास जाच

सदरहू प्रकर्णी तुम्ही मेहेरबान जड्जसाहेब यास मजकूर जाहीर कर्णे म्हणजे साहेब मोसूफ तजवीज पाहातील ता। २५ सप्टेंबर सन १८३७ इसवी*

( सही इंग्रजी )

[ तुळशीबागदप्तर ]

---

१४२

# नदींतील धारसिवेचा तंटा

[ श्री. चिं. ग. कर्वे ]

ले. ९ } श्री { श. १६९७ पौष शु. १४
{ इ. १७७६ जाने. ४

*इा। बा। मोकदम मौजे दापोडी ता। हवेली प्रां। पुणे सन ११८५ कारणे साहेबांचे शेवेसी कतबा लेहून दिल्हा ऐसा जे मौजे दापोडी ता। मार यांचा व आमचा नदींतील धारसिवेचा काजिया साहेबापासी पडिला त्यास धारेची चलबिचला वाळू कुळवलीया-मुळे जाली याकरिता साहेबी मौजे सांगवीकर तीवंधेकरी हे बोलाऊन त्याचे माथां बेल भंडार व शफत घालून त्यास सालमारीची धार पकी कोणे जागा ठरायाची ते जागा पुसावी ते सत्येकडून सागतील ते जागा धार घालावी धारेपलीकडे त्याचे आगों त्यानी आनभवावे व आलीकडे आम्ही आनभवावे पेस्तर साली वाळूची चलबिचल

*अक्षर नारायणराव तुळसीबागकरांचें. १ अक्षर भिन्न. * न. सं. पा. स. २५।४।८५

त्याणी आगर आम्ही न करिता जी धार नदीच्या पाण्यामुळे पडेल त्यात पकी ठरले ते धारे प्रो वर्तणूक करु याप्रो मान्य होऊन हा कतबा लेहून दिल्हा असे त्याप्रो वर्तणूक करू नवदिगार करू तर साहेबाचे गुन्हेगार हा कतबा लेहून दिल्हा सही छ १२ जिलकाद निा नागर

कतबा मा। रघोजी नाईक सोरटे नाईकवाडी कसबे मार आपण गोहीस असो

( नांगराची आकृति )

( आडवी ओळ ) चिा। कासीनाथ गंगाधर देशपांडिये प्रा मा।*

[ —तुळशिबाग दप्तर ]

---

## १४३

# सरकारकडून जागामोजणी

[ श्री. चिं. ग. कर्वे ]

ले. १० श्री { श. १७१५ ज्येष्ठ शु. १२ / इ. १७९३ जून २२ }

*पुरसीस बापु सेटे व खंडोपंत कुलकर्णी पेठ गुरुवार दर जागा का। पुणे सुा आर्बा तिसैन मया व अलफ पेठ मजकुरी सुमाना गवडा याची घरजागा होती ती चिटको मल्हार याचे कारकार्दीत केसोपंत नेवासकर यासी देऊन त्याचे मुबादला पेठ मजकुरी गवडा मजकूर यासी जागा कोणाबाबद × × × त्यास वर्षे किती × × × × × नेमून देणे ती तुम्ही × × × ग्यावर जाऊन उमे राहून नेमून दिल्ही त्या प्रोच गवड्याने बाधली किंवा कमज्याजती बाधली येविसीचा मजकूर तपसीलवार लेहून देणे छ २२ जिलकाद

२

(हस्ताक्षर वेगळे) –याचे उतर बापुसेट सेटे पेठ मार याणी लिहून दिल्हे असे जे सुभानजी गवडे याजला मोबदला जागा पेठ मारी श्रीमंत राजश्री कैलासवासी जनार्दनपंत दादा याणी द्यावयाची आज्ञा केली त्यास आदमासे दाहा व × × × × लाचे स्मरण नाही परंतु सरकारचे आ × × × साळ्याईच्या सेजारी गतकुली जागा दोन कुणबी राहात होते ते काहाडून गवडे मार याजला जागा नेमून दिल्ही ते समई आमचे बराबर पिली प्यादा व चालो गायकवाड हे बराबर होते याचे विा छेपरें काहाडून गवडे मारास जागा नेमुन दिल्ही व त्याची यादी मी आपले हातची हदमद दुदीची करून दिल्ही त्या यादीवर दादानी मखलासी करून दिल्ही त्या यादी प्रो

* न. सं. पा. स. २५।४।४५

गवडा मार याणे पर चाधले त्या आलीकडे आडोसा पडोशाचा बोभाट आला नाहीं यासी सुभा ××× मार याऱ्या हावाला केली ती त्यास पु (रसीस) (वे) ×××× लिहून दिल्हे सही तारीख छ मो ××× **नरसिह सिगरे** ××

[तुळसीबाग दप्तर]

---

## १४४

# तुळशीबागकरांना पेनशन

[श्री. चिं. ग. कर्वे]

[पुण्याचे **सुभेदार** नारो आप्पाजी यांच्या मुलालाच ब्रिटिश सरकारांतून पेनशन मिळावें हा दैवयोग! ]

ले. ११ श्री श. १७४१ पौष वद्य १ / इ. १८२० जाने. १

" This is to certify that a pension of Rupees six hundred /600/ per annum for life and during good behaviour, has been granted by the British Government to the Bearer **Ramchunder Narrain**, son of **Narro Appajee**, native and Patail of the village **Padlee**, in the district **Wye**. This Pension to commence with the present Fuslee viz ' the 6th June **1819**.

Poona, 1st January 1820.

Sd/ चॅप्लिन
**लाखी सील**

ले. १२ श्री

सरकार दौलतमदार कंपनी इंग्रेज बाहादर

वा ईस्म **रामचंद्र नारायण नारो आपाजी** याचे पुत्र मूळ वस्ती मौजे **पाडली** संमत **कोरेगांव** प्रांत **वाई** हाली वस्ती **पुणें** यांसी सालीना रुपये ६०० मोचलग साहाशें रुपये ताहयात आणि वर्तणूक चांगली आहे तोपर्यंत कंपनी सरकारांतून मोकरर करून दिल्हे असे तरी याप्रमाणे या फसलीचा पुरु छ ६ जून सन १८१९ इसवीपासून पोहचत जाईल जाणिजे तारीख छ१ जनवरी सन १८२० इसवी मुताबीक सन १२२९ फसली सुरु अशरीन मयातैन व अलफ मुकाम पुणें

Compared (इंग्रजी सही)

[रामचंद्र नारायण यांच्या मृत्युनंतर त्यांच्या मुलास तीनशें रुपये पेनशन केलें.]

(अलीफ) नंबर ८

**सखाराम गोपाळ**

---

१ न. सं. पा. स. २।१।१८५

ले. १३ (अलीफ) श. १७४९ कार्तिक व. ३०
इ. १८२७ नवं. १९

साहेब मेहरबान दोस्ता **नारायणराव रामचंद्र खिरे** सलम हु

दकार अजी सोंव **राबर्टसन** साहेब बाहादूर कलकटर सुभा **पुणें** सलाम बाआद्ज सलाम अंकी दिगर **रामचंद्र नारायण** यास सरकारानून पेनसीन ताह्यात रुो २०० साहाशे होते ते मृत्य पावले नंतर आपण हुजूर यादी दिल्ही त्याजवरून सरकारात लिहून पाठविले सरकारचा हुकूम आला की रामचंद्र नारायण मृत्यु पावले त्या तारखेपासोन त्याचे पुत्र **नारायणराव रामचंद्र** यास दरसाल रुो ३०० तीनशे रुो उमरपर्यंत देत जाणे म्हणोन आला तो आपल्यास कलला पाहिजे म्हणोन त्याजवरून हे पत्र आपल्यास लिहिले आहे तरी हुजूर खजिन्यातून आपल्यास तीनशे रुो सालिना पेनसीनाबद्दल ताह्यात पर्यंत पावतील गा व तारीख १९ माहे नवंबर सन १८२७ इसवी ज्यादा काय लिहिणे प्यार मोहोबत असों यावी हे कितावत

\+ अक्षर भिन्न ( इंग्रजी सही राबर्टसन )
[तुळशीबाग दप्तर]

---

## १४५

# भिकारीदासाचा बंगला

[ श्री. **चिं. ग. कर्वे** ]

[ ***याचा उल्लेख** खालील पत्रांतून आहे. हीं वाडगीं कोठें येनात ! ]

१

ले. १४ श्री श. १७५० आश्वीन शु. १५
इ. १८२८ आक्टो. २३

नकल

मो **मल्हारजी सिंदे बीन गंगाजी सिंदे** सा। **कालेवावर** नजीक **भिकारीदासाचा** बंगला यासी **तात्या धर्माधिकारी** को। पुणे त्याहावया कारणे जे तुम्ही आम्हापासी येऊन बोलला की तुमचा वाडा पेठ **सदाशिव** येथे आहे त्यात दोन वाडगी आहेत ती आम्हास उदमाकरिता यावी ती वाडगी तुम्हास उदमाकरिता दिल्ही त्याचा ठराव सालाचा मक्ता रुो ८ याचे हफ्ते चैत्र शुा १५ रुो ४ व आश्वीन शुा १५ रुो ४ येकूण रुो आठ हाप्त्याचे हाप्त्यास फडशा करून देत जावे यास करार पांच वर्षे तुम्हाकडून घालमेल होणार नाही तुम्हापासून आंतर

* २५।४।४५ नं. सं. पा. स.

पडल्यास आम्ही आपला पैका कराराचा तुम्हापासून घेऊन तुमची घालमेल करू तुलसीच्या वाफचास पाणी देत जावे आलवाची खास वाडग्यात आहे त्याल आलू तुम्ही लावावे त्यातील उत्पन्न आम्हास द्यावे आणि तुम्हीही घ्यावे चिंचेची शेवग्याची झाडे व डाळिंब्याची व कवठाची वगैरे झाडे वाडग्यात आहेत त्याचे सं[रं]क्षण करून चिंचा वगैरे आम्हास आणून देत जावे त्याचा संमध तुमचा नाही वेहरीची वडव पडल्यास तुम्ही करावी लाकूड लागल्या आम्ही देत जाऊ मिा आस्वीन शुा १५ शके १७५० सर्वधारी नाम सवत्सरे हास्त अक्षर **बाबाजी सिवाजी मांडवगणे**

२

ले.१५      श्रीगो प्रा      {श. १७५२ मार्ग. शु.१०<br>{इ. १८३० नोव्हे. २५

गंगाभागीर्थी मा। **सईबाई धर्माधिकारीन**

आज्ञाधारक **मल्हारजी बीन गगाजी सिंदे** माली वस्ती काले वावर नंजीक भिकारीदासाचा बगला घर **सताजी गवली** • लिा दिल्हे येसी जे तुम ×××× मल्त्याने पाच वर्षांचे बोलीने केले त्या × सके १७५१ सालचे रुो ७ सात व सालमाारचे सके १७५२ सालचे रुो ८ अठ यो रुो १५ पधरा तुमचे देणे ते माहे मारापासून दरमाहा हाा येक पोर्णमेचे पोर्णमेस देत जाऊ यास मालजामीन **येसाजी बीन देयजी पवार** जासूद अडा तुलसीबाग नजीक तुलसीबागचा उतरेचा दुसर दरवाजा सदरहू करारा प्राो दरमाहा आपण अनून देत जाऊ यास अतर पडले तर वसुलाचे मानसाचा रोज पोर्णमा जाल्यावर च्यार दिवसा पुढे रोज गड्याचा देऊ सके १७५२ विक्रुति नाम सवछरे मार्गेस्वर शुा १० गुरुवार हे लिा दिल्हे सही

साक्ष      निा खुद्द मालकाचे हातचे दोन २

१ माना ××× सुकोजीना ई सालोंखे जासूद नाईक अडा तुलसीबाग

१ बालजी पाा भो चे मौजे वढू

१ सिवजी पाा वार— घडे मौजे बाकोरी

बिा+ बापुजी परशराम **धारणे** जोसी कुलकर्णी मौजे **बाकोरी** ताा सांडस

[ •तुळसी बाग दुसर ]

---

+ अक्षर भिन्न.

## १४६

# हशमपुरा

[ श्री. चिं. ग. कर्वे ]

'मेहुणपुरा व हशमपुरा' असा जोड उल्लेख येतो [ पर्वतीयादी क. ३३१ ] तेव्हां हशमपुरा हा आजचा हसबनिसाचा बोळ असावा.

---

## १४७

# हरिकर्णाचें दुकान

[ श्री. चिं. ग. कर्वे ]

१ हरिकर्ण हा पेशवाईंत प्रसिद्ध व्यापारी होता. त्याचें दुकान शनवारवाड्याजवळ होतें असें दिसतें.

ले. १६।                                श्री

यादी आभयकर्ण गुजर नि॥ **हरिकर्ण रविकर्ण दुकान** सरकारचे वाड्याजवळ आहे त्याने येऊन वलख दिल्ही की सुरतेहून पीतांबर आले त्याचा इमा **प्रेमचंद लहुजी सुरतकर** यानी केला त्यास इम्या पौ कांही पीतांबर चोरी गेले त्याबद्दल त्याचे गुमास्ते **प्रेमचंद भाईचंद** येथे आले आहेत हे वलखीचे आहेत याचे पीतांबर गेले आहेत त्यापौ येतील पीतांबर ते यांचे हवाली करावे चिंता नाही या प्रो आमयकर्ण याने येऊन सांगितले मिति आस्वीन शुा २ सोमवार

[ या पीतांबराच्या चोरीचे बरेच कागद आहेत. — तुळशीबागदप्तर. ]

---

## १४८

# मॅलेटच्या वेळचें पुणें

यांतील कांहीं स्थळें निश्चित केलीं पाहिजेत.

### सखारामपंत व सदाशिव रामचंद्र यांचे वाडे

हे वाडे बरेच प्रशस्त होते असें दिसतें. कारण, मॅलेट वकील ते किंवा त्या प्रतीचे आपणासाठीं पाहिजेत असें वारंवार सांगतो.

[ म. मा. दरबार पृ. १८।२९

---

१ न. सं. पा. स. २५।४।४५

'**गायवाडाची** जागा केवळ चांगली नाहीं; मोठी जागा रिकामी मात्र आहे' अशी तक्रार करतो.

**मोरोबादादाचा बाग** त्यास पसंत होता.

**माधवराव मोरेश्वर यांची बाग** व **बोहरी याचा बाग** या दोहोंतून एक जागा नेमून द्यावी असें **नाना फडणीस** सुचवितात पण त्या त्यास पसंत नव्हत्या.

**कोतवाल तळें** म्हणजे घाशीराम कोतवाल यानें बांधलेलें तळें. 'मालिट ······· कोतवाल याचे तळे येथें उभे राहिले होते. मग **पाटीलबाबा पुढें** येऊन तळ्यापाशीं भेटी जाहल्यानंतर ···· डेऱ्यास गेले.' –कित्ता पृ. ७७.

**सैदाचा दर्गा**— मालेटला जी संगमाजवळची जागा बंगला बांधण्यास १७८६ त दिली त्या जागेस **सैदाच्या दर्ग्याची** जागा असें नांव होतें. त्या ठिकाणीं जुनें पडकें देऊळ होतें तें तसेंच बागेंत राखलें. –कित्ता पृ. ८३.

[ पारसनीसकृत सवाई माधवराव पेशव्यांचा दरबार ]

**१ दुर्जनसिंग**—याची पुण्यास पागा प्रसिद्ध आहे. हा गुजराथेंतील **मांडवीचा** राजा होता. त्याचीं पत्रें पेशव्यांना लिहिलेलीं 'लाटचे मराठी ऐतिहासिक लेख' यांत आहेत. हा बाळाजी बाजीरावाच्या वेळेपासून आहे.

**२ शनवारांतील विंचूरकर वाडा.**

विठ्ठल शिवदेव यास नानासाहेब पेशव्यानें शनवार पेठेंत ओंकारेश्वर देवळाचे दक्षिणबाजूस जागा दिली होती. तेथें त्यांनीं वाडा बांधला. त्यांच्या फौजेचा तळ नदीच्या उत्तरेकडील किनाऱ्यावर पडे.

( — विंचूरकर घराण्याचा इतिहास )

गजेबाहाद्दराचा वाडा व घाट याच ठिकाणीं आहे. त्यांची माहिती मागें सभेस दिलीच आहे.

---

## १४९

## पुणें पोलीस

[ श्री. चिं. ग. कर्वे ]

**या पत्रांत पेनशन व प्राव्हिडंट फंडाचा उल्लेख आहे. हे पहिले पोलीस पथक म्हणतां येईल.**

न. सं. ५

ले. १७ श्री { श. १७६५ भाद्र. वद्य ८ / इ. १८४३ सप्टं. १७ }

कुपणी सरकारास

अर्जी बो। समस्त सिपाई नि।। पोलीस शहर पुणे

| | |
|---|---|
| १ रुस्तुमभाई | १ विठलसिंग परदेसी आगरवाल |
| १ सिवजी जुंदरे | १ कडुसिंग |
| १ हणवतगीर | १ सिवजी जाधव |
| १ भिवजी गवळी | १ महादेव कृष्ण |
| १ सखाराम व्यंकटेश | १ तुकोजी मडळे रा। |
| १ मीर रमज्यान आली | १ दत्ता मकाजी व सिवजी |
| १ मल्हाजी लगड मयत त्याचा पुत्र वारस मनाजी | १ सयाजी फंणसे. |

*सन १२४३ फसली कारणे सावदास आर्जी करितो ऐसी जे पेशवे सरकारचे आमलात चाकरी होतो कुपणी सरकारचा आमल जाला त्या वेळेस मेहेरबान राबीं-सनसो शहरचे बदास्ताकारिता लोक चाकरी सन १८१७ माहे नवंबर महिन्यात ठेऊ लागले त्या महिन्यात आम्ही चाकरीम राहिलो तो आज परियत इमाने इदबारे नोकरी करीत आलो तो हाली सावंदानी म्हातारे म्हणु लोक काढावयाचे हुकूम जाला त्यास कारकून लोकानी व सोनी म्हातारे निवडून काढले त्यात आम्हासहि काढले त आमचे नाव चौकसी करून रत सो चाहादूर यांणी पेनसील पत्रात नाव घातले त्याज-वरून हुा आला की त्या लोकांस पेनसीन व बक्षीस यावे ते वेळस आमची नावे कसी गलत जाली हे काही आम्हास माहीत नाही याजकरिता आम्ही सावदास आर्ज केला आहे तरी आमचे दाखले जामदारखान्याचे[1] व आमची बरावरचे सिपाई व जमादार हाली नोकरीवर हजर आहेत याची साक्ष घेऊन आमचा बंदोबस्त पोटाचा केला पाहिजे सावदासेरीज दुसरा कोणी नाही आमचे मागून जे लोक नोकरीस राहिला त्याजला सावदानी पेनसीन दिल्हे व आम्ही त्याचे आगोधरचे नोकर असता आम्हास पेनसन नाही व या पेनसिनीसाठी मेहेरबान गौनर मलकम साहेब याणे आमचे पगारातून बारा आणे कापले त्या वेळेस हुा दिल्हा होता की तुम्हास पुढे पेनसीन मिळेल आथवा फंडाचा पैसा जो सरकारानी कापला आहे तो मिळेल या प्रो मार असता सरकार आमचे पोटाचा बंदोबस्त करीत नाही याजकारिता सरकारास आर्ज केला आहे तरी सावदानी आमचे पेनसिनीचा बंदोबस्त केला पाहिजे ही आर्जी लिहून दिल्ही सही ता. १७ माहे समबर सन १८४३ इसवी

नि।। कटार[१] सर्वांचे हातची असे
नि।। करते वेळेस सर्वांनी लेख-
णीस हात लाविला असे

[ –तुळशीबाग दप्तर ] ( कट्यारीचें चित्र )

१ अक्षर शाई भिन्न *फसली १२५३ पाहिजे.

१५०

# जुनें ड्रेनेज

[ श्री. चिं. ग. कर्वे ]

[ पूर्वी रस्ते फरसबंदी होते व त्यांखालून मोठा मोरीचा नळ जात होता तेव्हां घरांतील मोरी साफ करण्यास फरशी काढणें जरूर होतें. ]

ले. १८ } श्री कुंपणी सरकारास { श. १७७० चैत्र वद्य ६ इ. १८४८ एप्रील २४

*यादी **नारायणराव रामचंद्र तुलसीबागकर** पेठ **शुक्रवार** शहर पुणे मुा समान आर्बैन मयातैन व आलफ सन १२५७ फसली कारणे याद दिल्ही यैसी जे आम (च्या) घरातील पाच साहा मोऱ्याचा निकाल रस्त्यातील मोरीस जात आहे त्या मोऱ्या हली गाळाने भरून आल्यामुले पाणी जाण्याची अडचण फार सा त्याची दागदोजी करून निकाल रस्त्याचे मोरीसि लावावयाची आहे सा मोरीचे काम चालू केले व पुढे वोट्याखाली रस्त्यातील फरशा काढून काम करावयाचे तो दरम्यान पोलीस खात्याकडील गेटवाले सिपाई याणी सागितले की मोऱ्याचे काम आपले वोट्यापावेतो करावे रस्त्यातील फरशा काढून काम बरोबर कर्णे आगत्य आसल्यास मेहेरबान इजनेर साहेब याचा हुकूम घेऊन काम करावे दरम्यान रस्त्यातील फरशा काढून काम करू नये म्हणोन सागतात त्यास वाड्यातील मोऱ्या गाळाने भरून आल्यामुळे पाणी जाण्याची आडचण फार व इमारतीची खराबी होती याजकरिता याद दिल्ही आहे मोऱ्याचा गाळ रस्त्यातील थोरले मोरीपावेतो काढून काम कर्णे आगत्य आहे यास्तव फौजदार अगर मामलेदार यास हुकूम जाला पाहिजे ता २४ माहे आपेल सन १८४८ इसवी

[ तुळशीबाग दप्तर ]

---

१५१

# गुरुवार पेठेची कमाविसी

[ श्री. चिं. ग. कर्वे ]

इ. स. १७८४ त कमाविसी चिटको मल्हारकडे १२५ रु. वर होती हें पुढील पत्रावरून कळतें

---

* न. सं. पा. स. १३।६६

ले. १९ } श्री { श. १७०६ इ. १७८४

‡ चिटको मल्हार यांस पेठ गुरुवार का। पुणे येथील कमाविस सन समस समानीना पासून दरसाल नेमणूक रुो १२५ सवासे रुपये प्राां पुणे येथील हिसेची खर्च लिहिला तो प्रांत मजकूरचे तालेबंदी गैरसनदीन खर्च लिहिला असे

[ –तुळशीबाग दप्तर ]

---

## १५२

# पर्वतीवरील गणपति

[ श्री. चिं. ग. कर्वे ]

निजामानें पुण्यास जी जाळपोळ व लूटमार केली त्याची नुकसानी पर्वतीसहि पोचली. कांहीं देव भग्न झाले व गेले. तेव्हां पुढे जे नवे करावे लागले ते म्हणजेः––

" नव्या मूर्ती करावयाच्या सुमार

१ नारायेण
१ सूर्य
१ स्वामी कार्तिक
—
३
४ आत्यां जुन्याची
१ विष्णु
१ गणपति
१ देवी
१ नंदी
—
४

येकूण सात देवांची पो नवे तीन तयार करून व जुने च्यार येकूण सात देवांची आत्यां करून स्थापना पूर्ववत प्रो करणे "–(२५–१–१७६४) पे. द. ३२ ले. १७६

यावरून पर्वतीवरील गणपति हा जुनाच आहे, मंडकांतील भग्न गणपतीचा त्याच्याशीं कांहीं संबंध नाहीं असें दिसतें.

‡ न. सं. पा. स. ४११०१४८ पा. सं. १०१४८

१५३

# पर्वतीजवळील चौक्या

[ श्री. चिं. ग. कर्वे ]

पुढील पत्रावरून चौक्या कोठें होत्या तें समजतें.

श्री

याद्री पर्वतीस तल्याजवळ चौकी आहे तेथें येक सेर तेल दरमाहा पावत आहे त्यास बहिरागीयाचे मठापासी चौकी आहे तेथील चौकीस तेल मागतात त्यास तात्यांनी सांगितलें की तेच सेरभर तेल दोहीं जागां देणें त्यावरून येक महिना तसें दिल्हे हाली तल्यावरील चौकीदार म्हणतात आम्हांसच सेरभर द्यावें येविसी काय आज्ञा तल्यावर सेरभर व मठापासीं अदसेर असे द्यावे की काय

*येक सेर देत जावे ८८१

छ ५ रजब सन आर्बा

( * अक्षर वेगळें )

[ पुरंदरेयांचा दप्तर ]

---

१५४

# बाळशास्त्री टोकेकर यांचा वेताळ पेठेंतील नळ

[ श्री. चिं. ग. कर्वे ]

१ हा माहिती नवीन आहे. बाळशास्त्री यांच्या वंशजांना हा नळ माहीत नाही. हा कोठें आहे तें शोधलें पाहिजे.

ले. २१ } श्री } श. १७३४ माघ वद्य ११
} इ. १८१३ फेब्रु. २६

इनाम

कमिशन शिक्का

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री जनार्दनपत नऱ्हेकर देशपांडे सिवापूर यांसी प्रति बाळशास्त्री दीक्षित टोकेकर उपरी आम्ही शहर पुणे येथे वेताळ पेठेत नळ बांधून आणिला त्याचे खर्चाबद्दल सरकारातून याद धर्मादाव पटीची करविली त्या

---

† १,२ न. सं. पा. रु. ९ व २०१४

यादीत तुमचे नाव आहे त्याचा अंश तुम्ही यालूंन सदरहू रुा ३०० तीनसे राजश्री **गोपीनाथ आप्पाजी टिळक** व चिरंजीव राजश्री **बाळाजी आप्पाजी ठकार** या उभयेताचे विद्यमाने देवविले ते आम्हास पावले मिति मात्र वा। ११ शके १७३४ आंगिरा नाम सवंत्छरे बहुत काय लिहिणें *हे आशीर्वाद

( *बाळशास्त्री यांचे बाळबोध हस्ताक्षर )

[—शं. ना. जोशीसंग्रह

---

## १५५

# वाळीत टाकण्याची सभा

[ श्री. चिं. ग. कर्वे ]

[ इ.* १८५२ नहीं सभा होऊन कांही गृहस्थांस वाळीत टाकलेलें दिसतें. कारण पाहिलें पाहिजे. अशा सभा पुढेंहि झाल्या आहेत. ]

ले. २२ } श्री { श. १७७४ अ. भाद्र. शुा १
इ. १८५२ आगष्ट १६

याद्री श्रीतुलशीबाग येथे आधिक भाद्रपद शुा १ शके १७७४ परिधावी नामसंवत्छरे ते दिवसी रात्री सभा होऊन ठरले की यासी आनोदक व्यवहार करू नये यांची नावनिसी

१ बाबा ढेकणे — १ रावजी ब्रासगीवाले

१ बाबा राजकर्णा — १ हारभट हारडीकर नि॥

× × × — नान्या पुरधरे

× × × ×

( फाटले )

[ —तुळशीबागदप्तर ]

---

## १५६

# पुरंदरे वाड्याची जागा

[ श्री. चिं. ग. कर्वे ]

[ *पुढील पत्रावरून ही जागा फरासखान्याकडील रत्नोजीची होती. याच्यापुढें 'पांडोबा' चा वाडा होता. हा पांडोबा कोण ? पुरंदरे वाडा इ. स. १७४० त बांधला. प[illegible]

---

* न. सं. पा. स. ९।८४

ले. २३ } श्री

राजश्री **जनार्दनपंत** स्वामीचे सेवेसी विनंति उपरी **रत्नोजी बिा फरासखाना** यास श्रीमंत कैलासवासी **रावसाहेब** यानी को पुणें येथे पाडावाचे वाड्याचें पिछाडीस जागा राहावयास नेमून दिल्हीं आहे तेथे सरकारातून छपरें घालोन देऊन रत्नोजी मार राहात होता त्यास हाली आपल्यास कोणी गैरवाका समजाऊन जागा घेतली त्यात राजश्री **माहादाजीपंत** याणी घर बांधिलें आहे म्हणोन याणी सांगितले त्याजवरून पत्र लिहिले असे तरी श्रीमंत कैलासवासी रावसाहेबी जागा यास दिल्ही आहे याज-करितां जागा याची यास द्यावी तेथील कोणी कजिया करितील तरी ताकीद करावी ।। छ १० *जमादिलाखर बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंति
( * अक्षरें निराळीं )

[—तुळशीबाग दप्तर]

---

# १५७

# मोस्टिनच्या वेळचें पुणें

[ श्री. चिं. ग. कर्वे ]

## The third English Embassy to Poona

Mostyn's Diary ( sept. 1772–Feb. 1774 )

### गोविंद शिवराम बाग

(1) 'Govind Sewram's Garden was ordered ready for me' —page 8

### दुर्जनसिंग वाडा

(2) 'The Durbar had come to a Resolution of ordering Rajah Doorjunsings House for my fixed abode' -page 29

### मोरबा फडणीस बाग

(3) 'When he ( Morabah Furnees ) retired to his Garden just without Poona' -page 323

(4) 'Morabah Furnees came to his garden just without the town.'-page 343

### सकाळची तोफ

(5) 'Having wrote thus far with an Intention of Dispatching it at Gunfire in the morning' –page 324

गोविंद शिवराम साजगीवाले बाग, दुर्जनसिंगाचें घर, फडणीस बाग हीं माहीत आहेत. सकाळच्या व रात्रीच्या तोफेचा उल्लेख येतोच.*

---

* न. सं. पा. स. १९४४

१५८

# सेकसल्याची क्रिया

[ श्री. चिं. ग. कर्वे ]

( नागेश्वराच्या क्रियेप्रमाणेंच सेकसल्याची शपथक्रिया असे. )

ले. २४ } श्रीमार्तंड

*राजीनामा **वो राणोजी बीन पदमाजी वस्ते सिंपी** पेठ **वेताल** का पुणे सु॥ आर्या सबैन मया व अलफ कारणे साहेबाचे सेवसी राजीनामा लेहून दिल्हा यैसा जे आपण **सिदी अंबर** याचे कर्ज होन १२० येकसे वीस कर्ज घेतले होते ते आपण सिदी अंबर याजपासी वारिले आणि फारखती लेहून घेतली ××× द(दग्या)म्यामध्ये गलबरली खते सिदी आंबर याजपासी राहेली सिदी आंबर मृत्यू पावले त्याजकडील **सिदी फरास** यानी खतावरून आपल्यास येवजाचा तगादा केला त्यास आपण येवज झाडियानसी सिदी अंबर याजपा (सी) दिल्हा ऐसी आपण—**श्रीसेकसलापासी क्रिया** करितो पचरात्र नेम केला असे पचे रात्रीत आपल्या जातीस खताख्यानत जाली तर आपण येवज खताचा भरून देऊ हा राजीनामा लेहून दिल्हा सही छ ३ रबिलाखर नि॥ कातर (—तुळसीबाग दप्तर )

(आडवी ओळ) चि कलम खडो सामराज **बलसरे जोसी कुलकर्णी** मौजे **जेजुरी**

---

१५९

# तुळशीबागकरांचा रविवारांतील वाडा

[ श्री. चिं. ग. कर्वे ]

ले. २५ } श्री { श. १७४३ कार्तिक वद्य १ / इ. १८२१ नोव्हें. १०

*वो राजश्री **नागेश्वरभट प्रयागवारा** स्वामीचे सेवेसी पो। **रामचंद्र नारायण** सा। नमस्कार विनंती विशेष आमचा वाडा **फडके** यांचे पिछाडीस आहे त्या वाड्यातील दुकाने वो रा। **परमेश्वरभट** याजबदल दुकान तुम्हास दिल्हे आहे तरी त्या दुकानाचे भाडे रु॥ १॥ दीड देऊन तुम्ही दुकानात खुशाल रहावे तुम्ही देशाहून येईतापावेतो दुकानची घालमेल करणार नाहीं तुमचे दुकाना पो। रु॥ १॥ दीड व मारनिलेचे दुकाना पो। रु॥ १॥ दीड येकूण रु॥ ३ तीन तुम्ही देत जावे करारापेक्षा तुम्हाकडून जाजती भाडे घेणार नाहीं कार्तिक वा। १ शके १७४३ बहुत काय लिहिणे हे विनंती दरसाल पाऊणसेर तपकीर भाड्या सिवाय द्यावे याप्रो करार हे विनंति.

[ तुळशीबाग दप्तर ]

---

* न. सं. पा. स. १७।१।४५

## १६०
# भिडेबाग
[ श्री. चिं. ग. कर्वे ]

*' **परशरामपंतभाऊसो** हे प्रदोषाचे पारण्याकरितां पुण्याचे लगत शहरचे पूर्वेस राजश्री आपासो याचे मातुश्रीचे चुलते कैलासवासी **बाळाजी नाईक भिडे** यांची बाग **भवानी पेठेच्या** उत्तरेचे आंगास आहे त्या बागेंत येऊन संध्या व लिंगार्चन इत्यादि करून भोजन केले ) .

— मद्रु २. १२७

( भिडे हे पेशवाईंत प्रसिद्ध सावकार होते. )

---

## १६१
# भिकारीदास सराफ
[ श्री. चिं. ग. कर्वे ]

* खालील पत्रावरून भिकारीदास हा सराफ होता हें निश्चित होतें.

ले. २६ } श्री { श. १७२३ फा. व. १० / इ. १८०२ मार्च २९

नकल

वेदशास्त्रसंपन्न राजश्री **विरेश्वरभट बाबा कर्वे** स्वामीचे सेवेसी पो **रामचंद्र नारायण** कृतानेक सां नमस्कार विनंती विशेष तुम्हापासून घेतले कर्ज मुदल रुपये १००० येक हजार चाद्वड यासी व्याज दरसदे दरशेकडा रुो दोन प्रमाणें देत जाऊ सदरहू गाहाण जवाहीर दागिने याची किमत **भिकारीदास** याचे दुकानी हाली केली ते दागीने येकूण किंमत ——— रुो

| | | |
|---|---|---|
| ५०० | तनमणी सुमार | १ |
| २५० | चिंचपेट्या | १ |
| २५० | तानवडे जोड | १ |
| १०० | काप जोड | १ |
| ५० | किता काप जोड माणकाचा जोड | १ |
| १५० | चिन्या | १ |
| १५ | मोरचाली फर्द | १ |
| ३५ | आगठ्या | ६ |
| १३६२ | | १३ |

येकूण *तेरासें बासष्टची किमतजा जाली ते ठेविले असत रुपयास मुदत येका

---

* न. सं. पा. स. १७।१४५

वर्षांच्या व्याज आत मुदल सुधा फडशा करून देऊ आणि दागिने सोडऊन घेऊ मिति शके १७२३ फालगुन वा। १० रविवार

[ तुळशीबागदप्तर

( *बेरीज अक्षरी सांगितली आहे. पण ती किमतीचे आकड्याशीं जमत नाहीं तेव्हां किमती लिहिल्यां त्यांत रु. १२ कोठेंतरी कमी लिहिले गेले असावेत. 'जा' अधिक पडला आहे. )

---

## १६२

# तुळसीबागेची कसब्यांतील बाग

[ श्री. चिं. ग. कर्वे ]

ले. २७ } श्री { श. १७६३ आषाढ वद्य १३ इ. १८४१ जुलै १६

नकल

*यादी **नारायणराव रामचंद्र तुळसीबागकर** सु॥ इसने आर्बैन मयातैन व आलफ सन १२५१ फसली कसबे पुणें येथें आमचे खासगत गंजीचे वावर नागझरी नजीक माली मेहेत्रे पौ जमीन रुके ·॥· अर्धा याची वहिवाट आम्हाकडे आज परियेत चालत आहे ती जमीन संपादून आमचे आजे कैलासवासी **नारो आपाजी** याणी पेशवे सरकार कैलासवासी **माधवराव** साहेब पंतप्रधान याचे कारकीर्दीत श्री रामचंद्रजी संवस्थान तुलसीबाग यासी तुलसीफुलाकरिता घेतली त्यास आजमासे पाऊणसे येसी वर्षे होत आली त्या दिवसापासून आजपरियेत निर्वेधपणे वहिवाट चालली आहे त्या जमिनीवर सरकार सारा काहीं नाहीं व साधनी कागदपत्र आम्हापासी नाहींत वहिवाट मात्र आज पावेतो निर्वेधपणे चालत आहे कुपणी सरकारचा आमल जाहल्यावर मेहेरबान बडे साहेब याणी वहिवाट मनास आणोन मोकलीक करून दिल्ही आहे ता। १६ जुलई सन १८४१ इसवी

[ तुळसीबागवाले दप्तर

---

## १६३

# कसब्यांतील ढमढेरे वाडा

[ श्री. चिं. ग. कर्वे ]

ले. २८ }

व *जागा आमचा × × × येवज आम्ही लोकाचे कर्ज वाराव × × × घेतला त्याचे सरीर्दासत आलाहिदा तुम्हास दिल्हे आहे यावर दरोबस्त वाड्या पौ निमे वाटणी घर जागा सुधा आमचे दीर हणमंतराव ढमढेरे याची त्यास ते जिवंत असंता त्याणी

---

* न. सं. पा. स. १९।१।४४

राजश्री **बाजी गोविंद जोशी** याजपासून शके १७०१ मार्गसीर्ष शुध १ खत दुहोत्राचे व्याजाचे लेहून देऊन येक हजार रुपये कर्ज घेतले आणि निमे वाडा त्याणी आपले वाटणीचा गाहाण ठेविला त्यास पाच साहा वर्ष जाली हणमतराव मृत्य पावले त्याचे पोटी पुत्र संतान नाहीं त्याचे वाटचे आधिकारी आम्ही सा। **बाजीपंतानी** आम्हास कर्जाचा तगादा केला त्यावरून खताचा हिसेब पाहाता मुदल रु॥ येक हजार व व्याज दुहोत्राचा हिसेब आकार रु॥ आकरासे तीस जाले त्याजपौ रदबदल करून निमे रु॥ व्याजपौ सूट घेऊन येकोत्र्याचे व्याजे करार केले रु॥ ५६५ आक्षरी पाचसे पाचसष्ट येकूण रु॥ १५६५ पधरासे पासष्ट व्याजमुदल जाले त्यास द्यावयास यैवज पदरी नाहीं सा। तुम्हाकडे येऊन बहुत प्रकारें आपली ममता दाखऊन बोललो की पेशजी निमे वाडा आम्ही तुम्हास दिल्हा आहे आणि या रुपयाकरितां बाकी निमे वाडा राहिला तो दुसरियास द्यावा हे ठीक नव्हे तुम्ही सेजारी आहा यास्तव तुम्ही वाडा घ्यावा हेच उतम आहे हाणमंतराव याचे वाटणीचे घर व जागा तुम्ही खरीदी घेऊन आमचे लिगाड वारावें ते गोष्टी तुम्ही मान्ये केली सां मारनिलेची वाटणी तुम्हास देऊन तुम्हापासून किमत नख्त घेतले रु॥ १७६५ आक्षरी सत्रासे पासष्ट त्याजपैकी **बाजीपंत आणा** याचें कर्ज वारिले रु॥ १५६५ पंधरासे पासष्ट मारनिलेस देऊन खत सोडऊन तुम्हापासी दिल्हे बाकी रुपे २०० आक्षरी दोनसे आपण घेतले यो। सत्रासे पासष्ट रु॥ घेऊन तुम्हास घर व जागा खरीदी दिल्ही त्याचा हद व महदूद चतुःसीमा बि॥ ना॥

| | |
|---|---|
| लाची दक्षण उत्तर भिती खेरीज गज सुमारी ३१ | रुंदी पूर्व पश्चम गज सुमार ता। १५ |
| | पुढील तोड गज ८ — मागील तोड गज ७ |
| पूर्वेस नरसिगराव बलाल मांडवगणे १ | पश्चमेस धर्माधिकारी याचा वाडा १ |
| उतरेस गली पलीकडे कासीनाथ गंगाधर होनप देशपाडे प्रा पुणें १ | दक्षणेस तुमचे वाडियाचा पिछवाडा १ |

येणे प्रो चतुःसीमापूर्वक हद महदूद आडोसी पडोसी येणे प्रां खरीदी देऊन रु॥ सत्रासे पासष्ट तुम्हा पासून घेऊन हणवतराव बीन जानोजी पा। ढमढेरे याची निमे वाटणी घर व जागा तुम्हास खरीदी दिल्ही असे त्यात तुम्ही इमला बाधून सुखरूप नादावे बाजी गोविंद यास हणवतरायानी खत लेहून दिल्हे होतें त्यात मुदत लिहिली

आहे मुदतीस खो दिल्हे तरी उतम न दिल्यास घर जागा डुली हेच खरीदी खत म्हणून खतात लिहिले आहे यास्तव तेच खत तुम्हास खरीदीखता दाखल देऊन हेच खरीद पत्र आपण आत्मसंतोशें तुम्हास लेहून दिल्ही असे तरी सदरहू दरोबस्त वाड्यांपैकी निमे वाटणी आमची खासगत पेशजी तुम्हांस खरीदी दिल्ही आहे ते व हालीं हाणमतरायाची वाटणी तुम्हासच खरीदी दिल्ही त्यास सदरहू दराबेस्त वाडयात इमला बाधून तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंषपरंपेरने नादावें आमचा इतला काही वाड्यासी राहिला नाही सदरहू जागा आमचे भ्रतार व हाणमतराव याणी सिदोजी नरसिंगराव सितोले देशमुख प्रा मार याजपासून खरीदी घेतली त्यात भावाबंदाचा वारसा नाही कालकला कोण्हीहि वाडियाविसी मुजाहिम जाला तरीं त्याचा जाब आपण करू हे खरीद पत्र लेहून दिल्हे सही मोर्तब

निा नागर

लिा संभाजी गोपाल (नांगराची आकृती)

पेठे कारकून दिा ढमढेरे

[—स. ग. जोशी दप्तर]

---

## १६४

# शिवकालीन ब्राह्मणांची यादी–पुणें.

[श्री. चिं. ग. कर्वे]

*कागदावर साल वगैरे नाहीं पण कागद आणि अक्षर यावरून तो जुन्या पुण्यासंबंधी दिसतो. [—स. ग. जोशी दप्तरांतील]

ले. २९ { यादि दास्ती घरे ब्राह्मण

रुगवेदी

१ चंद्रभट पुरंधरे
१ जानभट ढेरे
१ वासुदेवा
३ धस्मातकारणी
  १ वासुदेव
  १ त्रीचक भट
  १ उधव
  ---
  ३
१ त्रीयक ढेरा

येजुरवेदी

१ सीउभट पाठक
१ मलार भट
१ वटेस्वर भट
  केशव
१ नारायण भट
१ हरभट फलुचेरे
१ त्रीचक पाठक
१ मोर भट

---

* न. स. पा. स. १०।६५

१ गगाधर ढेरा
१ मोरभट वैद
१ मोरभट कानडे
१ चंद्रभट ठकार
१ सीदभट ठकार
१ गदाधर भट
१ कुसावा गोसावी
१ तानभट
१ नीलकठ भट
१ त्रीबकभट ढेकणा
१ नागोजी घोडा
१ मल्हार भट पुरधरा
१ विस्वनाथ ढेरा
१ केसोभट पुरोहीत
१ भीकभट
१ रामभट ढेरा
१ रघुनाथ माहाभाश्ये
१ रेणुकानदन
सा। सुमारी ब्राह्मण
रुगवेदी
१ म्हालावा गोसावी
१ रेणुकानदन
१ भीम भट
१ तानभट
१ बापुजी गो
१ नारावा नि। मु-
कुदकान्हा
कृस्णभट
विस्वनाथ भट
ढेरे
२ सीरईकर
१ रामभट ढेरा
१ चद्रभट माहा-
देउभट ठकार
१ सीदभट
१ केसावा कुलकर्णी
१ रघुनाथ भट
१ नरहरी माहाजन

९

४ बोरकर
१ विस्व × ॥
भट
१ कृष्ण ×
१ गणेस ×
१ राम भ ×

४

येजुर्वेदी
१ हरभट
१ मल्हारी वेव्हारा
१ मोरावा वेव्हारा
१ रघुनाथ भट
१ नारावा वेव्हारा
१ येस पाठक
१ केसव वटेस्वर
१ नरहरी भट जोसी
१ सीउबा वेव्हारा
१ दादावा गोसावी

१०

१६५

# मुजेरी जमिनीबद्दलचा एक तंटा

( श्री. चिं. ग. कर्वे )

ले. ३०
न. सं. पा. स. १६।६५ } श्री { श. १६८२ कार्तीक वद्य ४
इ. १७६० नोवें. २६

नकल बा। असल

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री **बाबूराव राम** स्वामी गोसावी यांसि पोष्य **बालाजी बाजीराव** प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष **माली मेहेत्रे** का। पुणे याणी विदीत केले की **सुलतानजी झावरा** पा। नि। मुजेरी का। मजकूर याचा व आपला कजिया साजऱ्या जमिनीचा आहे त्यास पेशजी त्याचा व अपला इनसाफ जाला झावरे खोटे जाले सदरहू जमिनीवर त्यानी भिती घातल्या होत्या त्यास **श्रीमंत रावसाहेब** व **श्रीमंत आपासाहेब** कैलासवासी याणी पुरसीस करिता माहाराज **शाहाजी राजे** याणी सदरहू जमीन वसाहतीस दिल्हे आहे म्हणून झावरे मजकूर बोलले सनदा दाखवणे म्हणून आज्ञा केली तेव्हा सनद नाही म्हणून झावरे मजकूर यानी निवदन केले त्यावरून सदरहू जमिनीवर त्यानी भिती घातल्या होत्या त्या श्रीमंती हानी लाऊन पाडिल्या असता बळे जबरदस्तीने रटाई करून कजिया सदरहू जमिनीचा करितात तर ताकीद जाली पाहिजे म्हणून त्याजवरून पत्र सादर केले असे तर तुम्ही याचा त्याचा वर्तमान काण्हाची रुयात न करिता बाजवी मनास आणून बाजवी असेल ते करणे माली मजकूर याचा बोभाट फिरोन येऊ न देणे जाणजे छ १७ रबिलाखर सु॥ इहिदे सितैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंति [—स. ग. जोशी दप्तर

१०२

---

१६६

# माळीचें दस्तक

( श्री. चिं. ग. कर्वे )

ले. ३१ } श्री { श. १६९५ वैशाख शु. १
इ. १७७३ एप्रील २२

~ श्री ०
राजाराम नरप
ति हर्षनिधान नाराय
णराव बल्लाळ मु
ख्य प्रधान

( आकार वाटोळा, कडयाळ दुरेघी )

दा॥ बो॥ **माली मेहेत्रे** नि॥ माळी का। पुणें सु॥ सलास सबैन मया व आलफ सन ११८२ कारणे साहेबाचे सेवेसी कतबा लेहून दिल्हा ऐसा जे इ॥ सन हसने सबैन

सन ११८१ ता। साल मजकूर दुसालाचे खडणीचे बाबे साहेबी हुजूर बोलाऊन रजा फर्मावली येसीयासी आपले बाबे देशमुख व देशपांडे पो मार यानी सेवेसी विनंति केली जे साल मारी पिकाचे हंगामी प्रजन्य कमी जाला यामुले पीक जुजबी जाले व रयत नातवान आहे साहेबी रयतीवर नजर देऊन जीवन माफीक खडणी केलिया पेस्तर सालची मामुरी करतील बराये आर्ज खातरेस आणून जीवन पाहून पेस्तरसालचे आबादानीवर नजर देऊन कुलबाब कुलकानू काली व पाढरी स्वराज्य व मोगलाई सावोत्रा चौथाई व सरदेशमुखी बाबती देखील मुकासा खडणी केली ते कबूल आसो उगवणी करू

( वेगळे अक्षर ) दुसाला मिळून खंडणी करार रुपये १०९५

,, यकूण येक हजार पच्याणव रुो रास

,, तारीख २९ रोज सु॥ सलास सबैन मया व अलफ

माहे मोहरम*

* न. सं. पा. स. १६।६५ [ स. ग. जोशी दप्तर १०१

---

## १६७

# नव्या लकडीपुलासाठा पट्टी

**( श्री. चिं. ग. कर्वे )**

जुना लकडीपूल नानासाो पेशव्यानें इ. १७६१ त बांधला तो १८४० साली मोठ्या पुरानें मोडला. तेव्हां नवीन दगडी पूल बांधण्यास सरकारनें पट्टी बसविली.

ले. ३२ } { श. १७६९ भाद्र. वद्य १२ / इ. १८४७ आक्टो. ५

चिल्हर नंबर

४९३

*यादी मेहेरबान **नारायणराव रामचंद्र तुलसीबागकर** यांजकडे कलकटर साहेब बाहादुर जिल्हा पुणें यांजकडून लिहून जावयाची असी कीं शहर पुणे येथे **नारायण पेठेंत** नदीस लकडी पूल होता तो फार जुना पडावयास जाला सबब मोडून नवीन दगडी पूल करावयाचा विच्यार सन १८४२ साली ठरल्यासमई नवीन पूल तयार कर्ण्यांचे खर्चाचे कामास पुणे शहरातील लोक यांजकडून मदत किती होईल ते समजण्यास्तव मेहेरबान **ईग्रवर्ड** साहेब माजी कलकटर याणी दरबार केला त्या दरबारात आपण येऊन सहरहू खर्चाचे कामास आपण दाहा रुपये देण्याचे ठरऊन यादीवर आकडा लिहिण्यात आला आहे परंतु तो पैसा आजपावेतो सरकारात येऊन जमा आल्याचा आढळ होत नाही करिता हीं यादी कलमी केली आहे तर सदरहू दाहा

रुपये यादी पावताच येतील असी तजवीज जाली पाहिजे अगर पूर्वी रवाना जाले असल्यास त्याचे पावतीचे दाखल्यासह उतर त्वरेने आले पाहिजे तारीख ५ अगटंबर १८४७ (इंग्रजी सही)

**नारायणराव कृष्ण** चिटणीस
(इंग्रजी सही)

Oct. 5 । 47
[ तुळशीबाग दप्तर

---

*न. सं. पा. स. १६।६५

---

# १६८

# ढेरे यांचें घर

(श्री. चिं. ग. कर्वे)

ले. २३ } श्री { श. १६६० आश्विन शु. १
इ. १७३८ आक्टो. ३

पंतप्रधान

चक्रनामा सके १६६० कालयुक्त नाम संवछरे आश्वीन सुध १ प्रतीपदा ते दिवसी रा।नश्री **बाबूराव राजाराम ढेरे** का। पुणे यासी सेटीये व महाजण का। मजकूर सु।। तिसा सलासीन मया अलफ सन हजार ११४८ कारणे चक्रनामा करून दिल्हा येसा जे पूर्वी माहाराज राजश्री स्वामीनी वाडा वेदमूर्त राजश्री **वीरेश्वरभट चितले** यासी दिल्हा होता तो हली दूर करून वाडा तुम्हा दिल्हा असे त्याची चतुसीमा चिता।

लांबी पूर्वपश्चम
हात सुमार ८५

रुंदी दक्षणउतर दोन्ही
भुजा हात सुमार १५

सदरहू लांबी पूर्वपश्चम हात पंच्यासी व रुंदी उतरदक्षण हात पंधरा येणेप्रमाणे वाडा दिल्हा असे यासेरीज वाडियाचे उतरेस परसामधें लांबी हात सुमार ३२ व रुंदी हात सुमार ६ येणेप्रमाणें वाडियाची चतुसीमा असे वाडियाचे सेजारी उतरेस **बाल जोशी** व **गपचुप** व दक्षणेस **रंगभट चित्राव** पूर्वेस गली पश्चमेस गली पलीकडे वाडा सरकार याप्रमाणे वाडा तुम्हास दिल्हा असे पूर्वी वेदमूर्ती वीरेश्वर भट याजपासी चक्रनामा आहे तो रद असे तुम्ही घर बांधोन पुत्रादि वंशपरंपरेने सुखरूप राहणे छ २९ माहे जमादिलाखर

च्या। मल्हारजी बाजी कुलकरण नि।। मोहतर्फा का। मजकूर *

*न. सं. पा. स. १।६५ ]

नि।। तागडी
(तागडीचा आकार)

## १६९
# केदारवेसीजवळचीं घरें
(श्री. चिं. ग. कर्वे)

ले. ३४ }

यादी बालोजी **ताबट** व मलोजी **तांबोली** कसबे पुणे याची घर केदार वेसी नजीक आहेत त्याचे पिछाड्याची परसाची जागा का मारचे मोकासी यानी तेथे काही इमला होता तो जबरदस्तीने मोडून ती जागा **बापु कारजकर** सिपी साताऱ्याचा याजला देऊन बांधावयास दिल्ही त्याचा मजकूर मोकासी याची रुयात न धरता मनास आणोन याचे जाग्याचा फडशा करून देवावयाची पागी रागी लक्ष्मण जगथाप दि॥ कान्होजी नाईक मोरे **नि॥ बालाजी जनार्दन फडणीस** छ १८ सफर सुा × ×

[ —तुळशीबाग दप्तर

---

## १७०
# जनार्दन आप्पाजीची तुळशीबागेंत जागा
(श्री. चिं. ग. कर्वे)

ले. ३५ } श्री नकल

न. सं. पा. ६।६५

यादी **जनार्दन आपाजी** विज्ञापना येसी जे पुण्यात आपल्यास जागा **बुधवार पेठेत** विकत घेतली लाहानसे घर होतें तेथे काही दिवस मुलेमाणसे येऊन राहिली येके मुलीचे लग्न जाले आपण **नेवाशास** सुभ्याचे कामास गेलो तेव्हां कैलासवासी तीर्थरूप **नाना** यानी ते घर **महिपतराव जिवाजी** यासी दिल्हे त्यानी इमारत तेथे बाधली नेवाशाहून आल्यावर तीर्थरूपास विनंती केली त्यानी आज्ञा केली की येथे कोणी राहावे वेगळे कशास पाहिजे त्याजवर दोन वर्षानी **भीमराव पानसी** याजपासी जागा मागोन घेतली तेथे पाया खणावयास लाविले तीर्थरूपाचे कानावर घातले ते पाहावयास आले त्यानी सागितले हे जागा **गणेशपंत रानवडे** व **गोपालपंत दातार** यास देऊन त्यांची घरे **तुलसीबागे**लगन आहेत ती तेथील उपयोगी म्हणाल तेव्हा मी विनंती केली की पहिली जागा **महिपतराव** यासी दिल्ही हे

× × × माझे सोईचे कार्य म्हटल × × येथे कोणी राहावे वेगले घर पाहिजे म्हणतोस तरी जुना वाडा रविवार पेठ शेजारी आहे तो तुझा म्हणोन सागितले त्यांचे आज्ञेस उजूर नाही पुढे कुटुंब आणिलें येथे आणून नेहेमी राहावयास जाले तेव्हा कुटुब तेथे राहावे तरी तुलसीबागेस लाच येथील कामास विलग याजकरिता कैलासवासी तीा **बाळकृष्णपंत बावा** यानी तुळसीबागेचे पूर्वेचे सोपे आहेत तेथे सोय करून राहावयासी सागितले त्यास पाच सा वर्षे जाली अडचणीची जागा याजकरितां तीा मातुश्री **लक्ष्मीबाई मामी** यानी घर बाधावयास सागितले पैका त्याचा त्यास पुसोन खर्च केला त्याचे घरी चौकडे खर्च पडला याचे पश्चमेस दुसरचा सोप्याचे खालील मजल्याची जागा लगती पहिले पासून मजकडेच आहे व तलघर त्याचे खालते आहे आलीकडे लाकडे ठेवण्यासी वगैरे घेतले आहे त्याचे दक्षणेस निलकठराव गोविंद याजपासून नवी मी जागा मागोन घेतली ती मजकडे आहे येविसीची आज्ञा.

---

## १७१

# माळी मेहत्रे जमीनवाद

(श्री. चिं. ग. कर्वे)

ले. ३६ } श्री

यादी माली मेहत्रे काा पुणे आम्ही चौघे तक्षीमदार त्यापो **झेडाला माळी** तक्षीमदार याचे नकल जाले त्याची जमिन कर्जदाराकडे गुतली होती त्या जमिनीचे रुा व्याजसुधा देऊन जमीन सोडविली ती जमीन आम्ही त्रिवर्ग मिळोन खात आलो नंतर **हरजी डोले** यानी गैरवाका सरकारात समजाऊन नजर देऊन ती जमीन व होळीची पोळी व मानपान आपल्याकडेस करून घेतले त्यावर तीन वर्षे होळीची पोळी त्यानेच लाविली पारसी माली खटपट करीतच गेले चौथे वर्षी **नाना फडणीस** यास **पारखी** यानी पुरतेपणे समजाऊन हरजी ढोले होळीस पोळी लावीत होता ते सरकारातून अनामत केली ते वेळेस पारखी यानी दोन हजार रुा सरकारात देऊन पचाईतीस उभे राहिले पारखी खरा जाला तरी दोन हजार रुा हरकीत धरावे जरी करिता खोटा जाला तरी गुन्हेगारीत धरावे येसा करार करून पंचाईत **राघोपत गोडबोले** याजकडे सागितली त्यानी पांढर जमा करून सडींसाक्षी घेतल्या ते कागद सरकारात आहेत ते समई जमीन ध्यावी ती **गोपालजी गुंड** यानी हरजी ढोले याजपासून आसनत घेऊन ढोले मजकूर

यांजकडे जमीनीची वहिवाट राहली पुढे पारसी दोन हजार रुपयाचे पेचामुळे परांगदा जाला ते कागदपत्र पाहून सदरहू जमीन गांवाकडे चालविली पाहिजे

[ --स. ग. जोशी दप्तर

---

## १७२

# भांबुर्ड्यांचे सिरोळे यास सनद

(श्री. चिं. ग. कर्वे)

ले. ३७ श्री { श. १६८४ कार्तीक शु. ८
इ. १७६२ आक्टोबर २५ }

नि॥ २६ असल मोकदम्यात नकलेची नकल

राजश्री **राणोजी** चि॥ **मोराजी बि॥ रत्नोजी सिरवळे** मौजे **भाबवडे** ता॥ हवेली प्रांत पुणे गोसावी यांसि

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री**माधवराव बल्लाल प्रधान** आसीरवाद सु॥ सलास सितैन [1]मयातेन व आलफ शके १६८४ चित्रभानुनाम सवंत्सरे तुम्ही हुजूर कसबे पुणे येथील मुकामी येऊन आर्ज केला की आपण साहेबांचे राज्यातील पुरातन चाकर साहेबा जवळ येकनिष्ठपणे राहून कष्ट मेहेनत फार केली कुटंब-वत्छल आहो आपले भाऊ **शेखोजी शिरोळे** वगैरे पाच सात पुरुष साहेबकामास आले बायका मुले कुटुंबी राहिली योगक्षेम चालला पाहिजे यास्तव साहेबी मेहेरबान होऊन कुटुंबाचे येगमीस बालपरवेसीबदल दुरोबस्त येक गांव वौशपरंपरेनें नूतन इनाम करार करून देऊन भोगवटियास पत्रे करून दिल्हीं पाहिजे म्हणोन त्याजवरून मनास आणिता तुम्ही स्वामीचे राज्यातील पुरातन शेवक स्वामीशेवा येकनिष्टपणे करून कष्टमेहेनत फार केली तुमचे भाऊ शेखोजी सिरोळे वगैरे पाचसात पुरुष सरकार कामास आले कुटुंबवछल आहात बायका मुले कुटुंबी राहिलीं यास्तव तुमचे चालवणे जरूर जाणोन तुम्हावर मेहेरबान होऊन कुटुंबाचे येगमीस बालपरवेसी बा॥ मौजे पिपलेगुरव ता॥ हवेली प्रात मजकूर येथील मुकासा **मदारखान** वगैरे हुजुरातीचे रिकिबदार याजकडे होता तो त्याज कडून दूर करून साल मारा पासून दुरोबस्त

---

१ नकलेची नकल असें म्हटलेंच आहे. नकलकार अनभिज्ञ व पुढल्या काळचा आहे. म्हणूनच त्याचे हातून मया व अलफ (११००) चे जागीं मयातैन व अलफ (१२००) श्री इत्यादि दोष झाले तथापि तात्पर्य खरें असणें शक्य आहे.

शं. ना. जोशी

ह्या गांव कुलबाब कुलकानू स्वराज्य व मोगलाई येकूण दुतर्फा देखील सरदेशमुखी व इनाम तिजाई हली पटी पेस्तरपटी खेरजि हकदार व इनामदार करून जळतरु पाषाण निधिनिक्षेपादि सहित तुम्हास नूतन इनाम करार करून देऊन हे सनद करून दिल्ही असे तरी मौजे मजकुरी सदरहू लिहिल्या प्रो दरोबस्त तुम्ही आपले दुमाला करून घेऊन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वौंशपरपरेने इनाम आनुभऊन सुखरूप राहाणे जाणिजे छ ७ रबिलाखर आज्ञा प्रमाण सिका

[ --स. ग. जोशी दप्तर

---

१७३

# तीन सोंडी गणपति- देऊळ, लेख, शिल्पें

(श्री. ग. ह. खरे व डॉ. मो. गं. दीक्षित)

नव्या पुलाच्या दक्षिण तोंडाशींच पण पुरंदरे वाड्यावरून मंगळवारांतील मिशन हास्पिटलकडे जाणारा एक रस्ता निघतो. त्या रस्त्यान जातांना नागझरी ओलांडताच दक्षिणेकडे जाणारा एक रस्ता लागतो. त्यानें तसेंच पुढें दक्षिणेकडे गेलें असता प्रस्तुत देवतेचें देऊळ दिसतें. याचा म्युनिसिपल नंबर १३९ सोमवार असा आहे.

या देवळांतील सध्यांची मूर्ती गणपतीची आहे. हिची बैठक चौकोनी असून तीवर मयूर किंवा हंस यावर बसलेला गणपती दाखविला आहे. गणपतीला तीन सोंडा असून उजवी खालच्या हातांत असलेल्या मोदकपूर्ण पात्रास स्पर्श करीत आहे, मधली तुंदिल पोटावर रुळत आहे आणि डावी डाव्या मांडीवर बसलेल्या शक्तीच्या हनुवटीस स्पर्श करीत आहे. गणपतीस सहा हात असून वरच्या उजव्या-डाव्या हातांत अंकुश व परशु, मधल्या उजव्या-डाव्या हातांत शूल व पाश आणि खालच्या उजव्या हातांत मोदकपूर्ण पात्र या वस्तु आहेत. डाव्या हातानें शक्तीस आलिंगन दिलें आहे. मोर किंवा हंस याच्या दोन्ही बाजूस प्रत्येकी एक उंदीर व एक स्त्रीगण दाखविला आहे. पाठीवर मुकुटाखालीं असलेल्या केशरचनेस गोंडेदार पुच्छाचें आवरण घालून शोभा आणली आहे.

गाभाऱ्याच्या बाहेरील तीन दर्शनी बाजूंपैकीं दक्षिणेच्या बाजूस मध्यभागीं एका देवळींत नटराजाची मूर्ती आहे. हिचे पाय, हात, नाचण्याच्या गतीमुळें मागें उडालेलें अंगावरचें वस्त्र आणि उजव्या बाजूस असलेला हातावरचा नाग यांची वक्रता, ढब व एकतानता उल्लेखनीय आहेत. पण मुखमुद्रा यांच्या आकर्षणावर बोळा फिरवील इतकी बेढब आहे. पश्चिमेकडील कोनाड्यांत लिंगोद्भव मूर्तीचें पूर्वरूप आहे. एकदां सृष्टीचा आदिकर्ता कोण याविषयीं ब्रह्मा व विष्णू यांमध्यें भांडण लागून ते वर्दळीवर आले

असतां त्यांजमध्यें एकदम एक अग्निस्तंभ उत्पन्न झाला. तेव्हां त्याच्या शेवटाचा पत्ता लावील तो श्रेष्ठ असें दोघांनीं ठरविलें. ब्रह्मा शेंड्याचा पत्ता लावण्यासाठीं हंसरूप घेऊन वर उडाला आणि विष्णू बुडाचा माग काढण्यासाठीं सूकर बनून जमीन उकरूं लागला. दोघांनाही श्रम करून पत्ता न लागल्यानें ते त्या स्तंभाची स्तुति करूं लागले. तेव्हां त्यांतून शंकर प्रकट झाले आणि त्यांनीं दोघांचीही समजूत घातली अशी कथा आहे. प्रस्तुतच्या पूर्वरूपांत एक मोठें शिवलिंग असून त्याच्या दर्शनी बाजूवर पक्षी ( यास येथें हंस म्हणावयाचें आहे ) चित्रिला आहे. त्याखालीं अधोमुख चतुष्पाद सपुच्छ प्राणी ( यास येथें डुक्कर समजावयाचें आहे ) खोदला आहे. यांचे आकार स्वाभाविक दिसत नसले तरी येथें वरील लिंगोद्भवाचें पूर्वरूप अभिप्रेत आहे हें निश्चित. उत्तरेकडील कोनाड्यांत बैठा चतुर्भुज भैरव आहे, पण त्याचें वैशिष्ट्य कांहीं नाहीं.

या देवळाखालीं एक प्रशस्त तळघर असून त्यांत जाण्यासाठीं मंडपाच्या दरवाजाचे पाठीमागून उजव्या बाजूनें जिना आहे. पण अतिशय घाणीमुळें आम्हीं त्यांत उतरलों नाहीं. या देवळांत मूलतः महाकाल रामेश्वराची स्थापना केली होती हें शिलालेखच सांगतो. नटराज, लिंगोद्भव व भैरव यांच्या मूर्ती, गाभाऱ्याच्या गणेशपट्टीवर असलेलें शिवपार्वतीचें शिल्प व सध्याची गणपति देवता देऊळ शैव आहे असेंच दाखवितात. पण गाभाऱ्याच्या आंतल्या अंगास पश्चिमेच्या कोनाड्याखालीं शेषशाईची मूर्ति भिंतींत बसविली आहे. तेव्हां देवालय बांधणारा कडवा शैव नसावा असें वाटतें. मंडपांत शिरण्याच्या पूर्व दरवाजाच्या गणेशपट्टीवर गणपति आहे. पण त्यावर श्रीशिल्प आणि त्याहीवर जलशायी शिल्प आहे. अंतरालाच्या दरवाजाचे वरही श्रीशिल्प आहे हीं वरील विधानास पुष्टीच देतात.

याशिवाय मंडपाच्या बाहेरच्या व पूर्वेच्या अंगास दोन्ही बाजूंस प्रत्येकी एक मनोरंजक शिल्प आहे. यांत मध्यभागीं एक पुरुष व दोन्ही अंगास प्रत्येकी एक स्त्री असून पुरुषानें त्या दोघींना आपले हात व पाय यांनीं आलिंगिलें आहे. चित्र बीभत्स किंवा शृंगारिक नसलें तरी आचरटपणाचें आहे हें खास. असो. या ठिकाणीं गाभाऱ्याच्या दरवाजाचे वर तीन साधारण चौरस आकाराच्या पाट्या असून त्यावर उठावाच्या पद्धतीनें लेख खोदले आहेत. पैकीं पहिल्यामध्यें अशुद्ध संस्कृतांत व तिसऱ्यामध्यें फार्सीत देवालयाविषयीं माहिती आहे. दुसऱ्यामध्यें चार संस्कृत श्लोक आहेत. लेख असे.

| | | |
|---|---|---|
| ले. ३८ } | १ | { श. १६७६ मार्ग. शु. ७<br>इ. १७५४ नोवें. २० |

पुण्य नगरी पुरी
॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्री ॥
॥ सरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरु ॥
॥ दक्षिणामूर्त्तये नमः ॥ स ॥

॥ वत् १८०१ तथा नृपशालि ! [ ।* ]
॥ वाहन शकें १६७६ भावाना [ ॥* ]
॥ म संवत्सरे मार्गशीर्ष शुक्ल [ ॥ * ]
॥ [ ७ ] सौम्यवासरे शुभवेला ॥
॥ यां अस्य स्थाने श्रीमहका [ ॥* ]
॥ ल रामेश्वर प्रतिष्ठितं सु [ प्र ] ॥
॥ तिष्ठितमस्तु ॥ श्री देवदत्त ॥
॥ इह स्छान शुभं भवतु श्रीरस्तु [ ॥* ]

चैत्रादि विक्रम संवत् १८११ ( सं. १८०१ नव्हे ) व गत शक १६७६ हे एकमेकांशीं जुळते असून शकास दक्षिणी पद्धतीनें भाव संवत्सर पडतो. या वर्षी मार्गशीर्ष शुद्ध ७ गुरुवारीं पडत असून अगोदरच्या बुधवारीं षष्ठी येते. पण ती पाच तास १७ मिनिटें असल्यामुळें बुधवारीं सप्तमीही होती असें म्हटलें पाहिजे. तात्पर्य, कालाच्या तपशीलांत कांहींसा मेळ आहे असें धरण्यास हरकत नाहीं. याशीं जुळती इंग्रजी तारीख २० नोव्हेंबर १७५४ ही येते.

ले. ३९ (                     २

॥ श्रीगुरुदेव ॥
॥ दत्त ॥
॥ श्रीगणेशायनमः ॥ महेशा
॥ न्नापरो देवो महिम्नो नाप
॥ रा स्तुतिः ॥ अघोरान्नापरो
॥ मंत्रो नास्ति तत्वं गुरोःपरं [ ॥१॥* ]
॥ जयंति मंगला। काली भद्र
॥ काली कपालिनी ॥ दुर्गा
॥ क्षमा शिवा धात्री स्वाहा
॥ स्वधा नमोस्तु ते ॥ [ २॥ * ] सर्वमंग
॥ लमांगल्ये शिवे सर्वार्थसा
॥ धके ॥ शरण्ये त्र्यंबके गौ
॥ री नारायणी नमोस्तु ते ॥ [ ३॥ * ]
॥ यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पा
॥ र्थो धनुर्धरः ॥ तत्र श्रीर्विजयो
॥ भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ [ ४॥ * ]

ले. ४० } ३ { श. १६७६ भाद्र. शु. ९
इ. १७५४ आगष्ट २६

(१) ई मकान गुरूदेवदत्
(२) फुकरा फी तारीख हफ्तुम्
(३) शहर जूकअद [ह*] रोझ चहार शन्बह
(४) सनह ११६७ तअमीर नमूदह शुद
हें घर फकीर गुरुदेव दत्त यांचें आहे.
तारीख सात माहे जिल्काद रोज बुधवार
सन ११६७ [हि.*] या वेळीं तयार झालें

हि. ११६७ जिल्काद् ७ या तारखेस सोमवार येतो; जिल्हेज ७ ला बुधवार येतो. पण जिल्काद् ऐवजीं जिल्हेज वाचणें शक्य नाहीं. चहार शन्बह (बुधवार) ऐवजीं दू शन्बह (सोमवार) असेंही वाचतां येणार नाहीं. मी सध्या हि. ११६७ जिल्काद ७ हा तपशील प्रमाण धरतों. याशीं जुळती ख्रिस्ती तारीख इ. १७५४ आगस्ट २६ ही येते.

---

## १७४

# मल्हार श्रौती यांच्या वंशजास पेनशन

( श्री. चिं. ग. कर्वे )

मल्हार श्रौती यासंबंधीं मागें कागद वाचलेच आहेत. यांत त्यांचा मुलगा व नातू यांच्या संबंधीं माहिती आढळते.

ले. ४१ } श्रीरामप्रा { श. १७६३ चैत्र शु. ८
इ. १८४१ मार्च ३०

कुपणीसरकारास

जामीन कतबा वो **नारायण रामचंद्र तुळशीबागकर** वा पेठ बुधवार शहर पुणे सुा इहिदे आर्बीन मयातेन व आलफ सन १२५० फसली कारणे जामीनकतबा लिहून देतो ऐसा जे बापू दीक्षित बीन मल्हार **श्रौती** यास सरकारातून पेनसन दरमहा रुपये २० व वर्षासन सालिना रुपये ४०० याचे कुपणी रुपये ३८४ पावत होते त्यास ते **विदुरास** तारीख १३ नवंबर सन १८४० ईसवीस मृत्य पावले त्याचे पेनसन व वर्षासन चा ऐवज मयत तारखे परयत मागण्याविशई त्याचे पुत्र

**सिवराम श्रोती** याणी सरकारस आर्जी केली त्याजवरून सरकारचा हुकुम जाला की तुमची सात्पन्न मातोश्री चिठुरास आहे ती पेनसनाचे ऐवजाविशई वारसा करील सबब तिचा सटला सरकारात येऊ देणार नाहीं आसा जामीन द्यावा ह्मणोन मजकूर त्याजवरून आम्ही सरकारात जामीन होतो की **बाबू दीक्षित श्रोती** यांचे मयत तारखे परयत वर्पासन व पेनसनचा ऐवज ७०१८३८२ सातसे येक तीन आणे दोन पैं कुपणी हे त्याचे पुत्र सिवराम श्रोती याजला द्यावे त्याची सात्पन्न मातोश्री चिठुरास आहे तिणे व दुसरे कोणी वारसाने फिर्याद केल्यास त्याचा जाब मारनिल्हे हे करतील सरकाराकडे येऊ देणार नाहीत त्याणी न केल्यास त्याचा उजूर ( न ) धरता आह्मी खुद जो ऐवज सरकार द्यावयाचा ठरावील तो देऊ व त्याबद्दल जो जाबसाल पडेल तो करू आम्ही नसल्यास आमचे पाठीमागे पुत्र किंवा इस्टट वारस जो असेल तो सदरी लिहिल्याप्रमाणे करील हा जामीन कतबा मी आपले आकलहुशारीने लिहून दिल्हा सई ता। ३० माहे मार्च सन १८४१ ईसवी

( सही ) नारायणराव रामचंद्र तुलसीबागकर दस्तुर खुद

साक्ष

१ विनायेक बलाल गोरे मु॥ पुणे दस्तुर खुद

१ रावजी बापाजी रा तेकर मु॥ पुणे मालकाने सांगितल्यावरून घातली असे दस्तर खुद

मालकानी आमचे रुबरु सही कबूल केली असे

वाळकृष्ण आानायर

सदरहू भाग सिवराम हरि चिपलोणकर यास जामीन हुकुमावरून घेऊन हा कतब ( = श. १७६५ श्रावण वा। ९ ) परत दिला असे ता। १९ आगस्ट १८४३ ईसवी विसाजी गोपाल दप्तरदार

---

* न. सं. पा. स. १६।६५

## १७५
# नहराचा खर्च
( श्री. चिं. ग. कर्वे )

ले. ४२ | श्री | श. १६९३ माघ शु. १ इ. १७७२ फेब्रु. ४

आसीर्वाद उपरी तुम्हांकडे प्रांत पुणें येथील साल मजकूरचे रसदेचा ऐवज येणें त्यापैकी बा। देणे ता। **नारो आपाजी** याजकडे नहराचे कामा बा। रुपये

३९० कार्तिक शुा ५
४५१ कार्तिक वा ७
६२१९ मार्गसीर्ष शुा ३
१०७२८ पौष शुा ९
३४८२ माघ शुा १

२१२७०

येकूण येकवीस हजार दोनसेसतर रुपये देविले असे तरी पावते करून कबाज घेणें +जाणिजे छ+ २९ +सवाल सुा इसते सबै न मया व अलफ.*

---

* न. सं. पा. स. ६।६५

१७६

# पुणें येथील पोंक्षे वाडा व बागमळा

*( श्री. भास्कर सिताराम पोंक्षे–पुणें )

( १ ) **नारो बापूजी पोंक्षे पुणें, आंबव पोंक्षे** पोष्ट मासजन जिा रत्नागिरी येथील घराण्यांतील **किटोबा ऊर्फ केशव त्रिंबक** हे देशावर सन १७०० चे सुमारास बायकामुलांसह पायरस्त्यानें येत असतां वाटेंत त्यांस वाघानें मारून खाल्लें. त्यांचा मुलगा त्रिंबक केशव ( हुचली घराण्यांतील ). हा पुणें येथील पेशवे यांचे खाजगीवाले **गोविंद शिवराम तात्या लिमये** हे वैशाख वद्य १२ शक १६९४ ( सन १७७२ ) रोजीं काळपुळीनें मयत झाले तेव्हां; श्रीमंत **थोरले माधवराव** पेशवे यांनी गोविंदराव यांचा मुलगा निळकंठ यांस नेमून, तो लहान सबब खाजगीचा कारभार पहाणेस **नारोपंत पोंक्षे** यांस नेमिलें ( राजवाडे खंड १३।१४ खाजगीवाले दप्तर पत्रांक नं. ८२ ). ते सन १७७२ ते १७९१ पर्यंत असोन सन- १७८९ मध्यें त्यांस खाजगीवाले यांजकडून पुणें शुक्रवार पेठ रामेश्वराचे दक्षिणेकडील जागा घर बांधणेस दिली. नारोपंत कार्तीक वद्य १३ शके १७१३ ( सन १७९१ ) रोजीं काळपुळीनें मयत झाले. त्यांचा मुलगा **बळवंत नारायण** यांस सन १७९२ रोजीं **नानाफडणीस** यांचे विनंतीवरून श्रीमंत **सवाई माधवराव** पेशवे यांनी खाजगीवाल्यांचे कारभारी नेमिलें. ते १८१८ पेशवाई अखेर होते. त्यांना सन १८२०। २१ मध्यें, सन १७८९ मध्यें दिलेल्या, रामेश्वर देवळाच्या दक्षिणेकडील जागेंत घर बांधणेस पांच हजार रुपये खाजगीवाल्यांनी दिले. त्या ठिकाणीं वाडा बांधून **बळवंत पोंक्षे** हे व त्यांचे बंधू, गणेश जनार्दन असे त्रिवर्ग सदर वाड्यांत पुणें शुक्रवार पेठ ( रामेश्वर देवळा पलीकडे दक्षिणबाजूस ) जुना म्यु. नं. २१ ( हल्लींचा

नं. ३५ ) पुणें येथें राहत होते. सदर वाडा कै. न्या. मू **म. गो. रानडे** यांचे वडील गोविंद अमृत रानडे यांस ता. १४।८।१८७५ रोजीं रु. ४७०१ ला जनार्दन नारायण यांचे वंजश गणेश बाबुराव पोंक्षे यांनी खरेदी दिला. त्या ठिकाणास अद्यापि सदर पोंक्षाचा वाडा ह्मटलें जात असोन सदर वाडा आतां नवीन बांधून तेथें डाक्तर नारायण महादेव रानडे हे राहातात.

सदर **नारो बापूजी पोंक्षे यांचा बागमळा** पुणेंहून ४ मैलावर कोथरूड गांवालगत सर्वे नं १४३।४४ ( जुना पे. न. ७।८।९ ) १० एकर ६ गुंठे, आकार ४३ रु. ५ आ. हा आहे त्यांत २ विहिरी आहेत. त्यांत एक जांच दगडी कमानीची उतरत्या पायऱ्याची मोठी मोट-विहीर आहे. त्या विहिरीचे कमानींत मध्यभागीं

श्रीगणेशभैरवाय नमः
नारो बापूजी पोंक्षे स्रोत
आंबवेशके १७०३ प्लव
संवत्सरे जेष्ठ मास

असा दगडावर कोरलेला शिलालेख आहे. सदर बागमळ्याचा ½ भाग गंगाबाई भ्रतार बाबूराव भैरव **पोंक्षे** ( रा. कोथरूड ) हिनें सन १८६७ रोजीं रु. १६६७ स रखमाजी म्हातारजी, खंडोजी लक्ष्मण माळी भुजबळ यांस खरेदी देऊन तिचा दत्तक मुलगा वरील पुणें मधील वाडा खरेदी देणारा गणेश बाबूराव पोंक्षे यानें कोथरूड बागमळ्याचा ½ हिस्सा १५०० रु. स. नारो बापूजी पोंक्षे यांस खरेदी दिला. यांस ३ मुलगे ( १ ) बलवंत ( २ ) गणेश ( ३ ) जनार्दन. हे पेशवाई अखेर पर्यंत पुणें येथें होते. नं. १ खाजगीवाल्यांचे कारभारी, नं. २ नानाफडणीस यांचे विश्वासांतील राजकीय मसलतींत असत. नं. ३ पेशवे दप्तरांत असोन त्यांचा नातू बाबूराव भैरव पोंक्षे ( पेशवाईच्या सावलींत ) वकील म्हणून, पुणें सन १८४० मध्यें होते. व त्यांचा दत्तक मुलगा गणेश बाबूराव पोंक्षे वंश सांगली ( जुनी, घ. नं. ४६० पोंक्षे वाडा ) येथें विद्यमान आहे.

वरील कोथरूड मळ्यांतील कमानींची उतरते पायऱ्याची जुनी विहीर तींत रस्ता बुजवून हल्लीं गोलकठडा लोकलबोर्ड पुणें कडून बांधणेंत आला असोन सदर शिलालेख कमानींत तसाच कठड्याचे आंत असलेचे कामगार पाटील कळवितो. अद्याप सदर ठिकाणास ' पोंक्षे विहीर मळा' असें म्हणतात.*

---

* न. सं. पा स. ३।६७

## १७७

# चिटणीस व सखारामपंत बोकील यांचे पुण्यांतील वाडे

( **य. रा. गुप्ते**. बी. ए., एम्. आर. ए. एस्., पुणें. )

[ दिल्ली ( शहाजहानाबाद ) येथील इमारतींची सरकारीरीत्या पहाणी करून त्यांची यादी करणार. ]

पुण्यांत चिटणिसांचा वाडा कोठें होता याविषयीं मी बरींच वर्षे चौकशीं करीत होतों. परंतु नक्की माहिती मिळेना. श्री. नाडकर, पेन्शनर पी. डब्ल्यू. डी., बारशी, हे मजकडे त्यांचे घराण्याचे कागद पहाण्यास गेल्या मार्च–एप्रिलांत येत होते. त्यांस विचारतां चिटणीसांचा वाडा एके काळीं त्यांच्या पूर्वजांकडे गहाण होता असें त्यांनीं सांगितलें. पुढें आमचे मित्र श्री. रामचंद्र यशवंत चिटणीस यांची गांठ पडली. त्यांनीं वाडा अंदाजें कोठें होता याची कल्पना दिली. मजबरोबर येऊन अंदाजाचें ठिकाण दाखविण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें आह्मीं दोघे चौकशीस निघालों. श्री. चिटण-वीसांच्या स्मरणाप्रमाणें चिटणवीसांच्या एका वाड्याचा कांहीं भाग त्यांस पटला. तो हल्लीं कोणाच्या मालकीचा आहे याची चौकशी आह्मी श्री. आगरवाल यांजकडे केली. ते आमचे बरोबर आले व त्यांनीं आपला वाडा व समोरील वाडे काळजीपूर्वक दाखविले. त्यांचे घराण्यानें खरेदी केलेल्या वाड्यांत ¾ भाग जुन्या चिटणीस वाड्या-चा आहे. मागें व बाकी नवा आहे. मागील भागांत एक इ. स. १४ व्या व १५ व्या शतकांतील स्तंभाचा भाग आहे. तो चिटणवीसांच्या वाडयांत कोठें तरी होता असें श्री. आगरवाल यांच्या सांगण्यांत आलें. या वाड्याचा कसबा स. नं. १३०८ आहे. शिवाय रस्त्याच्या पलीकडे समोर चिटणवीस व बोकील यांचे वाडे होते. या बोकी-लांच्या वाड्याचा कांहीं भाग इ. स. १८९२ त मिशन स्कूलनें विकत घेतला. त्याचा कसबा सि. स. नं. १३६६ आहे. बोकिलांचा वाडा हल्लीं (मिशन स्कूलचें आवार सोडून) त्यांच्या वंशजाचे ताब्यांत आहे. त्यास कसबा सि. स. नं. १३६० वगैरे आहेत. चिटणवीस यांच्या वाड्याचे कसबा सि. स. नं. १३४४–४६ वगैरे आहेत. यांचे मालक हल्लीं बरेच आहेत. चिटणवीसांचा वाडा व बोकिलांचा वाडा यांच्या दर्म्यान सुमारें १½ रुंदीची भिंत आहे. ती चिटणवीसांच्या वाड्याच्या दक्षिणेस आहे. पेशवेकालीन चुना–सिमेंट सारख्या कामाच्या हौदाचा भाग त्यांच्या वाड्यांत अद्याप आहे. बोकिलांच्या इतर वाड्याची माहिती पूर्वी मंडळानें दिलेलीच आहे.

या संशोधनाचे कामीं श्री. आगरवाल व श्री. चिटणवीस यांनीं जे श्रम घेतले त्याबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.*

---

* न. सं. पा. स. २२-७-४२

## १७८

# पुण्यांतील चिटणवीसांचा वाडा

[ लेखकः—य. रा. गुप्ते, बी. ए., एम्. आर. ए. एस्.,
असिस्टंट सर्व्हेअर, हिंदु व बौद्ध इमारती, पंजाब व संयुक्त प्रांत. ]

मागील एका बैठकीच्या वेळीं मी कसब्यांतील बोकिलांच्या घरास लागून अस-लेल्या चिटणवीसांच्या वाड्याची माहिती दिली. या वाड्याचे दोन भाग होते. एक

ह्यांच्या सडके पलीकडील व दुसरा तिच्या अलीकडील. सडके पलीकडचा भाग अद्याप थोडासा शिल्लक आहे. तो नदीच्या बाजूचा. याच्या आवारांत सांपडलेला एक दगडी स्तंभ शौच्यकूपा जवळ दृष्टीस पडतो. पण तो फार पूर्वीचा आहे हें मीं दाखविलेंच आहे. या भागाच्या एका कोपऱ्यांत मी लहान असतां माझे मेहुणे कै. कोरडे, चिंचघरकर रहात असत. हे सर्व भाग चिटणीस घराण्यांतील सरंजामदार श्री. रा. य. चिटणवीस यांनीं व मीं तपासले.

पेशवे दप्तराच्या २२ व्या भागाच्या १७२ व्या पृष्ठावर खालील मजकूर आहे.

"चैत्र वद्ये १३ रविवारी प्रहर दिढा प्रहरा दिवसा दादजी चिटणीस राजश्री प्रधानपंतांचे यास क्षये रोग होता. मृत्ये पावले असेत. १

अवजी नीलकंठ परभू नील परभूचे पुत्र त्यास दादजी म्हणत असत. कोटांत घर बांधोन राहतात. तेथेच देहअवसान जाले."

या लेखाची तारीख २८–३–१७३६ ही आहे. तेव्हां हा वाडा त्यापूर्वी बांधिलेला होता. शनिवार वाडा बांधण्यास थोरल्या बाजीराव साहेबांनी १० जान्युआरी १७३० रोजीं सुरवात केली. अर्थात् हा चिटणीसांचा वाडा त्यानंतर व २८–३–१७३६ पूर्वी बांधिला असें गृहीत धरण्यास हरकत नाहीं. हा कोटांतच येतो. या भागांत माझी आत्या माझ्या लहानपणीं रहात असे व त्यास कोटच संबोधित असत.

आतां आवजी निलकंठ अथवा दादजी चिटणवीस हे कोण तें सांगतों. खंडो बल्लाळ ही महाराष्ट्रास ललामभूत असणारी व्यक्ति कोण हें स्पष्ट करावयास नको. मीं इ. सं. ऐ. स्फुट लेख भा. २, १ यांत त्यांची हकीगत सटीप संपादिलेली आहे. त्यांचेच धाकटे भाऊ व बाळाजी आवजीचे तृतीय पुत्र निळो बल्लाळ होत. यांस आण्णा म्हणत. यांचेच आवाईच्या पोटीं झालेले वडील पुत्र [1]आवजी यांनीं हा वाडा बांधिला. हेच पेशव्यांचे चिटणीस थोरल्या बाजीरावांचे बरोबर माळव्यांत होते. यांची भार्गवरोम पट्टी देणें रुपये ५० नमूद आहे. यांचेच पुत्र महिपतराव यांस पालखीचा सरंजाम मिळाला. हे पानिपतच्या लढांईत होते. यांचे घराण्यास पौंड खोऱ्यांतील वडवाथर गाव मोकासा होता. तो पुढें दुसरे बाजीराव साहेब यांनीं जप्त केला. सुप्रसिद्ध कै. जीवनराव चिटणवीस, ज्योतिषी, यांच्या खापरपणत्याचे पुत्र होत.*

---

* न. सं. पा. स. २८-७-४३

१ श्री. वा. स. कुलकर्णीकृत चित्रेकुल – वंशवृक्ष पृ. ४६ वरील वंशावळ पहा.

२ पेशवे दप्तर भा. २२ पृ. ३५

## १७९

# न्हावी–मेहतरपणाचा वाद

( चिं. ग. कर्वे )

हा वाद दादाजी कोंडदेवापासून चालत आला होता असें दिसतें.

ले. ४३ } श्री { श. १६४५ मार्ग. व. १४
इ. १७२३ डिसें. १५

तालिक

*ईजितपत्र शके १६४५ शोभकृत नाम सवछरे मार्गसिरीश वद्ये १४ चतोरदसी ते दिनी इजितखत लिहून दिल्हे ऐसी जे हस माहाला वलद सत माहाला अढाव का। पुणें यासी कोंड माहाला वलद सेटीयाजी माहाला भगर कसबे मजकूर येजीत खत लेहोन दिल्हे ऐसी जे आपणा मधे व तूज मधे न्हावीपणाचे मेहतरकीचा कजिया होता त्याजवर तुमचे व आमचे भांडण हुजूर माहाराज राजश्री पावेतो अलो त्यावरून हारदो जणाचा ईनसाफ राजश्री दादाजी कोडदेव याचे कारकीर्दीस जाला त्याजवर मागती राजश्री विनायेक उमाजी सुभेदार याचे कारकीर्दीस का। पुणियात तुकोजी मोकदम यासी व बारा बलुते व कसबे मजकूरचे गोत श्री नागेशाच्या देवलात बयेसून गोतमुखे व पंचाईतमते निवाडा करून दिल्हा जे निमे निमे प्राा सदरहू स तकसीमा खाव्या ऐसा निवाडा जाला ती पत्रें सुभेदारानी हुजूर मनास आणून व देशमुख व देशपाडे याची सइ आणून बरहाक इनसाफामुले सदरहू तरफा डो × याची तुजकडे व भाचोडकर याची आपणाकडे याप्रा। निवाडा करून दिल्हा त्याजवरून आपण खोटे जाहालों तुजला हें ईजितखत लेहोन दिल्हे आसे तरी सदरहू प्रमाणें तरफा आपल्या खाऊन यासी हिला हारकत करू तरी दिवाणाचे गुन्हेगारी व गोताचे आन्याई दिवाणात पाचसे होन गुन्हेगारी देऊन व पाच सिरे देऊन हे ईजितपत्र लेहोन दिल्हे सही निमे न्हावीपण व निमे मेहतरपण तुवा खावे व निमे न्हावीपण व निमे मेहतरपण आपण खाऊन हे ईजितपत्र लेहोन दिल्हे सही सुा आर्बा अशरीन मया व आलफ +सन हाजार ११३४ आकरासे चवतीस छ २७ माहे बिलावल हे लिहिले सही

ना। आरसा.

---

* न. सं. पा. स. १५-१२-४३ + ह्या कागदांत प्रारंभीं शकाला संवत्सरनाम दिलें आहे तें ' शोभन ' पाहिजे. व शेवटीं सन हाजार असें लिहून आंकडा ११३४ दिला आहे. हा फसली आहे. पण हा आकड्याबरोबर अक्षरांतहि सांगितलेला आहे. —शं. ना. जोशी

असलेवरी चिा बारवाजी
नारायेण भालेराव कुलकर्णी
मौजे वीर तारा नीराथडी याचे
आहे

साक्ष नारो केशव देशपांडे
प्रा सुपे बारामती

गोही

साक्ष मोकदम कसबें सुपें
कासोजी पा मल्हारजीपा चांदगुडे
कुतवर्ले त्रींबकजी
मोरोजी पा खेर पा भोडवे
बाजी पा व सटवोजी पा
मौजे मालसीरस प्रा सुपे १
मुजपासान महाल बोरघाट
ता नाणे मावल १
मोकदम मौजे कवठे येमा-
ईचे ता पावल

खंडोजी पा जगथाप
मोकदम मौजे माहुर ता
नीरथडी प्रा मार १
नागोजी पा दलवी व
मलहारजी पा गिरीमकर
मौजे आजनुज ता पेडगाव
व प्रा कडेवलीत १
खंडोजी पा मोकदम
मौजे पिसोले ता करे–
पठार प्रा मार १*

[ स. ग. जोशी दप्तर ६ ० २ ७ ]

*न. सं. पां. स. १८।६५.

## १८०

# कमाविसी जमा

( श्री. चिं. ग. कर्वे )

ले. ४४ } श्री { श. १७०२ मार्ग. शु. २
इ. १७८० नोव्हें. २८

*यादी कमाविस सुा समानीन मया व आलफ* छ १ सवाल ता सुा इहिदी समानीन मया व आलफ छ १ जिल्हेज सके १७०२

१५ छेटू जिनगर याची बहीन नारायेण पेठकर छिनालीस धरली तिची रदबदली केली सबब रुा वीस २० वजा खर्च जाऊन कलम १

१० सिकलेकर लक्षुमन व दुसरा चिगारीसाठी भाडले मारामारी केली कलम १

* न. सं. पा. स. ९।६५

१० बुढन लोन्हरी याचे कर्ज येणे ते वसूल केले सबब कलम १

२५ कलवातीन लस्करीन नायेकी दिल्ही सबब कलम १

२५ गंगी गाजेवाली लस्करीन लस्करात बद आमल केला छिनाली केली तिला कोतवालाचा उपद्रव लस्करात रदबदली केली कलम १

१६० लक्षुमी मालजादी इचे घरी लस्करी सोधे च्यार व सिब्या बेरडाया लेकही होता तिचा बोचका चिध्याचोल्यांचा होता त्यास दबऊन त्याजपासून गुनेगारी रुा १९० वजा सेट्या रुा ३० बाकी रुा कलम १

३५ निंबी लोन्हरनि लस्कराचा खाटीक या सागाते गेली कोतवालाणे धरून नेली रदबदली केली सबब कलम १

१५ दीना खाटीक याचा व त्याच्या भावाचा कजिया त्याची गुणेगारी कलम १

१७ मानसींग काछी याणे आपली बायको टाकली फारकती केली सबब जातीनि देविले कलम १

१८ मालजादीन मयेनी लस्करी गुा माहदाजी नाईक याची ७ कुनबनि कोतवालाणे धरून नेली ती माघारी आनली सबब कलम १

१० गुलाब तातवाला यानीं बद अमल लस्करात जाऊन सरा पेऊन गावात आला त्याबद्दल कलम १

३० भवाणी मालीन इन दादला केला पाटाचा सबब रुा ३० सरकारचे

१० तली लस्करचा व चौधारी तुलाराम व भवानी चवधारी पनासाठी भाडत होता ते निवडले कलम १

१५ मोहोना व नंदा लोधी याचा कजिया जातीचा जातीन देविले रुा कलम १

३ रेखा कुंभार याचे रुपये १३ तेलियाकडे येणे त्याचे त्याला दिल्हे सबब कलम १

२२ भिकारत भडवुजीन इची कुनबीन भिकारत याने पलविली सबब तिचे रुपये भिकारी यापासून देविले सबब चौथाई रुा २५ प्यादे व कारकून कलम १

५० गुलाबखान तातवाला याचा मेहोना त्यान जीव दिल्हा सबब गुणेगारी कोतवाला संगाते रदबदली केली त्याचा करार रुा १०० पैकी निमे कोतवालास कलम १

१० सोधे व किरकोल नजर

४८०

१४० किरकोल सादीलवार वगैरे

६२०

* श. १७०२ आश्वीन शु. २२ = इ. १७८० सप्टं. ३०

# १८१

# तुळशीबागवाले-फाटक कज्या

( श्री. चिं. ग. कर्वे )

ले. ४५ } श्री { श. १७४९ श्रावण व. १३
इ. १८२७ आगष्ट २०

नकल

आर्जी रामचंद्र नारायण खिरे संवस्थान तुलसीबाग सुा समानीन आशारि मयातैन व अलफ श्री रामचंद्रजीच्या मूर्तीची स्थापना तुलसीबागेत केल्यास दोन पिढ्या जाहाल्या स्थापना केल्यावर दाहा पाच वर्षानी संवस्थान खर्चाकरिता चार महस्ताकडून गाव व मोकासे व वर्षासन आपले नावे करून घेऊन इनामपत्रे करून घेतली त्याप्रो दाभाडे गायकवाड व होलकर व सिंदे याजकडील चालत नाहीत काही चालतात दर्म्यान आफती पडल्यामुले येवज मोबदला देणे जाला तो वारावयास रा विठल फाटक याजपासून येवज घेऊन गावचे वगैरे काम कमाविसीने फाटक यास सांगितले त्याने येवजाचा फडशा केला असता खटला करू लागले सबब सरकारात आम्ही जाहीर केले त्या आदावतीने फाटकानी गैरवाका समजाऊन आमचे इनामी गावचा वसूल आमानत करविला तो येवज साहेब मेहेरबान होऊन समयास आमचा येवज आम्हास देतात हाली फाटक यानी सरकारात आर्ज केला की रामचंद्र नारायण देवाचा खर्चवेच नीट करीत नाहीत याजकरिता ते काम मजला सांगावे त्यास आजपर्यंत आमचे देवस्थान आम्ही जसी आमदानी होत गेली त्याप्रो खर्च करीत गेलो पुढेहि त्याप्रो करण्यास आम्ही हुशार आहो फाटकाची आम्हावर आदावत आहे हीही साहेबास माहीतच आहे नाना प्रकारचे तटे काढून सर्वस्व आमचा नाश करावा हा त्याचा मनोदय याजकरिता आमचे इनामी गावची इनामपत्रे दप्तरदार याच दाखविली आहेत तरी साहेब मेहेरबान होऊन पूर्ववत प्रो आमचे इनामी गाव आम्हाकडे चालविले पो शके १७४७ पूर्वजीत नाम संवत्सरे श्रावण वा। १३ *

---

* ह्या अर्जीचा सुहूर सन व शालिवाहन शक दोन्ही नकलण्यांत नकलकाराची चूक झाली आहे. सुहूर सनांत ' समान अशरीन ' असें पाहिजेत आणि शकोल्लेखांत १७४९ सर्वजित् असें पाहिजे. न. सं. पा. स. ८।९।४३

—शं. ना. जोशी.

तुम्ही दमरदार याजकडे जावे आणि सरकारचा नवीन कायदा काय आला आहे तो खुद नजरेत आणून त्याप्रो तुम्ही वर्तणूक करावी त्याप्रमाो न केल्यास दोघाचे लढण्यामुळे देवाची नेमणूक तुम्ही गमाऊ नये ता। २२ माहे आगष्ट सन १८२७ ईसवी

रावेनसन साहेबाची सही असे

[ –तुळशीबागवाले दप्तर

---

## १८२

# उदासी मठ

( श्री. चिं. ग. कर्वे )

*या मठासंबंधीं आज्ञापत्र पुणें न. सं. वृ. सं. २ ( १३० ) वर छापलें आहे हा अर्ज दिसतो.

ले. ४६ } श्री { शक १७२३ इ. १८०१

यादी ब्रम्हकूटस्थ उदासी गुरु नानक निर्वाणी वा। कसबे पुणे सु॥ इसने मयातैन व अलफ विनंति लिहिली ऐसी जे सक्रु बुरज्यात थलकरी का। मार याणे आम्हास जागा धर्मार्थ दिल्ही आदमासे दीड दोन बिघे पर्यंत आहे ती आगोधर खडक होता तो आम्हास दिल्हा नंतर आम्ही तेथें हजार बाराशे रुपये खर्च करून वोढा खाणून भर घातली आणि विहीर बांधली त्यास च्यार हजार रुपयेपर्यंत खर्च करून झाडझुड लाविले पुढे त्या जाग्याविशीं बुरज्या मा।र आम्हासी खटले करू लागला की जागा यावयाची नाही त्याजवरून नाना फडणीस व हरीपंत तात्या व जनार्दन आपाजी व बालाजीपंत लेले इतक्यानी चौकसी करून माहादजी पा। शांबरे याचे विद्यमाने करार करून जागा आम्हास दिल्ही त्याअन्वये सरकारचे ताकीदपत्रही बुरज्या यास दिल्हे व ताकीदही रुबरू केली असे असता हाली रायाजी बुरज्या व संतु बुरज्या उभयेता आम्हा बरोबर खटले करितात की जागा आमचे सोडून देणे येविसी मनास आणून बुरजेमा।र यास ताकी(द) व्हावी

---

* न. सं. पा. स. ५।३५
न. सं. ९

# १८३

# बुधवारांतील लिमये वाडा

( श्री. चिं. ग. कर्वे )

यांत नारो बाबाजीचा उल्लेख आहे. त्याचे वंशज यांत आहेत.

ले. ४७ } श्री { श. १७३२ मार्ग. शु. १०
इ. १८१० डिसें. ५

नकल

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बलवंतराव विठ्ठल मोहोलकर स्वामीचे शेवेसी पो परशराम जाती लिमये साष्टांग नमस्कार विनंति उपरी आमचा खासगत वाडा पुण्यात बुधवार पेठेत आहे त्याची लांबी रुंदी

लांबी पूर्व पश्चम गज रुंद दक्षण उत्तर उत्तरेची भिंत निमे
२३ उत्तरचें तोंड आमची त्या सुधा गज
३० दक्षिणेकडील चसळ २९
६३ गज आहे ते तोंढ अभयंकराचे भितीसी
पैकीं निमे ३१॥

सदरहूचे चतुःसीमेचे शेजारी ——————————————... तपशील

पूर्वेस रस्ता १ पश्चमेस त्रिंबकराव नारायण भिडे
दक्षणेस गंगाभागीर्थी भितींची जागा अमची वर भित
रमाबाई अभ्यंकर नारो त्याणी घातली अहे १
बाबाजी याची सून त्याचे उतरस बालाजी सदासिव लाळे याचे
सोप्याचे पाणीं आमचे घर भित निमे त्याची व निमे अमची १
वाड्यात पडत आहे भिंत
अभयंकर यांची आहे १

येणेप्रो चतुःसीमा वाडित इमला व विहरी सुधा तुम्हास आम्ही अपले स्वसंतोषे फरोक्त रुपये १००० येक हजार रुपये अकुशी घेऊन दिल्हा असे तर तुम्ही वाड्यात इमारत बाधून पुत्रपौत्रादिक वंशपरंपरेने सुखरूप नांदावे वाड्याचा कवाला तुमचा तुम्ही करून घ्यावा अम्हाकडे सबध नाहीं. हरकोणी आम्हासबधे जाग्याविसी वारसा करू लागलियास त्याचा जाबसाल अम्ही करू मिती मार्गसीर्ष शुा १० शके १७३२ प्रमोद नाम सवत्छरे सन १२२० इहिदे अशर मयातैन व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंति *

हस्ताक्षर खुद

साक्ष

१ त्रिंबकराव नारायण भिडे १ रमाबाई कोम विठलराव नारायण अभयंकर हस्ताक्षर सखो लक्ष्मण अपटे

---

* न. सं. पा. स. २०१६५

१८४

# विश्वासरावाच्या लग्नाचीं पुणेंकरांस वस्त्रें

( श्री. चिं. ग. कर्वे )

हें लग्न शक १६७१ त झालें त्याचा देकार नंतर झालेला दिसतो. सातव्या वर्षी मुंज व आठव्या वर्षी लग्न जालें.

ले. ४८ } श्री { श. १६७२ श्रावण शु. ८
इ. १७५० जुलै ३०

यादीदास्त श्रमित—राजश्री पंतप्रधान याचे घरी राजश्री विश्वासराव याचे लग्न जाले त्याची वस्त्रे विा। राजश्री बापुजी आनदराव यानी का। पुणेकरास वस्त्रे दिल्ही साल गुदस्ता वैशाख मासीं लग्न जाले त्याची वस्त्रे सु॥ इहिदे समसैन मया व आलफ सन हजार ११६० छ ७ रमजान

[ स. ग. जोशी दप्तर ५८४०।२०

---

* न. सं. पा. स. १४।६५

१८५

# शिरपाव मानाची यादी

( श्री चिं. ग. कर्वे. )

ले. ४९ } श्री { श. १६७२ आश्वीन वद्य १
इ. १७५० आक्टो. ५

यादी सिरपाव का। पुणें सु॥ सन समसैन मया व आलफ सन हजार ११५९ चे संडणीचे सिरपाव सन हजार ११६० मधे दिल्हे आस्वीन वद्ये प्रतिपदा छ १४ जिलकाद

५ निा मुंजरी

२ पाटील झांबरे बरोबर

म्हाकोजी पा माहादजी पा॥

१ १

१ मल्हार विश्वनाथ राजरीस कुलकर्णी

२ चौगुले

१ जोगोजी सेलका

१ गुणाजी हिच(!)

२

---

५

४ नि॥ मोहतर्फ

२ सेटे बरोबर

बाबू सेटे लक्षुमण सेटे

१ १

१ माहाजन मल्हारभट वेव्हारे

१ मल्हार जिवाजी कुलकर्णी ठकार

४

२ नि॥ माळी

१ मेहत्रा

१ गोपाल मोरेस्वर कुलकर्णी

२

३ नि॥ पेठ शाहापूर

१ गणसेट सेट

१ आउबा बलकवडा माहाजन

१ गोपाल मोरेस्वर कुलकर्णी

३

१४

३ ढवले चाकरीमुळे

१ पदाजी सिदा नि॥ मोहतर्फ

१ नि॥ माळी

१ राणोजी नि॥ शाहापूर*

१७

---

* न. सं. पा. स. १९।६४

## १८६

# नगारखाना तुळसीबाग

(श्री. चिं. ग. कर्वे)

ले. ५० } { शके १७१५ कार्तिक शु॥ ३
इ. १७९३ नोवें. ६

हिसेब श्री—चे नगारखान्याकडे खर्च वि॥ रामचंद्र महिपत सु॥ आर्बा तिसेन मया व आलफ ह॥ छ २६ रबिलावल ता॥ छ १ रासर पावेतो रुपये

३७ नगारची याजला रोजमरा

४ नगारची

० भलु जमादार

२ आबादुलाखान

२ कर्नी × ×

४

११ सुरणाची

४ भाईदास

४ हरीदास

३ मियारखान

११

७ दमामी

३ चादखान

४ शेक दाउद

७

८ कर्णाची

४ फकीरखान

४ आजमतखान

८

७ × झाजी

× × ००३॥ ०=। म्रो

॥≡ मो महीपती कदम (।)

वजन ००२॥४॥० दर ००३

२॥-।

२।≡॥ लाकडे नगारखान्याकडे शेकावयास वजन ०।२ दर सहीस रुपये

७ म्रो मो हणवंता लोणारी*

४२०॥॰

[ तुळशीबागवाले दप्तर

* न. सं. पा. स. ता. ८-९-४३

## १८७

# तुळशीबागेंतलि नवा नगारखाना

( श्री. शं. ना. जोशी )

ले. ५१ } {श. १७२५ इ. १८०३

श्री

यादी श्रीरामचंद्र वास्तव्य कसबे पुणें पेठ शुक्रवार यास सालमजकुरी सरकारातून नवा नगारखाना दिल्हा तेथे तयारी बद्दल सु॥ आर्बा मयातेन व अलफ ——————— रुां

२३४॥ तांब्याचे दागिने यकूण ——— रुा

५२॥ झीला जोड २ यो वजन ॥॥
दर सेरी रुा १॥ प्रा

२६। थंच जोड १ येक वजन ।५ दर
सेर रुा १॥

१४० नोबती जोड १ वजन पक्के २ दर
सेरी रुा १॥ प्रा

१५॥ भांडी ———————

७ घांगर सुार १ यो वजन
दर सेरी रुा १॥

८॥ घंगाल सुार १ येक वजन ५
दर सेरी रुा १॥

१५॥

२३४॥

७॥ पितळी समई वजन ५ दर सेरी रुा १॥ रुा प्रा

७५ पंचरसी

४५ झांज सुमार १ येक वजन ।५ दर सेरी
रुा ३ प्रा

३० घड्याले सुार १ येक वजन । दर सेरी
रुा ३ प्रा

७५

३७ उख्ते किमतीचे दागिने

३५ पितळीं

२० तुरया जोडे १ येक
१५ कर्णा सुमार १ येक

३५

२ तांब्याची घटका सुमार १ येक

३७

१०८ झालरीस

७८ सकलाद

२४ जंबुर्दी गज सुमार ६
दर गजी रुा ४ प्रो

५४ लाखी गज सुा १८ दर गजी
रुो ३ प्रो

३० ताफ्ता ठाणे पिवळी सुमार २ दर
ठाणास रुो १५ प्रो

१०८

१० जाजम बसावयास

५ खाद्या सुा ४ दर १। प्रो
४॥ छिटे सुा ३ दर १॥ प्रो
-।।- सिलाई बा॥*

१०

४७२

* न. सं. पा. स. १२।६४

१८८

# स. माधवरावकालीन कांहीं पुण्यपत्तनस्थ

( श्री. शं. ना. वत्सजोशी )

ले. ५२ } (पान) १ { श. १७१४ चैत्र वैशाख<br>इ. १७९२ एप्रील मे

(पान) २ पुा[१] शके १७१४ सुा इसने तिसैन+

---

१ ही पुरवणी आहे. व ह्या पुरवणीचे दुंडे कागद २ ते ६ असे आंकडे घातलेले मिळाले. पहिला कागद मिळाला नाहीं. आहे ह्या पांच कागदांत मेहुणपुरा, शनवार, कसबा व बुधवार ह्या चार पेठांतील मंडळींची यादी आली आहे. तुळशीचागेंतील राममंदिरांतील एखाद्या वार्षिक प्रसंगार्थ ज्यांना निमंत्रण द्यावयाचे अशा प्रतिष्ठित गृहस्थादींची ही यादी आहे. ह्यावरून त्या वेळच्या पुण्यपत्तनस्थ कांहीं मंडळींची ओळख होईल व त्या त्या कुटुंबियांनाही यादी अधिक उपयुक्त वाटेल. यादींत एखाद्या रस्त्याचा निर्देशहि आला आहे. यादी आद्यन्तविहीन आहे.

प्रत्येक कागदाच्या डोक्यावर क्रमांक आहे; पण ६ व्या पानावर 'श्री' काढली आहे. पुढें 'पट' शब्द लिहून त्यापुढें ओळ काढून ती मोकळीच सोडली आहे.

१ नारायणशास्त्री
१ नीलकंठ जोशी वेव्हार
१ माहादेवशास्त्री वाडेकर
१ वामनशास्त्री
१ मुकुंद जोशी
१ राजेश्वरभट वैद्य
१ बहिरंभट धर्माधिकारी
१ वामनभट पाटणकर
१ वीरेश्वरभट कर्वे

१ माहादेवभट दीक्षित आपटे
१ धोंड जोशी पंचनदीकर
१ पांडुरंगभट पुराणीक
१ बालभटशास्त्री
१ वासुदेव जोशी
१ कृष्णशास्त्री याचा पुत्र
१ बाल जोशी माजगुणकर
१ नाना जोशी वेव्हार
१ बालंभट धर्माधिकारी
१ शेषशास्त्री[१] मीमांस
१ नारायणशास्त्री वज्रटंक यांचे नातू

महस्त

प्रा मेहूणपुरा लगत मुरलीधर

१ माहादाजपिंत गुरुजी
१ गणेश कृष्ण वेंडसे
१ नारायणभट जोगलेकर यांचे पुत्र
१ दिनकरपंत गोरे
१ कृष्णाजीपंत गोरे
१ त्रिंबकराव परचुरे
१ परशरामभाऊ मिरजकर
१ महिपतराव जिवाजी जोग
१ नारो सिवदेव याचे पुत्र
१ गणपतराव जिवाजी जोग
१ रामाजी केशव वैद्य
१ आबा खाडिलकर
१ केशवराव जगंनाथ सिंहगड
१ भास्कर माहादेव फडणीस
निा दृशम
१ माहादाजी खंडेराव वोक
१ गणपतराव कोलटकर
१ आपाजीराव दाभोळकर याचे पुत्र
१ रामराव नारायण राजमाची
१ बलवंतराव भानू
१ खंडोपंत वर्तक
१ भिकाजी नारायण पाळंदे याचे पुत्र

१ धोंडभट भागवत
१ बालाजपिंत सवहे
१ विसाजपिंत बरवे
१ बलवंतराव डिगणकर
१ गणपतराव गद्रे
१ गणेशपंत (लिमये)
१ बालकृष्णपंत वर्तक
१ लक्ष्मणपंत कोपरकर
१ बलवंतराव मुजुमदार–कर्यात मावळ व काशीपंत भोपळे
१ दादाजी गंगाधर
१ गोविंदराव बाजी जोशी
१ नारोपंत गोखले
१ सदासिवपंत सेवड
१ आनंदराव विश्वनाथ लेले
१ दामोदरपंत लघाटे
१ जगंनाथभट ढेकणे
१ वासुदेवपंत वैद्य
१ खंडेराव लाटे
१ गोपाळराव शास्त्री
१ गोपालराव राम
१ राघोपंत देवस्थळे
१ बाजीपंत काकिर्डे
१ आंताजीपंत खाडेकर
१ बच्याजीपंत खाडेकर

(पान) ३ शके १७१४ सु॥ इसने

१ लक्ष्मणराव आठवले
१ नारोपंत नेने यांचे पुत्र
१ विनायक आबाजी आठवले
१ भिकाजीपंत आठवले
१ विठलपंत लिमये

२६

१ बाजीपंत आगासे

२८

१ बाळकृष्णपंत सपरे
१ उपेंद्र श्रोती याचे पुत्र
१ निळो बाबुराव
१ रघुनाथराव राजेबहादर
१ केसोपंत दातार
१ विसाजीपंत ढवळे
१ विसाजीपंत ढवळे

२९

ता। कोंडो बाजी मुरनीस आ। ५४

पेठ शनवार

कि॥

१ बापूजी नाईक मराठे
१ श्रीधरपंत आचवल
१ चिमाजी नाईक माकरे
१ जनार्दनपंत मराठे
१ माधवराव केतकर
१ बाजीराव बर्वे
१ जैरामपंत सोमण
१ सदाशिव राम जोग
१ बाबूराव केशव
१ माधवराव जोशी रायरीकर
१ विठलराव गोले
१ आबा हशमनीस याचे पुत्र
१ हरी रामदिक्षित काळे
१ बालाजी नाईक जोशी
१ पांडुरंगपंत देवधर
१ राघो नारायण कर्वे
१ रामचंद्र विनायक जोसी
१ गोविंदराव बर्वे
१ खंडेराव त्रिंबक वोढेकर
१ नारायणराव भागवत

कि॥

१ बापुजी बाबाजी आभ्यंकर
१ अंतोजीपंत तांबे
१ लक्ष्मण पाठक याचे पुत्र§
१ हरीपंत देवस्थळे
१ जीवबा चिटणीस
१ रामचंद्रदीक्षित दात्ये
१ धोंड जोशी पंचनिधीकर
१ माहादेवभट केलकर
१ सदासिवपंत बेहरे
१ गोपीनाथदीक्षित यांचे पुत्र
१ ——शास्त्री
१ चिंतामणशास्त्री *काणे
१ गणपतराव कानिटकर आमदाबाज
१ आबा नेने
१ हरीपंत
१ नलिकंठराव चासकर
१ विठलपंत वाकनीस
१ गोविंदपंत आपटे
१ मोरोपंत भावे

( पान ) ४ शके १७१४ मु॥ इसने

१ वासुदेव जोसी चिपलोनकर
१ भगवंतराव मुनसी
१ बाबूराव देशपांडे जुंनरकर

२३

१ आबाजीपंत जोगलेकर
१ मोरोपंत सान्ये

२१

+ खळो आनंदराव आ॥ ४४ रुजू-दुसरा बोलावणार ४४

---

* ' दीक्षित ' होतें तें खोडून ' शास्त्री ' वर लिहिलें आहे.

+ ह्या वर रेघ ओढून खोडलें आहे.

§ ह्या नांवानंतर नुसती ओळ काढली आहे.

रस्ता सदाशिव रामचंद्र

किा

१ आबा वैशमपायन याचे पुत्र
१ हरिपंत पोगशे
१ आपाजी विश्वनाथ गोडबोले
१ भिकाजीनाईक कोलटकर
१ लक्ष्मण कोन्हेर यांचे पुत्र ३
१ वासुदेव रामरूष्ण
१ भटाचार्य
१ माहादेव जोशी पावसकर
१ हरी त्रिंबक वर्तक
१ रंगराव त्रिंबक राजेबाहादर
१ गोपाळ संभाजी यांचे पुत्र
१ चिटको गंगाधर मावलणकर
१ आनंदराव बिवलकर
१ भिकाजी जनार्दन आठवले
१ बज्याबा वाघ मोरगांवकर
१ श्रीपतराव रघुनाथ टकले
१ बोविंद केशव कान्हेर
१ बलवंतराव परांजपे
१ विठल अनंत कुरणें
१ माहादेव शास्त्र वाडेकर
१ बाबूराव वैद्य
१ नरसोबा नाईक ताबेकर
१ धोंडभट चिपलोणकर

किा

१ गोपालाच्चार्य
१ व्यंकटाच्चार्य आरकटकर
१ जैरामपंत बापट
१ बापुशास्त्री कासिनाथशास्त्री यांचे पुत्र
१ सदासिवपंत भिडे
१ बाबूराव करमरकर
१ बालाजी शंकर सोनी
१ आपाजीपंत भावे
१ प्रतिनिधीचे वाड्यातील मंडळी
१ गणेशपंत कातरे
१ बालाजी विनायक नि॥ प्रतिनिधी
१ विठलपंत प्रभुणे
१ कासीपंत मामा याचे पुत्र
१ दामोदरपंत राजवाडकर
१ बाबूराव दातार
१ चिंतोपंत गाडगील
१ माहादाजीपंत केळकर
१ अंताजीपंत फणसे
१ वासुदेवनाईक दातार
१ रूष्णाजी बहिरव थथे
१ भिकाजी नाईक भिडे
१ बलवंतराव नागनाथ

कसबा व नजीक गणपती

किा

१ हवालदार हवेली साडस
१ बापु मोकासी
१ माधवराव जाधवराव याचे पुत्र
१ नाना जोसी वेव्हार
१ भिकाजी विश्वनाथ जकाते
१ बाबूराव जकाते याचे पुत्र

किा

१ गोपालराव एकबोटे
१ दादोपंत व चिटकोपंत एकबोटे
१ गणेशपंत चादवडकर
१ बाबूराव माणकेश्वर कराडकर
१ दिनकरराव देशपांडे
१ नाब्याबा देशपांडे

१ केसोपंत कुंटे
१ नारायणराव सदासिव
१ श्रीनिवास शामराव
१ आमृतराव भट[१] याचे पुत्र
१ मालोजी नि॥ देशमुख
१ सिधये मव्हिपत *
१ माहिपतराव विश्वनाथ चिनीवाले
१ चिटकोपंत वैद्य
१ बालकृष्णपंत गद्रे
१ माहादाजी चिंतामण
१ नारो बाजी
१ विठलराव * बापु पुरधरे
१ आबा देशपांडे
१ सिवाजी नारायण वैद्य
१ बच्याबा साठे
१ बालोबा धडफले
१ सकाजपंत दादा बोकील सासवड
१ परशेरामपत सोनी परलीकर
१ दाजी कल्याण धडफले
१ भैरालभट शालग्राम
१ मल्हारभट बहीरभट धर्माधी
१ धोंडो मल्हार पानशी
१ लाडोजी नरसिंगराव देशमुख
१ काकोबा वैद्य
१ नारोपंत राजरुषी
१ बाबाजी आनंत सरसुभा
१ आबा सोनी*
१ सखाराम जिवाजी
१ जिवाजीपंत नि॥ भोसले*
१ बलवंतराव आपाजी आर्वीकर
१ कृष्णभटजी पटवर्धन
१ नारो आपाजी लाले
१ बालाजी आपाजी लाले
१ जनार्दनभट शालग्राम *
१ गदाधर आपाजी लाले
१ बाबा शालग्राम
१ बालाजीपंत फरासखान
त्रि यकराव फरास*
१ कुशाबा फडणीस सातारकर
१ लक्षुमणभट दिवेकर
१ माहादेवभट सारगपाणी
१ बालाजी ना॥ भिडे
१ भिकाजी ना॥ भिडे
१ सदाशिव ना॥ ताबेकर
१ बालोजी सीत्र

(पान) ५ शके १७१४ सु॥ इसेन तिसेन

पेठ बुधवार

कि॥
१ नाना फडणीस
१ नारो सिवराम खासगी
१ व्यंकटराव घोरपडे
१ रामचंद्रनाईक परांजपे

कि॥
१ माधवराव लिमये
१ रामचंद्र विठल नि॥ मांडवगणे
१ कृष्णभट पटवर्धन
१ आबा सोनी

---

१ पेठे सोडून भट केलें आहे.
मध्येंच पण तेव्हांच ओळ न काढतां लिहिलें आहे.

१ रघुनाथराव मिरजकर*
१ बापु सेलूकर
१ रामराव अनंत
१ बन्याबा मेहेंदले
१ रामचंद्र नारायण जोग
१ बच्याजी बलाल दात्ये
१ पांडुरंग कृष्ण गोडबोले
१ विनायकभट व सदासिवभट थथे
१ आनंदराव गोपाल जोशी
१ अंताजी बापुजी सेटे
१ रामचंद्र दीक्षित गडबोले
१ गणेशपंत गोखले श्रीमंताचे सासरे
१ भगवंतपंत मालसिरसकर
१ विठलराव आबीकर
१ हरीपंत तात्या
१ दुलभ सेट
१ हरी भटजी (?)
१ हरबाजी नाईक चाबुकस्वार
१ रंगोबानाईक वानवले
१ कृष्णाजी बहिरव थथे

पेठ बुधवार

१ निलकंठराव गोविंद
१ गणपतराव पटवर्धन
१ माहादाजीपंत कुंटे
१ लक्ष्मणपंत खरे
१ आनतभट निसूरे
१ गोविंदभट निसूरे
१ पांडुरंग कमलाकर
१ बालाजी ना। थते
१ बालाजीपंत दामले
१ बापुजी हरी पाटणकर
१ विसाजीपंत दातार
१ विद्यधर जासी
१ गणेसपंत केलकर
१ उष्ट्रकारखान्यकडील कारकून
१ आपाजीपंत भावे
१ बालाजीपंत लेले
१ बहिरोपंत मेदले
१ दादाजी घाणेकर
१ विठोबाना। वाखरे
१ रामचंद्रपंत पेंडसे
१ शिवरामपंत विश्वनाथ मोडक
१ केसोपंत पंडीत
१ रुद्राजीपंत करमरकर
१ गंगाधरभट चीपालेकर*
१ सदासिवपंत सरवगे (?)
१ श्रीधर गोविंद भानू
१ बाबुजी ना। दातार
१ आनंदराव जिवाजी
१ कमलाकरपंत नायगावकर
१ राघोपंत गुराजी

* चिपोल(ण)कर ?

१ खंडेराम सिवराम
१ माहादाजीपंत निमये
१ वासुदेवपंत चोलकर
१ गणेशपंत भिडे
१ त्रिंबक शास्त्री वाईकर
१ भिकाजीपंत काले
१ वेंकाजीपंत फरसबदी
१ सिवाजी खंडेराव पानसी
१ सदासीव त्रिंबक
१ रामाजीपंत हार्जीनिसि
१ रामाजी विठल थटी
१ दादोपंत आचवल
१ भिकाजी राम भिडे
१ कोंडो बाबाजी
१ गदाधरपंत भावे

(पान) ६ श्री

पट

किा
१ कुशाबा फडणीस नवासे
१ सदासिवभट नानल
१ गणेशपंत मंटगे निा सासर्गी
१ सदासिव भालचंद्र
१ आबा ठोसर
१ भिकाजीपंत भिडे
१ राघोपंत गडबोले
१ गंगाधरपंत जोसी
१ विसाजीपंत वाडदेकर
१ मल्हारपंत भडभडे
१ नारोपंत गद्रे
१ सदासिवभट दिवाणजी
१ बालाजी विनायेक सिगडकर
१ विनायकपंत आगासे

किा
१ बापु जोशी चादेकर
१ जेवंतराव पानसी व बापू पानसी
१ गणेशभट पारखे सचीवाकडील
१ पंतसचीव
१ त्रिंबक लक्षुमण देशमुख
१ चिंतोपंत जोसी
१ रामचंद्र सिवाजी
१ पांडुरंग बाबुराव व बलवंतराव भोसले यांकडील वकील
१ दादोपंत मराठे
१ माहादाजी बलाल साठे
१ तात्या जोशी
१ राघोपंत पानसी
१ कृष्णाजी ना वाकडे

१ माहादेवदीक्षित आपटे
१ कृष्णाजीपंत भट
१ गणेशपंत राजवाडकर
१ गोपालपंत दातार
१ बाबूराव पोतनीस
१ बापू बावले व रघुनाथ सदाशिव बावले
१ गोपालपंत चिवलकर
पेठ कसबा
किता
१ नारो निलकंठ मजमदार
१ राघोपंत पुरंधरे*
१ रामचंद्र इच्छाराम ढेरे
१ मल्हारपंत बापट
१ सिदोपंत ढेरे
१ माधवराव त्रिंबक दीक्षित
१ उत्याबा देशपांडे
१ महीपतराव बापुजी
१ बापू मोघे
१ बाजीभट ढेकणे
१ अनंदराव वैद्य
१ मेघःशाम बलाल याचे पुत्र
१ तिमाराव पारसनीस
१ चिंतामण दीक्षित याचे पुत्र
१ माधवराव रामचंद्र
१ सखोपंत ढेरे
१ तात्या रास्ते
१ गोविंद काळे
१ वेकंठराव आमृतराव रास्ते व कृष्णाजी बाबूराव
१ नीलकंठ आबुराव बारामतीकर
१ मोरो चिंतामण वोकार
१ आचार्जी ना॥ काबरस
१ गोविंदरावमामा पिंगळे

१ बलवंतराव वाकडे
१ बाजीपंत मुगे
१ विसाजीपंत आठवले
१ माणकोपंत कानिटकर
१ नारोपंत घागुरडे
१ आनंदराव वाकडे
१ रामजोसी रोडे
१ बाळाजी ना॥ आवचट

किता
१ चतुर्भुजदेव
१ जनार्दनपंत पोतनीस
१ गोविंद आनंतराव सुपेकर
१ रामराव त्रिंबक सुभा
१ त्रिंबकराव चिटणीस
१ बच्या चिटणीस
१ हैबतराव शंकर
१ सदासिवपंत चिवलकर
१ केसोपंत वैद्य याचे पुत्र
१ केसोपंत कुंटे
१ लक्षुमणराव रास्ते
१ नीलकंठ महादेव पुरंदरे
१ त्रिंबक महिपतराय पुरंदरे
१ खंडेराव दौलत

---

* या नांवाखाली नुसतीच रेघ ओढली आहे.

## १८९

# पत्रावळीच्या नोंदीवरून व्यक्ति व प्रसंग

श्री. चिं. ग. कर्वे

ले. ५३
न. सं. पा. स. ३/६५

श्री.

शा. १७०९ वैशाख व. ३०
इ. १७८७ मे १७

१/ह

जमाखर्च छ २ साबान छ

यादी गुजारत त्रिंबकजी गुरव ईा छ———तागाईत छ २८ रजब वैशाख अखेर सुा सबा संमानीन मया व अलफ खर्च पत्रावली सुाार

सरकारच्या वाड्यात सुाार

१००० छ २२ साखर नित्य खर्चास दाहा रोजा

२००० छ ६ जमा दिलावलें

१०१० १०००

१००० छ १८ जमादिलावलें दाहा रोजा बेगमी

१००० छ २८ जमादिलावले दाहा रोजा

१००० छ १० जमादिलाखर दाहा रोजा

१००० छ १३ जमादिलाखर अतिरुद्राचे ब्राह्मण भोजनाचा।

१००० छ १४ जमादिलाखर दाहा रोजा

१००० छ ४ रजब दाहा रोजा बेगमी

९०००

यहस्तांकडे

७०० बालाजी केशव यांस लग्नाब॥ छ ४ रजब

१००० कृष्णाजी लक्ष्मण फडणीस पाा नेवासें यांस पुत्राचे लग्नास छ २४ जााखर

२०० गणेश कृष्ण छ १४ रजब

५०० हरी नारायण कारकून यास लग्नाबदल छ १० रजब

३००० बाबूराव अनंत कारकून निसबत दप्तर यांस पुत्राचे लग्नास छ १९ रजब

७०० त्रिंबक कान्हेरे एकबोटे पुत्राचे लग्नाबद्दल छ ३० जमादिलाखर

१००० विठल गणेश प्रभुणे कंन्येचे लग्नाबाा छ ८ रजब

१०० गंगाधर बलाल गोडबोले छ १३ जमादिलाखर

७०० चिमणाजी बलाल पुत्राचे लग्नाबदल छ ४ रजब

४०० नरसो ससाजी यांस कन्येचे लग्नाबदल छ ४ रजब

३०० बालोबा नाईक पोतदार छ १७ रजब

३०० कृष्णाजी नाईक भावे छ ५ रजब

७०० अन्याबा अनगल लग्नाबद्दल छ १० रजब
१००० केसो गोविंद पंडित नातीचे लग्नाबा। छ २४ जमादिलाखर
७०० गोपाल नारायेण एकबोटे लग्नाबा। छ ८ रजब
२०० बालाजी धोंडदेव छ २२ जावलें
७०० त्रिंबक नारायण जोसी यास लग्नाबा। छ ११ रजब
१००० चिमणाजी वेंकटेश नातवाचे लग्नाबा। छ २९ जाखर
२०० केसोपंत बर्वे छ १४ रजब
५०० सदासिव मलहार यांजकडे अश्वत्थाचे मुंजीबा। छ २ रजब
५०० रामचंद्र नारायण लग्नाबदल छ ६ रजब
१००० गोविंद कृष्ण सहस्त्रबुद्धे पुत्राचे लग्नाबा। छ २६ जाखर
४००० बाजी गोविंद यांजकडे कन्येचे लग्नाबा। छ २९ जाखर
१००० खंडेराव सुंदर कारकून नि। दप्तर एकबेर्जी लग्नास छ २८ रजब
१००० बालाजी रघुनाथ साठे दिमत तोफखाना कन्येचे लग्नास छ २६ जाखर
१५०० रामाजी जगंनाथ पुत्राचे मुंजीबद्दल छ २९ जमादिलाखर
५०० रामचंद्र त्र्यंबक यास छ ८ रजब
७०० नारो गणेश लिमये यांस लग्नाबा। छ ९ रजब
७०० नारो मल्हार राजऋषी यास लग्नाबा। छ ९ रजब
२५ मोरोबा शागीर्द छ १६ रजब
५०० मोरो रामचंद ढमढेरे यांस मावद्या बा। छ १९ रजब
५०० रंगो बाबुराव नि। बालाजी शंकर सोनी लग्नाबा। छ ६ रजब
७०० चिंतो विश्वनाथ नातीचे लग्नाबा। छ २१ जाखर
१००० बाबाजी बलाल बोक छ २३ रजब
१००० लक्ष्मणराव कृष्ण पुत्राचे लग्नाबदल छ २४ राखर
५०० सदासिव राम जोग नि। दप्तर लग्नाबा। छ १८ राखर
५०० महादाजी राम मुंजीबद्दल छ १३ राखर
६०० राघो विश्वनाथ मुलीचे लग्नाबद्दल छ २४ सफर
५०० सदाशिव शिवराम मुंजीबा। छ १३ रा। खर
५०० जनार्दन राम कारकून नि। सरसुभा यांस मुंजीबा। छ १८ राखर
७०० रंगो जिवाजी छ १ रजब

३१८२५

ब्राह्मणाकडे प्रयोजनाबा। वगैरे

१००० राजश्री रामशास्त्री यांजकडे छ २२ रजब लग्नाबा।
३०० अनंतभट तेलंग मुंजीबा। छ ३ रजब

५०० विनायक जोसी छ २१ रजब
५०० बाबाभट धर्माधिकारी लग्नाबा छ १३ रजब
५०० त्रिंबकभट भाटे याचे नातीचे लग्नाबद्दल छ १ रजब
५०० मोरभट पुरंदरे लग्नाबद्दल छ ८ रजब
४०० काशिनाथभट ढेकणें लग्नाबा
१००० त्रिमंगळाचार्य पुत्राचे लग्नाबा छ २९ जमादिलाखर
१३०० चिंतामणशास्त्री काणे यांस सालगुदस्त प्रो छ ७ राखर
१००० गणेशभट लिमये छ २६ रजब
२००० विनायक दीक्षित आपटे नातीचे लग्नाबा
१०० छ ३० जमादिलाखर
१००० छ २ रजब
———
२०००
५०० नारायणभट आपटेकर यांस ब्राह्मणभोजनाबा छ २० जाखर
२०० हरभट पाटणकर गर्भाधानास छ २३ जमादिलाखर
७०० माहादेव जोसी पांवसकर नातीचे लग्नाबा छ ३ रजब
३००० सदासिव दीक्षित करवे उपाध्ये नातीचे लग्नाबा छ २७ जाखर
५०० विठलभट ढेरे अग्निहोत्र घेत आहेत सबब छ १० जमादिलाखर
७०० श्रीपत गोसावी नेवासकर रामनवमीचे उत्साहास छ ११ जमाखर
५०० जनार्दनभट शालग्राम लग्नाबद्दल छ १४ रजब
५०० रंग जोसी जुंनरकर लग्नाबा छ १३ रजब
४०० जनार्दनभट बापट मांवद्यास छ २८ रजब
१००० रघुनाथ बावा यवतेश्वरकर यांस ब्राह्मणभोजनाबा
———
१७००० छ २१ रजब

किरकोळी मराठे लोक वगैरे

३०० नागोजी जगदळे खिजमतगार लग्नाबा
छ २९ जमादिलाखर
५०० दादजी नाईक सोरटे लग्नास छ ३ रजब
४०० राणोजी सालोखा लग्नाबा छ ४ रजब
२००० कृष्णसिंग याचे लग्नाबद्दल छ १३ रजब
१०० मुकाजी लग्नास छ १२ रजब
५०० दत्तु आढाव खिजमतगार सरकार यास लग्नाबा
छ ९ रजब
२०० निंबाजी मुगाणे निा सरकार मुलीचे लग्नाबा
छ २८ जमादिलाखर
२०० पिलाजी चावट खिजमतगार लग्नाबा छ ३ रजब
७५० आनाजी तांबट मुलाचे लग्नास छ ४ रजब

२०० नरसोजी जामदार छ ७ रजब
१०० रामसिंग परदेसी लमाबद्दल छ १५ रजब
४०० बालाजी नाईक जासुद लमाबा। छ २७ जमादिलाखर
५७० बाबू बाचर लमाबा। छ ३ जमादिलाखर
४०० येसू काल्या जासुद निा दफ्तर येकचेर्जी लमाबा।
छ २४ जमादिलाखर
२५० बहीरजी—निसबत राजश्री नाना फडणीस छ ४ रजब
३०० रायाजी वागमारे लमास छ २८ जा।खर
१५०० बालोजी शित्रे यांस लमाबा। छ १ रजब
२०० नरसोजी वागमारे खिजमतगार यास लमाबा। छ १७ रजब
१५० भिवजी मान्या लमाबा। छ ८ रजब
३५० जावजी सिंदा खिजमतगार निसबत राजश्री नानां फडणीस यांस लमाबद्दल
छ १७ रजब
२०० कृष्णाजी गौळी खिजमतगार निा राजश्री नाना फडणीस लमास छ १२
रजब
१०० मालू पाढरा माली भावाचे दिवसास छ ११ रजब
१०० राण्या पोरगा निसबत जनार्दन आपाजी छ ५ रजब
४०० बालोजी धाईरकर लमास छ ५ रजब
१५० निंबाजी सालोखा लमा बा। छ २ रजब
१५० रत्नोजी पोळ याजला लमाबा। छ ४ रजब

१०४००

तेरीज येकंदर पत्रावली

९००० सरकारच्या वाड्यांत
३१८२५ ग्रहस्त
१७००० ब्राह्मणांकडे
१०४०० किरकोळी मऱ्हाटे लोक वगैरे

६८२२५ दरहजारी रुा २॥ प्रमाणें रुा
पैकीं आदा— १७०॥–

२५ ता। खर्च पडले
५९॥÷ पेशजीचे हिशेबी फाजील
१० ता। खर्च पडल

९४॥–

बाकी निवल देणें रु. ७६ शाहूतार रुपये द्यावे छ १ साबान सबा
समानीन

# शिवचरित्र साहित्य खंड

| | | | | | | किं. रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| खंड १ | स्वी. ग्रं मा. क्र. | ३० | पुरंदरे व द. वि. आपटे | पृ. १५४ | (श. १८४८) | १॥ |
| २ | ,, ,, | ३३ | मंडळाचिटणीस | पृ. ४२६ | (श. १८५१) | ४ |
| ३ | पुरस्कृत ग्रं. मा. क्र. | २४ | शं. ना. जोशी व ग. ह. खरे | पृ. २७८ | (श. १८५२) | ३ |
| ४ | स्वीय ग्रं. मा. क्र. | ३८ | मंडळचिटणीस | पृ. १२६ | (श. १८५६) | १॥ |
| ५ | ,, ,, | ५५ | शं. ना. जोशी | पृ. ३६३ | (श. १८६४) | ३॥ |
| ६ | ,, ,, | ४७ | ग. ह. खरे | पृ. १५० | (श. १८५९) | १॥ |
| ७ | ,, ,, | ५० | रु. वा. पुरंदरे व ब. द. आपटे | पृ. १६४ | (श. १८६०) | १॥ |
| ८ | ,, ,, | ५५ | शं. ना. जोशी | पृ. १३२ | (श. १८६४) | १॥ |
| ९ | ,, ,, | ६२ | शां. वि. अवळसकर | पृ. ११८ | (श. १८६६) | १। |

# ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड

| | | | | | | किं. रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| खंड १ | स्वीय ग्रं. | क्र. ३५ | मंडळ चिटणीस | पृ. २०२ | (श. १८५३) | २ |
| २ | ,, | क्र. ४२ | मंडळ चिटणीस | पृ. १०० | (श. १८५६) | १॥ |
| ३ | ,, | क्र. ५४ | शं. ना. जोशी | पृ. २३२ | (श. १८६३) | ३ |
| ४ | ,, | क्र. ५६ | मंडळ चिटणीस | पृ. १८६ | (श. १८६४) | १॥ |
| ५ | ,, | क्र. ६१ | मंडळ चिटणीस | पृ. ९५ | (श. १८६५) | १॥ |
| ६ | ,, | क्र. ६४ | शं. ना. जोशी | पृ. १०६ | (श. १८६७) | ३ |

# शिवचरित्र साहित्य खंड

| | | | | | | किं. रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| खंड १ | स्वी. ग्रं मा. क्र. | ३० | पुरंदरे व द. वि. आपटे | पृ. १५४ | (श. १८४८) | १॥ |
| २ | ” ” | ३३ | मंडळाचिटणीस | पृ. ४२६ | (श. १८५१) | ४ |
| ३ | पुरस्कृत ग्रं. मा. क्र. | २४ | शं. ना. जोशी व ग. ह. खरे | पृ. २७८ | (श. १८५२) | ३ |
| ४ | स्वीय ग्रं. मा. क्र. | ३८ | मंडळचिटणीस | पृ. १२६ | (श. १८५६) | १॥ |
| ५ | ” ” | ५५ | शं. ना. जोशी | पृ. ३६३ | (श. १८६४) | ३॥ |
| ६ | ” ” | ४७ | ग. ह. खरे | पृ. १५० | (श. १८५९) | १। |
| ७ | ” ” | ५० | रु. वा. पुरंदरे व च. द. आपटे | पृ. १६४ | (श. १८६०) | १। |
| ८ | ” ” | ५५ | शं. ना. जोशी | पृ. १३२ | (श. १८६४) | १। |
| ९ | ” ” | ६२ | शां. वि. अवळसकर | पृ. ११८ | (श. १८६६) | १। |

---

# ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड

| | | | | | | किं. रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| खंड १ | स्वीय ग्रं. | क्र. ३५ | मंडळ चिटणीस | पृ. २०२ | (श. १८५३) | २ |
| २ | ” | क्र. ४२ | मंडळ चिटणीस | पृ. १०० | (श. १८५६) | १॥ |
| ३ | ” | क्र. ५४ | शं. ना. जोशी | पृ. ३३२ | (श. १८६३) | ३ |
| ४ | ” | क्र. ५६ | मंडळ चिटणीस | पृ. १८६ | (श. १८६४) | १॥ |
| ५ | ” | क्र. ६१ | मंडळ चिटणीस | पृ. ९५ | (श. १८६५) | १॥ |
| ६ | ” | क्र. ६४ | शं. ना. जोशी | पृ. १०६ | (श. १८६७) | २ |

---

**ऐतिहासिक संकीर्ण निबंध** खंड १ (श. १८६५) पृ. ११२ किं. रु. १॥

” ” खंड ३ (श. १८६८) पृ. ७७ किं. रु. १॥

---

**पुणें नगर संशोधन वृत्त** खंड १ (श. १८६४) पृ. ८६ किं. रु. १

” ” खंड २ (श. १८६५) पृ. ७५–१७६ किं. रु. १॥

” ” खंड ३ (श. १८६८) पृ. १८७–२६९ किं. रु. २

[ तीनहि खंड

---

**दंडनीति**–वा. सि. बेंद्रे, प्र. ७६ ग्रंथ

ट.

---

## अॅबट ( महाराष्ट्र

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ मानुदास डॉ. अॅबटकृत | रु. १ | ७ तुकाराम | ” | रु. १॥ |
| २ एकनाथ ” | रु. १॥ | ८ रामदास | ” | रु. २ |
| ३ भिक्षुगीत ” | रु. १॥ | ९ भक्तविजय भाग १ ला | | रु. ३ |
| ४ दासोपंत ” | रु. १॥ | १० भक्तविजय भाग २ रा | | रु. ३ |
| ५ बहिणाबाई ” | रु. १ | ११ भक्तिलीलामृत | ” | रु. ३ |
| ६ स्तोत्रमाला ” | रु. १॥। | १२ ज्ञानेश्वर | ” | रु. ३ |

कापडी बांधणीस ८ आणे जादा.

---

Library IIAS, Shimla
MR 954.792 K 148.II P-K 148.IV
00008977